# मंथन

२००५



2005
2

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार प्रदान समारंभ

मंथन सन्मानचिन्ह शांताराम पवार
संकल्पना : अवघ्या प्राणिमात्राचा सन्मित्र, करुणाकर

| अध्यक्ष | प्रमुख पाहुणे |
|---|---|
| **प्रा. केशव मेश्राम** | **आशुतोष गोवारीकर** |

सूत्रसंचालन
**दत्ता बाळसराफ**

**समारंभ**
शनिवार दिनांक ७ जानेवारी २००६, सायंकाळी ४ वाजता
रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

## २००५चे मानकरी

**संस्था**

| | |
|---|---|
| **लोकपंचायत** | **श्रमिक महिला विकास संघ** |
| संगमनेर, जि. अहमदनगर | वसई |

**विशेष पुरस्कार**
**श्री. लीलाधर हेगडे**, मुंबई

**सत्कार**
**श्री. सुरेश खोपडे**, मुंबई

2303
10-9-6

| | | |
|---|---|---|
| **प्रा. यशवंत सुमंत** | **श्री. लक्ष्मण माने** | **श्रीमती प्रतिभा शिंदे** |
| पुणे | करंजे, जि. सातारा | नंदुरबार |

| | |
|---|---|
| **श्रीमती पूर्णिमा मेहेर** | **श्रीमती सुषमा शर्मा** |
| पालघर | वर्धा |

कै. न्यायरत्न धुंडिराजशास्त्री
विनोद यांच्या स्मृतिप्रित्यर्थ

ग्रंथमोजणी
२००५-६: ११.२६
२००७-८: २०/२/८
२००८-९: १२/१२/८
२००९-१०
२०१०-११: १०/२/२०११
२०१२-१३
२०१४-१५
२०१५-१६
२०१६-१७

**संपादक**
वैशाली रोडे

**मुखपृष्ठ**
सुनील महाडीक

**अक्षररचना**
आदित्य जोशी

**डिजीटल प्रक्रिया**
प्रवीण वर्मा

**छायाचित्रे**
श्याम मणचेकर

**प्रकाशक**
रवी देवगडकर
निमंत्रक
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार समिती
केशव गोरे स्मारक ट्रस्ट, 'स्मृती', आरे रोड
गोरेगाव (पश्चिम)
मुंबई ४०० ०६२

**मुद्रक**
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५

# मागे वळून पाहाताना...

दोन हजार पाच हे वर्ष 'समाजकार्य गौरव पुरस्कार योजने'चे दहावे वर्ष. त्या निमित्ताने या योजनेच्या उद्दिष्टांचा, त्यांच्या पूर्तीचा आढावा घेणे हे संयुक्तिक तर आहेच; पण दरम्यानच्या काळात अनेक प्रकारे झालेले, होत असलेले सामाजिक-आर्थिक बदल लक्षात घेऊन अशा प्रकारे मागे वळून पाहाणे व त्यांतून योजनेमध्ये आवश्यक वाटल्यास काही बदल करणे आवश्यकही आहे.

'योजने'च्या पहिल्या वर्षीच्या (१९९६) स्मरणिकेमध्ये नमूद केल्याप्रमाणे या योजनेमागे पुढील उद्दिष्टे होती :

''या गौरव पुरस्कारांसाठी संस्था व व्यक्ती यांच्या नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातील.

१. ज्या सामाजिक संस्था वा व्यक्ती आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा व वैज्ञानिक दृष्टी यांचा प्रचार करून समाजातील अंधश्रद्धेचे निर्मूलन व्हावे म्हणून सतत प्रयत्नशील आहेत. तसेच, धर्मातीतता व मानवतावादी दृष्टिकोन यांच्या आधारे विविध जाती-धर्मीयातील सौहार्द वाढविण्यासाठी सातत्याने कार्य करीत आहेत.

२. पर्यावरण-संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यासारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरिता ज्या व्यक्ती अविरत कार्य करीत आहेत.

३. ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य याविषयीच्या जाणीवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांची ईर्षा जागृत होत आहे.

अशा ध्येयवादी व प्रगतीशील विचारांचे अधिष्ठान असणाऱ्या संस्था व व्यक्ती यांचे कार्य या समाजकार्य गौरव पुरस्कारांसाठी विचारात घेतले जाईल.''

आजपर्यंत केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या सल्लागार समितीने व महाराष्ट्र फाउण्डेशनच्या निवड समितीने योजनेची ही उद्दिष्टे व निकष यांचे पालन करून तिन्ही क्षेत्रांतील संस्था/व्यक्ती यांची पुरस्कारांसाठी निवड केली आहे, हे नमूद करण्यात आम्हाला समाधान वाटते. त्यामुळेच या समित्यांच्या निर्णयांचे महाराष्ट्रात नेहमीच स्वागत होत आले आहे. तसेच ही निवड करताना महाराष्ट्राच्या सर्व विभागांमध्ये समतोल राहील, हेही दोन्ही समित्यांनी सतत पाहिले आहे.

सुरुवातीची तीन-चार वर्षे, आम्ही परिवर्तनशील विचारांच्या समाजकार्य करणाऱ्या अडीचशे-तीनशे व्यक्तींकडून पुरस्कार निवडीसाठी व्यक्ती व संस्था यांच्या नावाच्या शिफारशी मागवत होतो. पुढील काळात शिफारशी करणाऱ्या व्यक्तींचे क्षेत्र अधिक व्यापक व्हावे, म्हणून निवड प्रक्रिया सुरू करताना व्यापक वाचकवर्ग असलेल्या व स्थानिक वर्तमानपत्रांत आम्ही

योजनेविषयीचे एक निवेदन देत आलो आहोत. वर्तमानपत्रांतील निवेदनाला आलेला प्रतिसाद व कार्यकर्त्यांच्या आलेल्या सूचनांमधून काही व्यक्ती व संस्था यांच्या नावांची एक यादी करून, जरूर तर त्या संस्थांना भेट देऊन अधिक माहितीही मिळवीत होतो. सल्लागार समितीवरील सभासद वेगवेगळ्या सामाजिक स्तरांत व क्षेत्रांत काम करीत असल्यामुळे योग्य अशा संस्थांची वा व्यक्तींची निवड होत आली आहे.

२००५ या वर्षाच्या पुरस्कारनिवडीकरताही वर उल्लेखिलेली निवड प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली. त्यानुसार निवड केलेल्या संस्था व व्यक्तींना द्यावयाचे पुरस्कार ट्रस्टने ता. २ डिसेंबर २००५ रोजी वार्ताहर परिषद घेऊन जाहीर केले. चालू वर्ष 'समाजकार्य पुरस्कार योजने'चे दहावे वर्ष असल्याने ५०,०००/- रु.चा विशेष पुरस्कार समाजकार्य करणाऱ्या ज्येष्ठ व्यक्तीला द्यावा, असे ठरले. श्री. लीलाधर हेगडे यांची त्यांनी आयुष्यभर केलेल्या समाज प्रबोधनाच्या कार्याकरता या विशेष पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

या पुरस्कारांबरोबरच २००४ या वर्षापासून श्री. सुहास वराडकर आणि श्रीमती संगीता वराडकर यांच्या देणगीतून संस्थेसाठी एक 'समाजकार्य पुरस्कार' दिला जात आहे. एक लाख रुपये व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

स्मरणिकेत अन्यत्र दिलेल्या आजपर्यंत पुरस्कार मिळालेल्या व्यक्तींची निवड पाहाता हे लक्षात यावे की जसे मुंबईसारख्या शहरांतील श्री. जयंत गडकरी, मरहूम हुमायून अब्दुलअली यांसारख्या नेहमीच प्रकाशात असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या कार्याकरता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, तसेच महाराष्ट्राच्या सर्वदूर विभागांत कार्य करणाऱ्या श्रीमती भुरीबाई शेमळे, श्री. आसवले मामा, श्री. बापूसाहेब म्हेत्री यांसारख्या व्यक्तींचा सन्मान करून त्यांच्या समाजकार्याला प्रकाशात आणण्याचे काम या योजनेने केले आहे, याचे आम्हाला अतिशय समाधान आहे.

समाजकार्य गौरव पुरस्कार योजनेच्या गेल्या दहा वर्षांच्या कार्यवाहीच्या काळात वर उल्लेख केल्याप्रमाणे जे काही सामाजिक प्रश्न पुढे आले, त्यांमध्ये सांप्रदायिकतेचा देशभर वाढलेला प्रभाव लक्षात घेऊन काही विशिष्ट कार्यक्रम आखून सांप्रदायिकतेविरुद्ध कार्य करणाऱ्या काही तरुणांना साहाय्य होईल, अशा प्रकारचा प्रयत्न या योजनेखाली काही काळ कार्यान्वित झाला. श्रीमती तिस्ता सेटलवाड यांची पुरस्काराकरता केलेली निवड हाही समितीच्या त्याच दृष्टिकोनाचा एक भाग होता.

'योजना' सुरू होतानाच्या काळात पर्यावरणाच्या संरक्षणाच्या प्रश्नाला जशी जागतिक परिमिती प्राप्त झाली होती, तसाच त्या प्रश्नाचा स्थानिक संदर्भही महत्त्वाचा झाला होता. त्या दृष्टीने 'निरीड' सारखी लक्षावधी झाडांची लागवड करणारी व पाणलोट क्षेत्रात काम करणारी संस्था, किंवा 'पाटबंधाऱ्यातून मिळणाऱ्या पाण्याच्या न्याय्य वाटपा'च्या जागतिक बँकेने गौरविलेल्या पद्धतीचे प्रणेते भरत कावळे, यांसारखे कार्यकर्ते पुरस्काराने सन्मानित झाले. तर अंधश्रद्धा निर्मूलनाच्या द्वारे प्रबोधनाचे काम करणाऱ्या 'अंनिस' या संस्थेला पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबरोबरच परित्यक्त स्त्रियांचा प्रश्न समाजापुढे प्रकर्षाने आणण्याकरता कायावाचे श्रमणाऱ्या श्रीमती विजया चौक यांना पुरस्कार देण्यात आला.

दरम्याने गुजरातचे अल्पसंख्याकांचे हत्याकांड, महाराष्ट्रात योजनापूर्वक केलेले जातीय दंगे, यासारख्या सांप्रदायिक शक्तींनी निर्माण केलेला सामाजिक उद्रेक हा सामाजिक प्रश्नांमध्ये महत्त्वाचा प्रश्न बनला. त्यामुळे अलीकडच्या काळात मुस्लीम समाजामध्ये पुरोगामी विचार रुजविण्याचे काम करणाऱ्या रेहाना बैलीम, रज़िया सुलताना, रज़िया पटेल, गुजरातमधील हत्याकांडातील गुन्हेगारांना योग्य ती शिक्षा व्हावी यासाठी जिवाचे रान करणाऱ्या श्रीमती तिस्ता सेटलवाड यांना पुरस्कार प्रदान करून समाजाला वाटणारे त्यांच्याविषयीचे ऋण समाजाच्या वतीने आपण मान्य केले. खरे तर पुरस्कार मिळालेल्या काही संस्था व व्यक्ती यांच्या बाबतीत त्यांच्या कार्याचे महत्त्व व आवाका लक्षात घेता 'समाज गौरव पुरस्कार योजने'ला त्यांनीच सन्मानित केले आहे, असे म्हणणे युक्त होईल.

'योजने'ला या वर्षी दहा वर्षे होत आहेत, या घटनेचे निमित्त करून केशव गोरे स्मारक ट्रस्टने 'महाराष्ट्र जागरा'चा कार्यक्रम आयोजिला; व त्यामध्ये महाराष्ट्राच्या विविध भागांत ऐरणीवरच्या प्रश्नांची त्या त्या भागांतील लोकांशी चर्चा केली. पाण्याचा प्रश्न व शासनाचे शैक्षणिक धोरण या प्रश्नांची चर्चा अनुक्रमे श्री. दत्ता देसाई व श्री. अरविंद वैद्य यांच्या मांडणीच्या अनुरोधाने झाली. पाण्याच्या प्रश्नामागे जे जागतिक अर्थ-राजकारण आहे, त्याची मीमांसा श्री. देसाई यांनी मांडली. तर भा.ज.प. प्रणित शिक्षणाच्या भगवीकरणातून निर्माण होणारी परिस्थिती, भारतातील मूळच्या आर्थिक व सामाजिक विषमतेमुळे जागतिकीकरणाचे शिक्षणाच्या संधीवर होणारे परिणाम व पुरोगामी आघाडीच्या शासनाने आपल्या जाहीरनाम्यात मांडलेल्या धोरणाचा (विशेषत: शिक्षणावर होणाऱ्या खर्चामध्ये ६ टक्केपर्यंत करावयाच्या वाढीचा) पाठपुरावा करण्यासाठी दडपण तयार करण्याची भूमिका, श्री. वैद्य यांनी आपल्या चर्चेतून मांडली. शिवाय युवक-युवतींचे मेळावे, सांप्रदायिकता व सामाजिक प्रश्न मांडणारे चित्रपट, लघुपट व त्याच प्रश्नांवरची पोस्टर प्रदर्शने, असेही कार्यक्रम वरील चर्चेच्या

विषयांना जोडले होते. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्राचा काही भाग, पेण, रोहा, चिपळूण, लांजा, कुडाळ, सांगली, सातारा, सासवड, नाशिक, संगमनेर वगैरे गावांमध्ये 'महाराष्ट्र जागरा'चा कार्यक्रम पोचला होता. महाराष्ट्र जागराचे संयोजकत्व श्री. दत्ता बाळसराफ यांनी सांभाळले होते.

दर वर्षीच्या स्मरणिकेमध्ये सर्वसाधारणपणे ज्या क्षेत्रातील संस्था पुरस्कार प्रदान करण्याकरता निवडलेली असते, त्या क्षेत्रातील प्रश्नांची सैद्धांतिक पातळीवर चर्चा करणारे प्रथितयश लेखकांचे तीन लेख असतात. या लेखांच्या यादीचा या स्मरणिकेच्या अखेरीला अंतर्भाव केला आहे. त्यातील लेखांचे जरी विषय विचारात घेतले तरी या योजनेचे संयोजक गेली दहा वर्षे करीत असलेला स्मरणिकेचा हा प्रपंच किती गांभीर्याने करीत आहेत, हे वाचकांच्या लक्षात येईल.

या योजनेखाली रुग्णांची शिबिरे घेणारे डॉक्टर्स, सेवाभावी काम करणाऱ्या संस्था किंवा अपंगांसाठी कार्य करणाऱ्या संस्था यांसारख्यांचे कार्य सामाजिक कार्य म्हणून समाजोपयोगी असले, किंवा नियुक्त अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शाळा कितीही प्रतिकूल परिस्थितीमध्ये कार्य करीत असल्या तरी त्यांचा अंतर्भाव अद्यापपर्यंतच्या निवडींमध्ये झालेला दिसत नाही, हे खरे. परंतु शिक्षण क्षेत्रामध्ये नवी वाट दाखविणाऱ्या श्रीमती लीला पाटील यांच्यासारखे शैक्षणिक प्रयोग करणारे, किंवा शिक्षणाची कौटुंबिक पार्श्वभूमी नसणाऱ्या झोपडपट्टीतील किंवा आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांकरता गणित, विज्ञान विषय सोपे वाटावेत म्हणून वेगळी अध्यापन पद्धती व साधने यांचे संशोधन करणारे व त्यांचा प्रसार करणारे डॉ. विवेक माँटेरो, यांसारख्या व्यक्तींचा, त्यांच्या शिक्षणक्षेत्रातील कार्याचा यथोचित गौरव करून समितीने अशा कार्यकर्त्यांचे सामाजिक ऋण मान्य केले आहे.

या 'योजने'च्या निमित्ताने, विशेष सामाजिक दृष्टी ठेवून काम करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना त्यांचा जाहीर सत्कार करून सन्मानित करण्याचे ट्रस्टने अलीकडेच ठरविले. त्या निर्णयाप्रमाणे २००४च्या पुरस्कार वितरणाच्या समारंभामध्ये धुळे जिल्ह्याला २ वर्षांच्या अवधीत नियोजित पद्धतीने टँकरमुक्त करणारे श्री. विलास ठाकूर या प्रशासकांचा व श्री. दिलीप बंड या जिल्हाधिकाऱ्यांचा ट्रस्टने जाहीर सत्कार केला.

या योजनेतील पुरस्कार निवडीकरता ट्रस्टने जी समिती गठित केली आहे, त्यातील एक-दोन सभासद वगळता सर्व सभासदांनी सलग दहा वर्षे निवडीचे काम केले आहे. गेली दहा वर्षे समाजकार्य गौरव पुरस्कार योजनेच्या यशाचे श्रेय सल्लागार समितीच्या चोखंदळ निवडीला जाते. या समितीचे सभासद समाजकार्याच्या त्या त्या क्षेत्रात समर्पण वृत्तीने कार्य करणाऱ्या अशा व्यक्ती आहेत. त्यांनी समाजकार्यातील त्यांचा आयुष्यभरचा अनुभव पुरस्कारासाठी करावयाच्या निवडीच्या कामात वापरल्यामुळे आजपर्यंतच्या सर्व निवडीचे सर्वांनी स्वागत केले. या त्यांनी ट्रस्टला दिलेल्या सहकार्याबद्दल ट्रस्ट त्यांचा ऋणी आहे.

ट्रस्टने या सल्लागार समितीचे पुनर्गठन केल्यावर त्यामधील सभासदांची नावे ट्रस्ट यथावकाश जाहीर करील.

'समाजकार्य गौरव पुरस्कार योजने'ने लक्ष्य केलेली समाजकार्याची जी क्षेत्रे आहेत, त्यांतील प्रश्नांचे स्वरूप खूप बदलले असल्याचा, काही नवीन प्रश्न पुढे आले असल्याचा वर उल्लेख आहे. या वस्तुस्थितीचा विचार करून या 'योजने'च्या स्वरूपात काही बदल करावा का ? किंवा, आजच्या योजनेचा आशय तसाच ठेवून तिचे स्वरूप असे बदलता येईल का की ज्यायोगे या योजनेची वर उल्लेखिलेली उद्दिष्टे अधिक प्रभावीपणे कार्यान्वित होतील ? असे प्रश्न आमच्या मनात गेली दोन वर्षे घोळत आहेत. त्या दृष्टीने ज्या संस्थांना व व्यक्तींना गेल्या नऊ वर्षांत पुरस्कार मिळाले होते, अशांकडून बदलांविषयी सूचना मागविल्या होत्या. परंतु अद्यापपर्यंत त्या प्रयत्नाला यश आलेले नाही. आम्ही योजनेमध्ये काही महत्त्वाचे बदल करावयाचे ठरविल्यास त्यांविषयी आमच्या सहप्रवाशांना यथावकाश कळवूच.

या दहा वर्षांच्या अवधीत सामाजिक चळवळीची फार मोठी हानी करणाऱ्या दोन दुःखद घटना घडल्या. त्याविषयी वाटणारी सल येथे व्यक्त केल्याशिवाय हे निवेदन पूर्ण करता येणार नाही. श्री. मनोहर कदम व श्री. माधव साठे या दोन तरूण व्यक्ती या काळात कालवश झाल्या. मनोहर कदम यांना त्यांच्या समाज प्रबोधनाच्या कार्याबद्दल पुरस्कार जाहीर झाला, त्याच दरम्यान त्यांचे अकाली निधन झाले. मनोहर कदम यांच्या जाण्याने पुरोगामी विचारांच्या प्रबोधनाच्या क्षेत्राचे अपरिमित नुकसान झाले. बरेच काही लिहायचे, सांगायचे त्यामुळे राहून गेले.

माधव तर या 'योजने'चा काही काळ निमंत्रकच होता. देशभरच्या सामाजिक कार्यकर्त्यांशी त्याचा जवळचा, सततचा संपर्क असे. व त्यामुळे त्या काळात आमचे, शिफारस समितीचे काम सहजगत्या पार पडत असे. माधवच्या जाण्याने त्याचे अनेक मित्र तर दुःखी झालेच, परंतु केशव गोरे स्मारक ट्रस्टचे त्यामुळे न भरून येणारे नुकसान झाले.

**चंद्रकांत केळकर**

समारंभाचे अध्यक्ष

# प्रा. केशव मेश्राम



केशव मेश्राम हे स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य क्षेत्रातले ज्येष्ठ व महत्त्वाचे लेखक आहेत. दलित साहित्य-प्रवाहात त्यांनी आपल्या वेगळेपणाचा ठसा उमटवला आहे. कथा, कविता, कादंबरी, समीक्षा, ललित लेखन, बालसाहित्य असे चौफेर लेखन करत असतानाच वैचारिक क्षेत्रात प्रगल्भ दृष्टिकोनातून ते आपली भूमिका मांडत असतात.

केशव मेश्राम मूळचे वऱ्हाडातील. अकोला हे त्यांचे गाव. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांना बालपण कंठावे लागले. परंतु वाचनाची आवड आणि अभिव्यक्तीची आस यांमुळे लवकरच त्यांनी आपली लेखणी चालवायला सुरुवात केली. त्यांच्या कवितेतील सामाजिक विद्रोहाची आणि वेदनेची रूपे दलित साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण ठरली. लवकरच मेश्राम यांना शिक्षकी पेशात प्रवेश करण्याची संधी मिळाली. ते मराठीचे प्राध्यापक झाले. १९९७ पर्यंत ते मराठी साहित्याचे पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर अध्यापन करत होते. मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख म्हणून ते निवृत्त झाले.

केशव मेश्राम यांची साहित्य-संपदा अफाट आहे. 'हकिकत' आणि 'जटायू' या त्यांच्या आत्मकथनात्मक कादंबऱ्या आहेत. प्रस्थापित व्यवस्थेत शोषित वर्ग कसा नाडला जातो आणि विद्रोहापर्यंतचा त्याचा प्रवास कसा प्रखरपणे होत जातो, याचे समर्थ चित्रण या दोन कादंबऱ्यांमधून केशव मेश्राम यांनी केले आहे. त्यांची 'पोखरण' ही कादंबरी इतिहासपूर्व काळातील आर्य आणि अनार्य यांच्यातील संघर्ष दाखवते. ही मराठीतील एक वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे. याशिवाय 'खरवड', 'पत्रावळ', 'धगाडा', 'मरणमाळा', 'आमनेसामने', 'कोळिष्टके', 'आसूडवळ', 'खांडववन' ह्या त्यांच्या कथासंग्रहांतून सुमारे ८० कथा प्रकाशित झाल्या आहेत. प्रा. म. द. हातकणंगलेकर यांनी केशव मेश्राम यांच्या निवडक कथा 'ज्वालाकल्लोळ' या पुस्तकात संपादित केल्या आहेत. १९७७ साली त्यांचा 'उत्खनन' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. तो बहुचर्चित ठरला. त्यानंतर त्यांचे 'जुगलबंदी', 'अकस्मात', 'चरित', 'कृतकपुत्र' हे कवितासंग्रह प्रकाशित झाले. त्यांच्या 'उत्खनन' आणि 'चरित' या संग्रहांना राज्य शासनाचे पुरस्कारही मिळाले आहेत. याशिवाय 'छायाबन', 'रुतलेली माणसे', 'गाळ आणि आभाळ', 'गळतीचे क्षण', 'ओलाव्यातले ठसे' हे त्यांचे ललित लेखसंग्रह प्रकाशित झाले आहेत. या पुस्तकांमधील त्यांचे लेखन व्यक्तिचित्रे, प्रसंगचित्रे, चिंतनपर, कथनपर अशी विविध रूपे धारण करते. एक समीक्षक म्हणूनही केशव मेश्राम यांनी आपला ठसा उमटवला आहे. 'विद्रोही कविता' आणि 'दलित साहित्याची स्थिती-गती' ही त्यांनी संपादित केलेली दोन पुस्तके त्यांच्या चिंतनशील वृत्तीची साक्ष आहेत. या पुस्तकांच्या त्यांच्या प्रस्तावना अभ्यासपूर्ण आहेत.

केशव मेश्राम ज्या शोषित समाजातून आले, त्या समाजाची सुख-दु:खे, व्यथा-वेदना त्यांनी आपल्या लेखनातून मांडल्या. त्यांच्या साहित्याचा आशय विद्रोहात्मक आहे. पण केवळ दलित लेखक म्हणून केशव मेश्राम यांचे लेखनकर्तृत्व मर्यादित करता येत नाही. त्यांचे लेखन निखळ मानवतेला साद घालणारे आहे. समाजातील एकूणच पददलित वर्गाचा स्वर त्यात उमटलेला दिसतो. म्हणूनच त्यांचे लेखन खऱ्या अर्थाने 'अक्षर वाङ्मय' ठरले आहे.


केशव मेश्राम यांना आजवर अनेक मान-सन्मान, पुरस्कार मिळाले. साहित्याकडे ते एक 'चळवळ' म्हणूनच पाहतात. पुरोगामी विचाराच्या लेखकांसह 'प्रगत साहित्य सभा' त्यांनी काही काळ चालवली. सध्या ते 'प्रागतिक विचार संसद' या संस्थेचे अध्यक्ष आहेत. या संस्थेतर्फेच गंगाधर पानतावणे यांनी सुरू केलेले 'अस्मितादर्श' हे त्रैमासिक चालवले जाते.

केशव मेश्राम यांची ७८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली. हा त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा झालेला अत्युच्च सन्मान होता. उत्कृष्ट वक्ता, ज्येष्ठ लेखक आणि प्रगतिशील विचारवंत म्हणून केशव मेश्राम आजही कार्यरत आहेत. एकूणच मराठी साहित्य-धारेत मेश्राम यांच्या कर्तृत्वाचा वाटा अजोड आहे.

**नितीन रिंढे**

समारंभाचे प्रमुख पाहुणे

# आशुतोष गोवारीकर



वयाच्या अवघ्या एकेचाळिसाव्या वर्षी आशुतोष गोवारीकर यांनी एक यशस्वी, बुद्धिमान आणि संवेदनशील चित्रपट दिग्दर्शक म्हणून आपल्या नावाची ठळक मोहोर भारतीय चित्रपटसृष्टीवर उमटवली आहे. ही किमया गेल्या चार वर्षांत त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'लगान' (२००१) आणि 'स्वदेस' (२००४) या दोन चित्रपटांनी घडवलेली आहे. 'लगान'चे अभूतपूर्व यश आणि त्याने परदेशी भाषेतल्या सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठी मिळवलेले ऑस्कर नामांकन, हे भारतीय चित्रपटांच्या इतिहासातील एक रोमहर्षक प्रकरण आहे. स्वातंत्र्यपूर्व भारतातल्या एका खेड्यातले धोतर नेसणारे गावकरी 'लगान'चे नायक आहेत. बलाढ्य ब्रिटिश सत्तेच्या जुलमी धोरणांविरुद्ध एकत्र येत ते एक प्रतिकात्मक क्रिकेट सामना जिंकतात, या हिंदी सिनेमाच्या रूढ चौकटीत न बसणाऱ्या कथेने संपूर्ण देशातले जनमानस जिंकून घेतले. 'लगान'नंतर आलेल्या, गोवारीकर यांनी स्वत:च निर्मिलेल्या 'स्वदेस'नेही ही अपारंपरिक पटकथेची परंपरा सुरू ठेवली. परदेशात 'नासा' संस्थेत काम करणारा भारतीय शास्त्रज्ञ भारतातील खेड्यात विधायक कार्य करण्यासाठी परत येतो, या विषयावरच्या या चित्रपटाचे आर्थिक यश, 'लगान'च्या तुलनेत कमी भासले तरी त्याने चित्रपटरसिकांची, जाणकारांची आणि समीक्षकांची वाहवा मिळवली.

या दोन्ही चित्रपटांच्या पटकथाही गोवारीकरांच्या आहेत. आणि त्यांच्याकडे एकत्रित नजर टाकल्यास एक गोष्ट प्रकर्षाने दिसून येते, की हिंदी चित्रपटसृष्टीच्या प्रचंड आणि विस्मयकारी आर्थिक उलाढालींच्या मोहमयी दुनियेत, आशुतोष गोवारीकर आपले निखळ भारतीयत्व घेऊन ठामपणे उभे आहेत. आपल्या देशाच्या, देशातील खेडोपाड्यांतल्या लक्षावधी सामान्य जनतेच्या समस्यांनी अंतर्यामी अस्वस्थ असलेले ते एक देशी वाणाचे चित्रपट दिग्दर्शक आहेत.

गोवारीकरांचे आजचे हे स्थान मात्र त्यांना सहज आणि आपोआप मिळालेले नाही. १५ फेब्रुवारी १९६४ रोजी जन्मलेल्या गोवारीकरांनी मुंबईतल्या मिठीबाई कॉलेजातून रसायनशास्त्र शाखेतली पदवी घेतली. कॉलेजमध्ये असताना नाटक-लोकनृत्ये-संगीत आदी कार्यक्रमांतून त्यांचा सततचा सहभाग असे. यातून त्यांना या क्षेत्राची ओढ लागली आणि पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्या ओढीमुळे ते मॉडेलिंग, दूरदर्शन मालिका या क्षेत्रांत उमेदवारीसाठी दाखल झाले.

त्यांना दिग्दर्शनाची पहिली संधी १९९३ मध्ये मिळाली. 'पहला नशा' हा त्यांचा पहिला चित्रपट एक रहस्यपट होता. त्यास फारसे यश मिळाले नाही. त्यानंतर आला 'बाजी' (१९९५) हा थरारपट. त्यालाही मर्यादित यशच मिळाले. पण या दोन चित्रपटांमुळे त्यांची दिग्दर्शक म्हणून या माध्यमावरची पकड निश्चित झाली. यातून आलेल्या आत्मविश्वासातून बहुधा त्यांनी त्यांना स्वत:ला हव्या असलेल्या पटकथेचा शोध घ्यायला सुरुवात केली. 'लगान'ची कल्पना त्यांना १९९६मध्ये सुचली व तिच्यावर सतत चार वर्षे काम करून त्यांनी तिला 'शूटिंग स्क्रिप्ट'चा अंतिम आकार दिला. सुरुवातीला ही पटकथा आमिर खानला फारशी पसंत पडली नव्हती. काही काळानंतर मात्र त्याला या चित्रपटाची निर्मितीही करावीशी वाटली. यानंतर घडलेला इतिहास सर्वज्ञात आहे. एखाद्या चित्रपटाच्या निर्मितीच्या सर्व टप्प्यांचा आढावा घेणारे 'द मेकिंग ऑफ लगान'सारखे पुस्तक प्रकाशित होण्याची घटनाही बहुतेक भारतीय चित्रपटांच्या संदर्भात प्रथमच घडली असावी.

ज्येष्ठ हिंदी कवी विष्णू खरे यांनी 'स्वदेस'वर लिहिताना आशुतोष गोवारीकर यांचे हृदय योग्य ठिकाणी असल्याचे विधान केलेय. हे हृदय त्याच ठिकाणी राहील आणि आपल्याला त्यांच्याकडून असेच दर्जेदार व अभिरुचिसंपन्न चित्रपट पाहायला मिळतील अशी खात्री बाळगण्यास हरकत नसावी.

**जयप्रकाश सावंत**



# महाराष्ट्रातील पर्यावरण संरक्षण-संवर्धन चळवळींची वाटचाल

■ विजय दिवाण

गेल्या दहाबारा वर्षांमध्ये जागतिक स्तरावर पर्यावरण चळवळीची मोठी पीछेहाट झालेली आहे. त्या पीछेहाटीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील पर्यावरण संरक्षण-संवर्धन चळवळींच्या वाटचालीचा विचार केला पाहिजे. १९९२ साली ब्राझीलमधील 'रिओ द् जानेरो' येथे पहिली पर्यावरणविषयक पृथ्वीपरिषद झाली. त्या परिषदेने दिलेल्या 'अजेंडा-२१' या कार्यक्रमाच्या मसुद्यामुळे अवघ्या जगात पर्यावरणीय सुधारणांबाबतच्या अपेक्षा जागवल्या गेल्या होत्या. विकसित राष्ट्रांच्या विकासप्रक्रियेमुळे पृथ्वीच्या पाठीवरील नैसर्गिक संसाधनांची सातत्याने झालेली हानी निदान आता तरी थांबेल आणि पर्यावरणीय सुधारणा व निरंतर विकास यांना देशोदेशीच्या सरकारांचे राजकीय पाठबळ मिळेल अशी पर्यावरणवादी कार्यकर्त्यांना आशा होती. परंतु प्रत्यक्षात तसे काही घडले नाही. १९९२ पासून आजपर्यंतच्या तेरा वर्षांच्या काळात जागतिक पातळीवर पर्यावरणाचा हा ऱ्हास थांबण्याऐवजी उलट उत्तरोत्तर वाढतच गेला आहे आणि तो थांबवण्यासाठी कोणत्याही देशाचे शासन ठामपणे पुढे आलेले नाही असे आज दिसते. रिओ परिषदेनंतर २००२ साली दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे दुसरी पृथ्वीपरिषद झाली. मात्र दुसऱ्या परिषदेतून फारसे काही निष्पन्न होणार नाही असे त्या परिषदेच्या खुद्द प्रवर्तकांनाच वाटले होते आणि तसेच घडले. एक फसलेली परिषद म्हणून तिची नोंद पर्यावरणाच्या इतिहासात झाली. पहिल्या पृथ्वीपरिषदेच्या 'अजेंडा-२१' मधील कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आलेले दारुण अपयश हे जोहान्सबर्ग येथील दुसरी परिषद फसण्याचे मुख्य कारण होय.

१९९२ सालच्या रिओ परिषदेनंतर जागतिक समुदायाने अनुपालनासाठी म्हणून ज्या काही गोष्टी जन्माला घातल्या त्यात 'क्योटो करार' हा महत्त्वाचा होता. कारखाने आणि वाहने यांतून वातावरणात सोडल्या जाणाऱ्या प्रदूषणकारी वायूच्या मात्रेवर निर्बंध लादणारा हा करार होता. वातावरणाचे प्रदूषण घडवण्यास जगातील इतर राष्ट्रांपेक्षा अमेरिकेसारखी विकसित राष्ट्रे हीच कैकपटींनी जबाबदार होती. त्यामुळे विकसनशील राष्ट्रांआधी विकसित राष्ट्रांनीच या कराराचे पालन कसोशीने करण्याची गरज होती. परंतु हे जागतिक मत धुडकावून लावून अमेरिकेने 'क्योटो करारा'ची बंधने पाळण्याचे नाकारले आणि त्यातून अंग काढून घेतले. क्योटो कराराप्रमाणेच जगातील जैवविविधतेच्या रक्षणासाठीचा एक प्रस्ताव जागतिक समुदायाने मांडलेला होता. तोही अमेरिकेने नाकारला. ह्याच वर्चस्ववादी दृष्टिकोनातून १९९५ साली जोहान्सबर्ग येथील पृथ्वीपरिषदेला अनुपस्थित राहून अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी पर्यावरणीय

सुधारणांविषयीची अमेरिकेची नकारात्मक भूमिका सरळ प्रकट केली. ही जगातील भांडवलशाही देशांनी पर्यावरण सुरक्षेची जबाबदारी झटकून टाकण्याची नांदीच ठरली. गेल्या दशकात अमेरिकेने व काही युरोपीय देशांनी जैवविविधतेचे रक्षण, जैवतंत्रज्ञानाची व्यापारी वाढ, जनुकीय संशोधनातील अनैतिक व्यवहार, नैसर्गिक संसाधनाचा अतिरिक्त व्यय ह्या व अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टींबाबत व्यापारी दृष्टिकोन ठेवून पर्यावरणविरोधी भूमिका घेतलेली दिसते. गेल्या दशकात जगातल्या भांडवलदारी राष्ट्रांमध्ये असलेली मंदीची लाट, त्या राष्ट्रांनी आर्थिक उदारीकरणाच्या आणि व्यापाराच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियांना दिलेला प्रचंड वेग, ११ सप्टेंबर २००१ रोजी न्यूयॉर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेल्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरात अमेरिकेने तिसऱ्या जगात वाढविलेल्या लष्करी हालचाली आणि अफगणिस्तान व इराकमध्ये छेडलेले युद्ध या सर्व घडामोडींनी विकसनशील आशियाई राष्ट्रांच्या पर्यावरणसुरक्षेच्या व्यवस्थांना मोठा धोका निर्माण केला. १९९१ मधील खाडीयुद्धाच्या काळात इंधनतेलाच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे भारतापुढे मोठे आर्थिक संकट उभे राहिले होते. त्यानंतर भारताने आर्थिक उदारीकरणाच्या आणि व्यापाराच्या जागतिकीकरणाच्या वाटेने जाण्याचे ठरवले. अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी गुंतवणुकीवरील निर्बंध काढून टाकणे, थेट परकीय गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे, सार्वजनिक उद्योगांतील निर्गुंतवणुकीला चालना देणे, उद्योगाचे खासगीकरण वाढवणे, आयातीवरील निर्बंध काढून टाकणे, ह्या व अशा अनेक गोष्टी भारताने गेल्या दहा वर्षांमध्ये अंमलात आणल्या. बहुशाखीय औद्योगिकीकरण, माहिती-तंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअरमधील विकास आणि वाढती परकीय गुंतवणूक ही आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या गाडीची चाके बनली. शेती व पर्यावरण ही क्षेत्रे दुर्लक्षित झाली. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात आज शेतीचा वाटा केवळ २५ टक्के आहे, तर उद्योग आणि सेवा क्षेत्राचा वाटा अनुक्रमे ३४ टक्के आणि ५१ टक्के आहे. अशा रीतीने गेल्या दहा वर्षांच्या काळात भारतात जे मुक्त व्यापाराचे, परकीय गुंतवणुकीचे आणि आर्थिक उदारीकरणाचे सत्र सुरू झाले आहे, त्यामुळे येथेही पर्यावरणीय सुधारणांच्या शक्यता दुरावत चाललेल्या दिसतात.

भारतातल्या इतर घटकप्रदेशांच्या तुलनेत महाराष्ट्र हा जास्त पुढारलेला आणि सुसंस्कृत आहे असे आपण मानत होतो. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये घडत गेलेल्या काही घटनांमुळे ती समजूत किती चुकीची होती हे स्पष्ट झाले आहे. जसजसे शहरीकरण वाढत गेले तसतसा ग्रामीण मराठी माणूस हा त्याच्या खेड्यांपासून दूर होत गेला आणि शहरांकडे झेपावला. शहरांमध्ये असलेल्या आधुनिकतेच्या झगमगाटातच आपल्याला काही भवितव्य आहे असे त्याला वाटू लागले. माती, पाणी, शेती, झाडेझुडे, गुरेढोरे या त्याच्या मूलभूत साधनसंपत्तीपासून तो दुरावत गेला. निसर्ग तुटला, त्यासोबत जगण्यामागचे साहजिक निसर्गसूत्र आणि निसर्गनियमांमागचे विज्ञानही त्याच्यापासून तुटून अलग झाले. त्यामुळे अज्ञान, गरिबी, अनारोग्य, यांबरोबरच बेरोजगारी, गुन्हेगारी, विकृती आणि दैववाद यांच्या दुष्टचक्रात तो अडकत चालला आहे. आज महाराष्ट्रातील पर्यावरणाबाबतच्या भेडसावणाऱ्या समस्यांमध्ये जंगलतोड, मातीची धूप, अतिरिक्त चराई, जमिनीचे वाळवंटीकरण, जैवविविधतेचा ऱ्हास, सागरी जैवसंस्थेची हानी, कारखाने आणि वाहने यांमुळे होणारे हवेचे प्रदूषण, शेतीतील व कारखान्यांतील सांडपाण्याने होणारे जलप्रदूषण, पेयजलाची क्षती व प्रदूषण, लोकसंख्यावाढ आणि त्यामुळे नैसर्गिक संसाधनांवर पडणारा ताण, ह्या प्रमुख समस्या आहेत. या राज्यात पूर्वी अस्तित्वात असलेल्या जंगलाचा फार मोठा हिस्सा काळाच्या ओघात नष्ट झाला आहे. महाराष्ट्रातले वनाच्छादन एकूण ४७ हजार ४८२ चौरस किलोमीटर किंवा ६३ लाख हेक्टर एवढे आहे. त्याचे प्रमाण एकूण भूभागाच्या १७% भरते. मात्र त्यापैकी ३० हजार ८९४ चौरस किलोमीटर एवढेच जंगल घनदाट असून त्याची शिखरीय घनता ४०% आहे. उर्वरित १६ हजार ९८८ चौरस किलोमीटर हे 'खुल्या जागेतले' जंगल असून त्याची शिखरीय घनता १०% ते ४०% या दरम्यानची आहे. राज्यातल्या एकूण जंगलांमध्ये १६% राखीव जंगल, १४% संरक्षित जंगल आणि १०% अवर्गीकृत जंगल आहे. परंतु राखीव आणि संरक्षित जंगलांमध्येही आज मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होत आहे. रॉकेल, गॅस इत्यादी पेट्रोलियमजन्य इंधने वरचेवर महाग होत असल्यामुळे भारतातील लोकांनी अन्न शिजवण्यासाठी पुन्हा एकवार मोठ्या प्रमाणावर लाकूड आणि वृक्षजन्य जळण वापरण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्राच्या खेडोपाडी आजही सुमारे ७५ टक्के जनता जळण म्हणून लाकडांचाच उपयोग करते. शहरांमध्येही सुमारे ३५ टक्के लोक स्वयंपाकासाठी तुलनेने स्वस्त म्हणून किरकोळ लाकूडफाटा वापरतात. पेट्रोलियम पदार्थांवरची सबसिडी कमी करत जाण्याच्या सरकारच्या धोरणामुळे यापुढे रॉकेल आणि गॅसच्या किंमती जसजशा वाढत जातील तसतसा जळाऊ लाकडांसाठीचा जंगलांवरचा भारही वाढत जाईल. महाराष्ट्रात आज जंगलांची प्रतिवर्षी जळण देण्याची जी क्षमता आहे, त्यापेक्षा जळणासाठी वापरल्या जाणाऱ्या लाकडाचे प्रमाण पाचपटीने जास्त आहे. या गतीने एका वर्षात तेवढे जंगल पुन्हा निर्माण होऊ शकत नाही.

पश्चिम घाटातल्या मूलत: दर्जेदार असणाऱ्या नैसर्गिक जंगलांची गुणवत्ता उलट मोठ्या प्रमाणात ढासळली आहे. नैसर्गिक

व्यवस्थेत परस्परसाहचर्य राखणाऱ्या विशिष्ट वृक्षप्रजातींची संख्या घटली असून जुनी जंगले विरळ होत गेली आहेत. त्याचे दूरगामी परिणाम आता दृष्य होत आहेत. उदाहरणार्थ, पश्चिम घाटातील जमिनीची प्रचंड प्रमाणात धूप होत आहे. पाणी घटत चालल्याने सततचे तीव्र दुर्भिक्ष जाणवू लागले आहे. उपजीविकेसाठी मोठ्या प्रमाणात जंगलांवर अवलंबून असणाऱ्या आदिवासींची आणि जंगलपरिसरातील खेडुतांची जगण्याची साधने हिरावून घेतली जात आहेत. महाराष्ट्राच्या विकास प्रक्रियेत जळणासाठी लाकूडफाटा, विकण्यासाठी किरकोळ वनोपज, जनावरांसाठी चारा आणि पिण्यासाठी पाणी ह्या गोष्टी शोधून आणणाऱ्या ग्रामीण स्त्रियांचा वाटा खरे तर फार मोठा आहे. बहुसंख्य खेड्यांमधील परंपरेने चालत आलेली ग्रामीण अर्थव्यवस्था ही स्त्रियांच्या कष्टांवरच आधारलेली आहे. म्हणूनच जंगलांच्या विनाशामुळे आपल्या या पारंपरिक ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आणि स्त्रियांवरही मोठा आघात झाला आहे. गरीब खेडूत स्त्रियांना आणि तरुण मुलींना जळणाचे लाकूड आणि पिण्याचे पाणी आणण्यासाठी दिवसाचे पाच-सहा तास घालवावे लागतात. लाकडे जाळून पेटवलेल्या चुलीपुढे बसल्यामुळे धूर, आगीतून उत्सर्जित होणारे सूक्ष्मकण आणि कार्बनचे कण यांच्या प्रदूषणालाही त्या सतत सामोरे जात असतात. वाढत्या जंगलतोडीचेच हे दुष्परिणाम आहेत. औद्योगिक वापरासाठीची लाकडाची मागणी आणि जंगलांच्या क्षेत्रांत होणारी चराई या गोष्टींचाही ताण आपल्या जंगलावर जास्त आहे. ग्रामीण भागांतल्या लोकांकडून जसा जळणासाठी जंगलावर भार पडतो आहे तसा शहरांमध्ये वाढत्या मांसाहारासाठी लागणाऱ्या कत्तलयोग्य जनावरांच्या वाढत्या चाऱ्याचा भारही जंगलांवरच आहे. तसेच जंगलभूमीवर बिनदिक्कत उभे केले जाणारे धरणप्रकल्प, कालवे, रस्ते, रेल्वेमार्ग, खाणप्रकल्प या गोष्टीही ऱ्हासास तितक्याच कारणीभूत आहेत. राखीव आणि संरक्षित वनांमध्ये वन्यजीवांच्या उपजीविकेसाठी आवश्यक असणाऱ्या अन्नसाखळीचे जतन होणे हे महत्त्वाचे आहे; ते होत नसल्यामुळे गेल्या दशकात माळढोक हा पक्षी जास्तच दुर्मिळ झाला आहे. तसेच शेकरू, सांबर, लंगूर वानर, अस्वल यांसारख्या अनेक वन्यजीवांच्या अस्तित्वाला धोका उत्पन्न झालेला आहे. महाराष्ट्रात व्याघ्र प्रकल्पाची अंमलबजावणी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे, तरीही पट्टेदार वाघांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. मानवी वस्त्यांचे जंगलांवर होणारे वाढते आक्रमण हेही महाराष्ट्रातील वन्यजीवांसाठी धोकादायक ठरत आहे.

महाराष्ट्रातील जंगलांच्या आणि वन्यजीवांच्या संरक्षण-संवर्धनात मुंबईच्या 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी'चे योगदान फार मोठे आहे. 'बीएनएचएस' या संक्षिप्त नावाने ओळखल्या जाणाऱ्या १२० वर्षांच्या या जुन्या संस्थेने निसर्गसंपदेचे संवर्धन करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि नैसर्गिक संसाधनांचा पर्याप्त वापर असणाऱ्या विकासाचा निरंतर प्रसार करणे ही मोलाची कार्ये अंगिकारलेली आहेत. महाराष्ट्राच्या



निरनिराळ्या भागांत जैवविविधतेबाबतचे संशोधन व अभ्यास सुरू ठेवून त्यांची माहिती संकलित करण्याचे महत्त्वाचे काम ही संस्था करते. विविध दुर्मिळ पक्ष्यांच्या व प्राणीप्रजातींच्या जतनाचे कार्यक्रमही ती राबवते. महाराष्ट्रातील अनेक विकास प्रकल्पांच्या पर्यावरणीय परिणामांचे विश्लेषण करण्याची जबाबदारीही तिने पार पाडलेली आहे. हे विविध प्रकारचे अभ्यास ग्रंथरूपात प्रकाशित करण्याचे कामही 'बीएनएचएस' संस्था अव्याहतपणे करीत आलेली आहे. विदर्भातील मेळघाट जंगलात काम करणारी 'सातपुडा फाऊंडेशन' ही संस्थादेखील या क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहे. अमरावतीच्या किशोर रिठे या तरुण अभियंत्याने स्थापन केलेली ही संस्था अनेक स्थानिक संघटनांना निरनिराळ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी जोडून त्यांच्याकरवी वन्यजीवांचे संरक्षण आणि जंगलसंवर्धन घडवून आणण्यात यशस्वी ठरली आहे. उरुळीकांचनचे 'भारतीय अ‍ॅग्रो इंडस्ट्रीज फाऊंडेशन' (बाएफ्) हे जलसंसाधन विकास, वृक्षशेती, पर्यायी ऊर्जा आणि निरंतर विकासाचे प्रकल्प या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामे करीत असते. पुण्याची 'वनराई' ही संस्था देशी तंत्रज्ञानाचा अवलंब करून माती आणि पाणी संवर्धनाचे काम करते. निर्धूर चुली, गोबरगॅस संयंत्रे, सोपे संडास या गोष्टींच्या निर्मिती आणि वितरणासोबतच वृक्षलागवडीचे अनेक प्रकल्पही वनराईने राबवलेले आहेत. मुंबई येथील 'बॉम्बे एनव्हायर्नमेंटल अ‍ॅक्शन ग्रुप' ही संघटना अनेक वर्षांपासून पर्यावरणाच्या विविध समस्यांविषयी न्यायालयाचे दरवाजे ठोठावून रास्त निर्णय पदरात पाडून घेत आली आहे. १९९७पासून महाबळेश्वर व पाचगणी परिसरामधील जंगलसंवर्धनाच्या कार्यात तिने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. अरबी समुद्रात महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर असणाऱ्या खारफुटीच्या जंगलांच्या संरक्षण-संवर्धनाच्या कामात 'मॅन्ग्रोव्ह सोसायटी ऑफ इंडिया'चे योगदान मोठे आहे. मुंबई आणि नवी मुंबई परिसरातील खाड्या, पाणथळी आणि इतर जलसाठ्यांचे प्रदूषण रोखणे आणि किनाऱ्याच्या सुरक्षेसाठी खारफुटीचे संवर्धन करणे यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे. मराठवाड्यात 'निसर्ग मित्र मंडळ' ही संस्था गेल्या वीस वर्षांपासून जंगलसंवर्धन, वन्यजीव संरक्षण आणि प्रदूषणनिवारण या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. या व अशा अनेक संस्था जंगलसंवर्धन-संरक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. परंतु तरीही महाराष्ट्रातील जंगलांची स्थिती फारशी उत्साहवर्धक नाही.

गेली काही वर्षे महाराष्ट्रात पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आहे. गेल्या पन्नास वर्षांमध्ये शेतीसाठीच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्रात धरणांची आणि धरणजलाशयांची एक मोठी साखळीच उभी केली गेली. परंतु हे करत असताना त्यामध्ये लोकांचा सहभाग कधीच घेतला गेला नाही. शेतकऱ्यांचे सिंचनाबाबतचे पारंपरिक ज्ञान, जमिनीच्या प्रतवारीनुसार त्यांच्या पाण्याच्या गरजा, हवामान आणि पीकस्थितीनुसार बदलणाऱ्या सिंचनाच्या पद्धती ह्या गोष्टी नियोजनात कधी विचारातच घेतल्या गेल्या नाहीत. जलविकासाच्या योजना नियोजनकर्त्यांनी केवळ सैद्धांतिक दृष्टिकोनातून आखल्या; व्यावहारिक विचारातून नव्हे. अर्थात, त्या आखणारे सर्व तंत्रज्ञ हुशार असणार, त्यांनी आपली तंत्रविद्या पणाला लावून अनेक अवघड प्रकल्प उभे केले असणार आणि निरनिराळ्या भागांतले पाणीपुरवठ्याचे प्रश्न सुटावेत या प्रामाणिक इच्छेनेच त्यांनी हे केले असणार याबद्दल कुणाच्याच मनात शंका नाही. परंतु या प्रकल्पांच्या आखणीत केवळ अभियांत्रिकी शक्याशक्यतांचाच विचार होता हे उघड आहे. एखादा धरणप्रकल्प उभा करताना त्याच्या वरच्या भागात जरी काही जमीन आणि जैवसंपदा बुडितात गेली तरी धरणाखालच्या भागात त्यापेक्षा अधिक जमिनीला सिंचन मिळून कैकपटींनी जास्त जैवसंपदा (बायोमास) निर्माण होते, हा सिद्धांत त्यांनी ग्राह्य धरला. पण धरणाच्या पाणपसाऱ्याखाली जी हजारो हेक्टर सुपीक जमीन किंवा जे हजारो हेक्टर उभे जंगल बुडते, त्यामुळे आपले किती नुकसान होते याचा विचार त्यांच्या नियोजनात कधीही नव्हता. अशा बुडितांचे पर्यावरणीय आणि परिस्थितिकीय व्यवस्थांवर काय परिणाम होतात, याचे आकलन करून घेण्याचा प्रयत्नही योजनाकारांनी कधी केला नाही. जी गावे बुडितात जातात, तिथल्या स्थानिक लोकांची उपजीविकेची साधने, त्यांची सामाजिक संरचना, त्यांच्या सांस्कृतिक परंपरा आणि त्यांचे आर्थिकमान यांची अपरिमित हानी होते ती भरून काढता येत नाही, हे सत्यही त्यांनी कधी स्वीकारले नाही. त्या हानीची तमाच त्यांनी बाळगली नाही. स्वत:ची साधी बदली झाली तरी कासावीस होऊन ती रद्द करून घेण्यासाठी आकाशपाताळ एक करणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि तंत्रज्ञांना प्रकल्पग्रस्तांचे विस्थापन ही एक आपत्ती आहे हे मात्र कधी जाणवले नाही. अशा विस्थापितांना एखाद्या नव्या गावात घरासाठी एक प्लॉट दिला आणि बुडालेल्या जमिनीपोटी पैशांच्या रूपात मावेजा दिला की त्यांचे पुनर्वसन पूर्ण होते हे चुकीचे समीकरण घेऊन गेली काही वर्षे महाराष्ट्राचे सरकार, त्याचे अधिकारी आणि तंत्रज्ञ हे भरमसाठ गुंतवणुकीचे महागडे पाणीप्रकल्प राबवत आले आहेत. हायड्रोलॉजीत किंवा जलशास्त्रात पारंगत असणाऱ्या कोणीही तंत्रविशारदाने, धरणांनी नद्यांचे प्रवाह अडवल्यामुळे नैसर्गिक जलचक्रावर दूरगामी असे कोणते दुष्परिणाम होतात, याचा विचार कधी केल्याचे दिसत नाही. नदीखोऱ्यांच्या संरचनेत अभियांत्रिकी हस्तक्षेप करून त्यांत बदल घडवून आणताना भूगोलतज्ज्ञांचे आणि भूशास्त्रज्ञांचे



मत आजमावल्याचेही कुठे दिसत नाही. शेतीसाठी पाणीप्रकल्पाची आखणी करताना शेती करणाऱ्यांचा आणि शेतीतज्ज्ञांचा सल्ला त्यांनी घेतल्याचे ऐकिवात नाही. राज्याराज्यांतल्या शेतीला पाणी पुरवण्यासाठी सिंचनखाती निर्माण केली गेली, पण एकाही राज्याच्या सिंचनखात्यात एखाद्या शेतीतज्ञाची नेमणूक झाल्याचे कधी कुणी पाहिले नाही. काटेकोर निकष लावून धरणांच्या कामगिरीचे मोजमाप करणे, त्यांच्या लाभ-हानीचे गुणोत्तर तपासणे आणि एखादे धरण निकामी सिद्ध झालेले असेल तर त्या वास्तवाचा मुक्त मनाने स्वीकार करून ते रद्दबातल ठरवणे या गोष्टी महाराष्ट्रात कधी केल्या गेल्या नाहीत.

पाणीविकासाच्या या एकतर्फी नियोजनाचे अनिष्ट परिणाम गेली दहा वर्षे महाराष्ट्राला भोगावे लागत आहेत हे एक कटू सत्य आहे. राज्यात सगळे धरणप्रकल्प पूर्ण होऊनही अवघी १५ टक्केच जमीन सिंचनाखाली आलेली आहे. या सिंचनातही सिंहाचा वाटा विहिरींमुळे होणाऱ्या सिंचनाचा आहे; धरणांचा नाही. पूर्ण झालेले धरणप्रकल्प अकार्यक्षमतेमुळे अवघी ३०-४० टक्केच कामगिरी पार पाडू शकतात. अनेक धरणजलाशयांमध्ये आश्वासित पाणीसाठा होऊ शकत नाही. शेतीसिंचनाचा नाद सोडून खर्चिक अशा बहुसंख्य धरणांचा वापर शहरी पाणीपुरवठ्यासाठी केला जात आहे. पावसाळ्यानंतर सर्व धरणांच्या खालच्या भागात नद्या कोरड्या पडत चालल्या आहेत. लाभक्षेत्रांबाहेर असणाऱ्या उर्वरित ८५ टक्के क्षेत्रांत भूजलाची पातळी चौपटीने खाली गेलेली आहे. पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य असणाऱ्या दुष्काळी गावांची संख्या ५ पटीने वाढली आहे. आणि या दारूण अवस्थेची जबाबदारी अंगावर घेणे तर दूरच राहिले, उलट या धरणयोजनांपेक्षाही जास्त खर्चिक आणि अवास्तव स्वरूपाच्या आंतरखोरे पाणीवाहनाच्या आणि नदीजोडांच्या योजना आखण्यात आमचे तंत्रज्ञ, नोकरशहा आणि सत्ताधारी लोकप्रतिनिधी गुंग आहेत, असे चित्र आज दिसत आहे. पाण्यासाठी केल्या जाणाऱ्या नियोजनाला लोकसहभाग, व्यवहार्यता, निरंतरता, कार्यक्षमता, समन्यायित्व आणि जबाबदारीचे दायित्व या सहा गोष्टींची जोड असणे आवश्यक आहे, हा आग्रह नर्मदा बचाओ आंदोलनाने सर्वप्रथम धरला. धरण प्रकल्पांबाबत जागतिक बँकेची कूट नीती, भ्रष्ट अधिकाऱ्यांची दडपशाही, सत्ताधाऱ्यांची सुबत्तेची आश्वासने, गोरगरिबांचे बेकायदा विस्थापन, प्रकल्पलाभांचे अतिरंजित दावे आणि पर्यावरणाची अपरिवर्तनीय हानी या गोष्टी चव्हाट्यावर आणून त्यांमागील 'सार्वजनिक हिताच्या' दाव्याचा दंभस्फोट महाराष्ट्रात या आंदोलनानेच केला. 'पाणी पंचायत' या चळवळीने पुणे जिल्ह्यात विविध ठिकाणी पाण्याच्या साठवणुकीसाठी व समन्यायी वापरासाठी स्थानिक पातळीवर अनेक प्रकल्प राबवले. आपल्या कार्यपद्धतीमध्ये जाणीवपूर्वक समता व न्याय ही तत्त्वे अंगीकारून पाणी पंचायतीने प्रकल्प उभारणी व वापरात

लोकसहभागाचा आग्रह सातत्याने धरला. महाराष्ट्रातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पाणलोटक्षेत्र विकासाचा नवा पर्याय आता सर्वमान्य होताना दिसत आहे. 'राळेगणसिद्धी'च्या प्रयोगापाठोपाठ गेल्या दशकात अनेक संस्था-संघटनांनी माती-पाणी-शेती संवर्धनासाठी राज्याच्या निरनिराळ्या भागांत पाणलोट विकासाचे कार्यक्रम यशस्वीपणे राबवण्यास सुरुवात केली आहे. त्यात पुणे येथील 'गोमुख ट्रस्ट', औरंगाबादमधील 'शेती सहाय्यक मंडळ', अंबाजोगाईची 'मानवलोक संस्था', साताऱ्यातील 'श्रमिक मुक्ति दल', रत्नागिरीतील 'समृद्धी संस्था' या प्रमुख संस्थांखेरीज इतरही अनेक संघटना आहेत.


वाढते औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे महाराष्ट्रात प्रदूषणाचे प्रमाणही गेल्या दहा वर्षांमध्ये अतोनात वाढले आहे. मुंबईच्या किनाऱ्यालगत असणाऱ्या पेट्रोलियम विहिरीमुळे मुंबई, ठाणे, बेलापूर आणि कोकणामध्ये रासायनिक उद्योगांचे प्रमाण वाढले आहे. या सर्व उद्योगांतून निघणारा रासायनिक कचरा आणि सांडपाणी मुंबईनजीकच्या समुद्रात सोडले जाते. नद्या आणि इतर जलस्त्रोतांच्या परिसरात थाटलेल्या बहुतांश कारखान्यांमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची सुयोग्य यंत्रणा नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील नद्या, धरण, तलाव आणि भूजलस्त्रोत हेही प्रदूषित होत आहेत. महाराष्ट्रातील ८० टक्के कारखाने पाण्याचे प्रदूषण घडवतात आणि १५ टक्के उद्योग हवा प्रदूषित करतात असे खुद्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचेच म्हणणे आहे. मुंबईतील गर्दी हटवण्याच्या प्रयत्नात राज्य शासनाने अनेक उद्योग राज्यात इतरत्र नेण्याचा प्रयत्न केला. त्यासोबतच महानगरांची संख्याही वाढत गेली. महाराष्ट्राच्या सर्वच महानगरांमधील हवा आता मोठ्या प्रमाणात प्रदूषित असून ती श्वसनासाठी योग्य नाही, असे प्रदूषण नियंत्रण मंडळ म्हणते. घनकचऱ्याच्या विल्हेवाटीची समस्याही दिवसेंदिवस उग्र होत चालली आहे. एकट्या मुंबई शहरातच दररोज ५००० टन घनकचरा निर्माण होतो. यातील चौथा हिस्सा हा विविध प्रकारच्या उद्योगांतून निघणाऱ्या घातक विषारी कचऱ्याचा असतो. संपूर्ण महाराष्ट्रातून पैदा होणाऱ्या घातक औद्योगिक कचऱ्याचे प्रमाण प्रतिवर्षी १ लक्ष ९५ हजार टन एवढे आहे. शहरांतील घनकचऱ्यात प्लास्टिकच्या कॅरीबॅग्जचे प्रमाणही फार असते. ह्या कॅरीबॅग्ज आणि दुधाच्या प्लास्टिक पिशव्या आपल्या घरांच्या अंगणात, बाहेर रस्त्यांच्या कडेला, कचराकुंड्यांपाशी, मैदानांमध्ये आणि शेतामध्ये विखुरलेल्या दिसतात. त्यामुळे जमिनी खराब होतात. पाणवठे प्रदूषित होतात आणि वस्त्या आणि रस्ते अस्वच्छ बनतात. प्लास्टिकमुळे ड्रेनेजचे पाईपही तुंबतात आणि आपल्या नद्या-समुद्राचे पृष्ठभागही व्यापले जातात. उन्हामुळे यातल्या अनेक प्रकारच्या कॅरीबॅग्जचे अर्धवट अपघटन होऊन त्यामधून विषारी आणि कर्करोगजन्य रसायने बाहेर पडतात. ह्या कॅरीबॅग्ज जाळल्या तरी त्यांतून विषारी वायू हवेत मिसळतात आणि पुरल्या तरी त्या नष्ट होत नाहीत; दीर्घकाळ टिकून राहतात. त्यांच्यातील लाल आणि पिवळ्या रंगद्रव्यांमधून कॅडमियमसारखी रसायने जमिनीतून भूजलात उतरतात आणि पाण्याचे प्रदूषण करतात. कचराकुंडीवर साचून राहिलेल्या पीव्हीसीच्या प्लास्टिक पदार्थांतून 'व्हिनिल क्लोराइड' हा वायू निघतो. तो अत्यंत जहरी आणि कर्करोगजन्य असतो. आपल्याकडे कचरा नेहेमी पेटवला जातो. त्यात जळणाऱ्या प्लास्टिकमधून 'हैड्रोजन फ्लोराइड' हा वायू बाहेर पडतो. त्यामुळे आम्लयुक्त पावसाचा धोका संभवतो. परंतु शहरांमधून निघणारा घनकचरा असो वा उद्योगातून निर्माण होणारा घातक कचरा, त्याची संपूर्णपणे आणि निसर्गानुकूल पद्धतीने विल्हेवाट लावण्याची यंत्रणा, ना राज्य सरकारकडे आहे ना कोणा स्थानिक स्वराज्य संस्थेकडे. त्यामुळे आज महाराष्ट्रात कोणत्याही शहरात किंवा गावांत कचऱ्याचे ढीग साचलेले दिसतात. अस्वच्छ परिसरामुळे होणाऱ्या रोगराईचे प्रमाणही जागोजागी वाढलेले दिसते. कचरा आणि सांडपाणी यांच्या विल्हेवाटीबद्दल अभ्यास करण्यासाठी. जनजागृती आणि कृतीकार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था आज पुढे येत आहेत. त्यात 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ', मुंबईतील 'क्लीन एअर आयलंड', 'इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर सस्टेनेबल फ्यूचर', 'सोसायटी फॉर क्लीन एअर', 'इंदिरा गांधी विकास संशोधन संस्था', पुण्यातील 'इकॉलॉजिकल सोसायटी' इत्यादी संघटनांचा समावेश आहे.

एकूण पाहता महाराष्ट्रात झपाट्याने वाढणारे औद्योगिकीकरण, नदी-खोऱ्यांमध्ये केले जाणारे हस्तक्षेप, रासायनिक खते आणि कीटकनाशके यांवरील वाढते अवलंबन. कचरा आणि सांडपाणी यांच्या विल्हेवाटीतील अपयश, सरकारी यंत्रणेची परिस्थितिकीय ऱ्हासाबद्दलची अनास्था आणि सामान्य जनतेचे या प्रश्नांबाबतचे अज्ञान यांमुळे गेल्या दहा वर्षांमध्ये पर्यावरणीय हानीचे प्रमाण अनेक पटींनी वाढलेले आहे. येत्या काळातील थेट परदेशी गुंतवणुकीतून आणि नव्या मुक्त व्यापाराच्या झपाट्यातून बाजारपेठांत गर्दी करणाऱ्या नवनव्या चैनीच्या उत्पादनांमुळे ते आणखीही वाढणार आहे. त्यामुळे निसर्गसंसाधनाचे संरक्षण-संवर्धन, टिकाऊ आणि निसर्गानुकूल विकास योजनांचा पाठपुरावा आणि कल्याणकारी पाया असणारे नियोजन यांबाबतचे जनजागरण मोठ्या प्रमाणावर करून पर्यावरण सुधारणांसाठी लोकमताचा दबाव निर्माण करण्याची मोठी गरज आहे.

❑

# स्त्रीमुक्ती चळवळीपुढील आजची आव्हाने

■ छाया दातार



स्त्रीमुक्तीचा विचार खाली किती झिरपला आहे, याची चर्चा नेहमीच होते. स्त्रीमुक्ती चळवळ चालू आहे की थंडावली आहे हाही असाच एक शंकित (Sceptic) प्रश्न. उत्तर सोपे नसते. स्त्रीवादी अभ्यासाच्या निमित्ताने स्त्रीवादी विश्लेषण धारदारपणे ज्ञानशाखांच्या प्रत्येक अंगाचा वेध घेत घेत गाभ्यापर्यंत पोचवण्याचा आणि चौकटच सुलट्याची उलटी करण्याचा प्रयत्न करत आहे. (Paradigm Change) हे काम खूप महत्त्वपूर्ण आहे. कारण ह्याच परजलेल्या शस्त्राने जगभर नव्यानव्याने उलगडत जाणाऱ्या व भूमिती दराने महाकाय वाढत जाणाऱ्या स्त्रीसमस्यांचेही विवेचन करणे शक्य होणार आहे. या समस्यांच्या निराकरणासाठी जी धोरणे राज्य, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय पातळीवर आखली जात आहेत त्या धोरणांचाही परामर्ष घेता येणे शक्य होत आहे व त्यातील स्त्री-विरोधी भूमिकांचाही पर्दाफाश शक्य होत आहे. एका अर्थाने स्त्रीप्रश्न ऐरणीवर आलेला आहे.

नवउदारमतवादी विचारसरणीचा फैलाव जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात होत आहे. याचा अतिशय दृश्य परिणाम स्त्रियांच्या बदलत्या स्थानरूपाने पाहाण्यास मिळतो आहे. आत्यंतिक व्यक्तिवाद व स्पर्धा ही बाजारपेठेवर आधारित समाजव्यवस्थेची व्यवच्छेदक लक्षणे आहेत. उदारमतवादी व आधुनिक विचारसरणीच्या आधारे, हळूहळू सामंतशाही पुरुषी वर्चस्वाखालून बाहेर पडण्याची धडपड करणाऱ्या स्त्रियांना, स्त्रीमुक्ती चळवळीच्या जोरावर समानतेचे मूल्य जनमानसात, किंबहुना पुरुषी मानसात रुजवण्याचे प्रयत्न करणाऱ्या स्त्रियांना बाजारपेठीय संस्कृतीने एकदम जीवघेण्या स्पर्धा प्रवाहात खेचून घेतले. या व्यक्तिवादी, चंगळवादी वातावरणामध्ये स्त्रियांचे शोषण वाढले नसते तरच नवल. सामंतशाही श्रृंखला सामुदायिक शक्तीच्या सामर्थ्यावर तोडत, समंजसपणा, विवेकशीलता व औपचारिक शिक्षणाची कास धरत जे स्थान स्त्रीला स्त्रीमुक्ती चळवळ देऊ शकली असती, त्या प्रवाहालाच नव-उदारीकरणाच्या वादळवाऱ्यांनी आव्हान दिले आहे. या स्पर्धाप्रवाहात नव्याने जागी होणारी स्त्री व्यक्तिवादी ग्राहक, चंगळवादी ग्राहक म्हणूनच सामील होते आणि स्वत:च्या शरीराचा वापर वस्तू म्हणून करू लागते. सामंतशाहीतील पुरुषी प्रभावाखाली पुरुष तिचा वापर वस्तू म्हणून करत असे — दोन्ही अर्थाने : श्रम करणारे यंत्र आणि शरीरभोग व

संतती देणारे यंत्र. आता नव्या परिस्थितीमध्ये तीही स्वत:च्या शरीराचा वापर लैंगिक वस्तू म्हणून करू शकते. किंबहुना जीवघेण्या स्पर्धेमध्ये पुष्कळदा तिचे इतर विकल्प संपून गेलेले असतात. पायाखालची माती धुपून गेलेली असते आणि जीव वाचवणे हे एकच ध्येय उरते. माणूस म्हणून सन्मानाने जगण्याची स्वप्नेही नाहीशी झालेली असतात.

'लैंगिकते'च्या प्रश्नाचे अनेक पैलू अशा परिस्थितीत पुढे येत असतात. स्त्रियांच्या दुय्यमतेची व शोषणाची सुरुवात ही 'लैंगिकते'वरील वर्चस्वाने झाली. किंबहुना जातीव्यवस्थेचाही हाच भक्कम पाया आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही ओळखले होते. परंतु आज 'लैंगिकते'च्या प्रश्नाचे नवनवे आयाम पुढे येत आहेत आणि त्या आयामांचा अभ्यास सद्य:परिस्थितीच्या संदर्भात करत आणि त्या प्रश्नांना तात्पुरती व दीर्घ पल्ल्याची अशी दोन्ही उत्तरे शोधत, स्त्रीमुक्ती चळवळीला पुढे जावे लागत आहे.

लैंगिकतेच्या या 'सलगपणे' पसरलेल्या रेषेच्या एका टोकाला 'trafficking' म्हणजेच स्त्री-शरीर व्यापाराचा प्रश्न आणि दुसऱ्या टोकाला स्त्रीगर्भ भ्रूणहत्येचा प्रश्न अशी अतिगंभीर वास्तवता उभी आहे. त्या दोन टोकांमध्ये बलात्कार आहे, विवाहांतर्गत बलात्कार आहे, मारहाण आहे, सतीप्रथा आहे; कामाच्या ठिकाणी किंवा रस्त्यावर अतिप्रसंग करण्याला विरोध करण्यामुळे नोकरी गमावण्याची भीती आहे, समलिंगी संबंधांविरुद्ध कायदेशीर व सामाजिक बंदी आहे, संतती-नियमनाला विरोध आहे, तशीच सक्तीही आहे आणि गर्भपाताच्या कायद्याचा आसरा घेऊन होणारी स्त्रीगर्भहत्याही आहे. लैंगिक हिंसेचे स्वरूप असे विशालकाय आहे. त्या संदर्भात कायदे करून गुन्हेगाराला शिक्षा व्हावी, यासाठी स्त्रीमुक्ती चळवळीचे प्रयत्न होणे आवश्यक आहे. परंतु अन्याय नेमका कोणत्या स्थितीमध्ये आहे याबाबत सर्व स्त्रियांमध्ये एकमत होणे व जागृतता येणे यासाठीही प्रयत्न करणे आवश्यक आहे. आत्मसन्मानाची व्याख्या अजून स्त्रियांनी आत्मसात केलेली नाही.

स्त्रियांची चळवळ कोठे आहे म्हणणाऱ्यांनी, नुकत्याच झालेल्या बारबालांच्या बंदीबाबत स्त्रीमुक्ती चळवळीने केलेली चिकित्सा आणि घेतलेली भूमिका बघणे आवश्यक आहे. सिनेमातील उत्तान दृश्ये, पोस्टर्सवरील उत्तान चित्रे यासंबंधात कोणतीही भूमिका न घेता महाराष्ट्र सरकारने तरुण मुलांवर अनैतिक परिणाम होण्याचे कारण दाखवून बारबालांच्या नृत्याला बंदी आणली आणि त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन नष्ट केले. महिला आयोगानेही सरकारी धोरणाचे समर्थन केले. स्त्रीमुक्ती चळवळीतही मतभेद होते. डाव्या पक्षांशी संबंधित महिला संघटनांनी सरकारला साथ दिली आणि 'बारबाला' या व्यवसायात अतिशय मोठे शोषण होते आहे, या बारबालांवर वेश्या व्यवसायाची सक्ती होते आहे, अशी भूमिका घेऊन बंदीवर शिक्कामोर्तब केले.



या पार्श्वभूमीवर अनेक स्त्रीसंघटनांनी व एस्.एन्.डी.टी. विश्वविद्यालय येथील स्त्री-अभ्यास केंद्राने मिळून ५०० बारबालांचे सर्वेक्षण करून वेगळे चित्र पुढे आणले. बेकायदेशीरपणे भीती दाखवून पोलिसांनी बारमालकांकडून पैसे घेण्याचे वाढते प्रकार उघडकीस आणले आणि या बारबालांपैकी अनेकजणी अशा जमातीतून पुढे आल्या होत्या की तेथे नृत्यपेशा हा समाजमान्य होता. शिवाय बऱ्याचजणी या कुटुंबातील मुख्य कमावत्या होत्या; काही विवाहितही होत्या. त्यांच्या शोषणाची त्यांना कल्पना होती, परंतु जास्त शोषण हे छुपेपणाने हा धंदा चालण्यामुळे होते, असे त्यांचे मत होते. फारच थोड्या वेश्याव्यवसाय करत होत्या. शिवाय त्या व्यवसायाची सक्ती केली जात नव्हती असेही त्यांचे म्हणणे होते. बऱ्याच अंशी त्यांनी या पेशाची निवड केली होती- अर्थात एकूण सर्व परिस्थितीचा विचार करूनच.

या पार्श्वभूमीवर सरकारी बंदी हा नैतिकतेबाबतच्या दांभिक कल्पनेचा परिपाक आहे, अशी भूमिका स्त्रीमुक्ती चळवळीतील अनेक संघटनांनी घेतली. या पेशाला योग्य संरक्षण देऊन, त्यांचे वेतन, आरोग्यविषयक काळज्या, विमा या विषयांसाठी एखादी नियामक समिती नेमणे अधिक योग्य असा हा मुद्दा होता. वर वर्णन केल्याप्रमाणे स्त्रियांसाठी, विशेषत: विशेष न शिकलेल्या स्त्रियांसाठी,अनेक नव्या सेवा/पेशे नवउदारमतवादी अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण होत आहेत. ब्यूटी पार्लरमधील मदतनीस, मसाजिस्ट या अशा नव्या सेवांमधील एक प्रकार. सौंदर्याचे, शरीराचे वस्तुकरण होणे या अर्थव्यवस्थेत झपाट्याने घडत जाते. स्त्रीशरीर व्यापार हा प्रकार तर आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात चालू झाला आहे. चांगल्या नोकऱ्यांच्या मिषाने स्त्रियांना, मुलींना फितवून हे दलाल विकसित देशांतील शहरांमध्ये त्यांना धंद्याला लावतात आणि हप्ते कापून घेत राहतात. व्हिसा, पासपोर्ट स्वत:जवळ ठेवून या स्त्रियांची कोंडी करतात. ही लैंगिक हिंसा थांबवणे हे स्त्रीमुक्ती चळवळीचे आव्हान आहे. परंतु बारबालांच्या प्रश्नाचे असे सार्वत्रिकीकरण करणे हे चुकीचे आहे, असे अनेक संघटनांचे म्हणणे आहे.

या 'लैंगिकते'च्या प्रश्नाच्या सलग मालिकेमधील दुसऱ्या टोकावरील स्त्रीगर्भहत्या या प्रश्नावर मात्र सरकारला जोरदार पावले उचलणे जमलेले नाही. महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य व स्त्रीसुधारणांच्या बाबतीत अग्रेसर,अशी प्रतिमा असूनही २००१च्या जनगणनेमध्ये महाराष्ट्रातील लहान मुलींचे मुलांशी असलेले प्रमाण भारतीय सरासरी प्रमाणापेक्षा खूपच कमी होते. महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त शहरीकरण आढळते असा अहवाल आलेला आहे. त्याच्या जोडीला पुनरुत्पादनासाठीच्या क्षेत्रांतील तंत्रज्ञानसुद्धा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊन स्त्रीगर्भहत्येचे प्रमाण वाढीस लागलेले आहे. येथेही स्त्री शरीराचा




वापर वस्तू/यंत्र म्हणून वंशाच्या सातत्यासाठी करण्यात येतो, ही वस्तुस्थिती आहे. बारबाला जशा स्वत:हून शरीर प्रदर्शनासाठी/नृत्यासाठी पुढे येत आहेत, तशाच केवळ मध्यमवर्गीय स्त्रियाच नव्हेत तर आता ग्रामीण भागातील शेतकरी स्त्रियाही या तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सरसावल्या आहेत. स्त्रीचे मूल्य स्त्रीच्या मनातून उतरू लागले आहे. कमी कमी होत जाणारे ०ते६ वयोगटातील मुलींचे प्रमाण प्रथमत: स्त्रीमुक्ती चळवळीच्या लक्षात आले आणि ९०च्या दशकात गर्भलिंग परीक्षेविरुद्ध कायदा करण्यास चळवळीने भाग पाडले. परंतु तंत्रज्ञानाची झेप एवढी होती की पूर्वीच्या घातक परीक्षेऐवजी नवे सोनोग्राफीचे तंत्रज्ञान आले आणि विशेष त्रास न होता गर्भाचे लिंग कळू लागले. नैतिकता डोक्याला गुंडाळून ठेवणाऱ्या डॉक्टरांचे पीक वाढले. या सर्वांनाच नव-उदारीकरणाच्या विचारसरणीचे पोषक वातावरण कारणीभूत झाले आहे. हे स्त्रीचळवळीसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. अमेरिकेत तर अनेक स्त्रिया चळवळीच्या आताच्या अवस्थेला तिसरा टप्पा म्हणू लागल्या आहेत. त्यांच्या मते, आता सामुदायिक कृतीची गरज राहिली नसून, स्त्रियांसाठी अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. आता एकेकट्या स्त्रीचा झगडा आहे, हे स्वातंत्र्य स्वत:साठी वापरण्याचा. स्त्रीत्वाचे सेलेब्रेशन करण्याचा.

लैंगिकतेच्या शोषणाच्या टोकाविरुद्ध लैंगिकतेची अभिव्यक्ती करण्याचा.

थोडीफार हीच अवस्था आपल्या येथील नवीन पिढीची, युवतींची पाहायला मिळते. 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाईम्स' या वृत्तपत्रांना या पिढीला आकर्षित करतील अशा पुरवण्या काढाव्या लागतात. त्यातील विषय आणि भाषा दोन्ही 'कूल' असतात. त्यांना विशेष आक्षेप घ्यायचे कारण नाही; कारण नव्या प्रवाहांसोबत काही प्रमाणात जावेच लागते, नाहीतर संवाद तुटतो. परंतु साहसाची आवड, सर्वच बाबतीत, विशेषत: लैंगिक अनुभवाच्या बाबतीत बिनधास्तपणा करू इच्छिणाऱ्या या पिढीला इतर अनेक क्षेत्रांत — समाजसेवेच्या, पर्यावरणीय चळवळींच्या, संकटकालीन व्यवस्थापनाच्या क्षेत्रात आणण्याचीही गरज आहे.

या पार्श्वभूमीवर नुकताच आलेला छोटासा अनुभव सांगावासा वाटतो. 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान' व 'मिळून साऱ्याजणी' या दोन संस्थांनी मिळून मालतीबाई बेडेकर व कुसुमावती देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ठिकठिकाणी लेखिकांच्या कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. त्यातील नागपूर येथील कार्यशाळेमध्ये तीन तरुण पत्रकार स्त्रिया आल्या होत्या. त्या मराठा समाजातील होत्या. आजपर्यंत चळवळीतील वैचारिक प्रवाहामध्ये दलित व ब्राम्हण स्त्रियांना भेटण्याची सवय असल्यामुळे त्यांचा सहभाग चटकन लक्षणीय वाटला. ह्या तिघींनीही प्रोफेशनल काम करताना आणि स्त्रियांच्या प्रश्नांवर लेखन करताना, घरच्या मंडळींच्या प्रतिक्रिया कशा येतात, विशेषत: कोणत्या नावाने असे लेखन करावे, सासरच्या की माहेरच्या, याबद्दल बरीच चर्चा केली. आम्हा सर्वांनाच हा सुखद प्रसंग वाटला. खानदानी मराठा समाज बहुसंख्येमुळे राजकारणात अग्रणी स्थान मिळालेला, पण म्हणूनच सामाजिक सुधारणांच्या बाबतीत धोरणीपणा राखून फारशी भूमिका न घेणारा. या समाजातील तरुण मुली जर जागृत होऊ लागल्या, तर चळवळ झिरपू लागली आहे असे म्हणायला हरकत नाही असे मनोमन वाटू लागले.

❑



# पणती जपून ठेवताना...

■ दिप्ती राऊत

*ग्रामसुधारणेचा मूलमंत्र । सज्जनांनी व्हावे एकत्र ।*
*संघटना हेचि शक्तीचे सूत्र । ग्रामराज्य निर्माण करी ॥*
*गाव करी ते राव न करी । ऐसे सांगोनि ठेविले चतुरी ।*
*जरी दाद न घेतील अधिकारी । तरी गाव त्या सुधारू शके ॥*
*यासाठीच पाहिजे सशक्त संघटन । जे करी अन्याय निर्मूलन ।*
*देवोनिया न्यायदान । करी रक्षण गावाचे ॥*

**– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

महाविद्यालये विद्यार्थ्यांचा 'स्व-विकास' घडवतात असा सार्वत्रिक समज आहे. उच्चशिक्षणानिमित्ताने महाविद्यालयांत प्रवेश करणारे विद्यार्थी स्वत:चे ज्ञान, माहिती आणि कौशल्य विकसित करतात; भविष्यातील स्वत:च्या सामाजिक-आर्थिक-भौतिक गरजांच्या पूर्ततेची आखणी करतात आणि एकूणच स्वत:च्या उज्ज्वल आणि समृद्ध भवितव्याचे स्वप्न घेऊन बाहेर पडतात. संगमनेर महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारातून प्रवेश करणारे काही विद्यार्थी असेच होते. हेच स्वप्न होते, हीच वाट होती. पण संगमनेर महाविद्यालयातून बाहेर पडताना मात्र त्यांनी ही मळलेली वाट नाकारली आणि न्याय्य समाजाच्या नवनिर्माणाची एक वेगळी वाट खोदायलाच सुरुवात केली. या वाटेवर 'लोक' महत्त्वाचे होते. आणि त्यांना केंद्रस्थानी ठेवून प्रत्येक विचार, प्रत्येक आचार करणारी 'पंचायत', अर्थात संगमनेर तालुक्यासह श्रीगोंदा आणि अकोला या नगर जिल्ह्यातील तालुक्यांत लोकसहभागातून लोककेंद्री ग्रामविकासाची मुहूर्तमेढ रोवणारी 'लोकपंचायत'.


वेगळा दृष्टिकोन असणारी एक व्यक्ती केवढे वेगळे काम करू शकते, याचे उदाहरण म्हणजे संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. म. वि. कौंडिण्य. तो काळ होता १९८७-८८चा. स्वराज्याच्या स्वप्नपूर्तीसाठी महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' म्हणून केलेले आवाहन मागे पडले होते. जयप्रकाश नारायणांच्या 'संपूर्ण क्रांती'चे स्फुल्लिंगही विरू लागले होते. मुक्त अर्थव्यवस्थेची नांदी देत जागतिक बाजारपेठेचे वारे वाहू लागले होते. अशा वातावरणात कॉलेज हे ग्रामविकासाचे माध्यम बनावे, ग्रामीण भागातून येणारे विद्यार्थी कॉलेजमधून शिक्षण घेऊन आपापल्या गावात पुन्हा जाऊन गावविकासाच्या कामात समरस व्हावेत, कॉलेजमध्ये दिले जाणारे शिक्षण, चालणारे उपक्रम गावनिर्माणासाठी पूरक ठरावेत, महाविद्यालय हे ग्रामविकासाचेच विद्यापीठ ठरावे, हे स्वप्न कौंडिण्यसर बघत होते. छात्रभारतीच्या माध्यमातून सरांच्या या स्वप्नाची चुणूक अनुभवणाऱ्या काही युवकांच्या रक्ता-रक्तात हे स्वप्न भिनले. साखर कारखाने, जिल्हा बँका ही सत्तेची केंद्रे भोवताली फोफावताना दिसत



होती. त्यांनी निर्माण केलेल्या 'विकास' नामक सुजेखाली गावातील शेवटच्या स्तरातील गावकरी दबून जात होता. त्याच्या शोषणावर हे तथाकथित विकासाचे महामेरू उभारले जात होते. कॉलेजमधून बाहेर पडल्यावर नोकरीसाठी या सत्ताकेंद्राचीच दारे ठोठावणे अस्वस्थ करत होते. कौंडिण्यसरांनी शिकवलेला ग्रामविकास कुठेच दिसत नव्हता. ठरले; विकासाची सूज दाखवणाऱ्या या मॉडेलला छेद देत, खऱ्या अर्थाने शेवटच्या घटकाच्या अंगावर विकासाचे मूठभर मांस वाढवणाऱ्या कामाची उभारणी करायची. बागायतदारांच्या उसावर उभ्या या मॉडेलला छेद देण्यासाठी सामान्य शेतकऱ्यांच्या शेतातील टोमॅटोवर प्रक्रिया करण्याची कल्पना पुढे आली. एकीकडे यातून थेट लोकांशी जोडता येणार होते; दुसरीकडे काही पायाभूत साधनांची उभारणी करता आली असती हा विचार होता. खूप विचार झाला, माहिती जमवली, पण नेहमीप्रमाणेच साधनांची कमतरता भासली. ज्या विचारांचा वारसा आपण सांगतो, ज्या कामाचा वसा आपण स्वीकारला, त्यासाठी आपल्याकडे कोणतीच साधने नाहीत हे वास्तव त्या युवकांचे मन खात होते. त्याच सुमारास जनता पक्षाच्या एका सभेवर पतित पावन संघटनेने हल्ला केला. सभेतील नेते जखमी झाले. धर्मनिरपेक्षतेचा काँग्रेसचा बुरखाही फाटला. सर्व समाजवादी एकटे पडले. एकत्र.आले पाहिजे, आपली ताकद वाढवली पाहिजे हे जाणवत होते. 'त्यांच्या' सैनिकांना शह देण्यासाठी 'आपले' सैनिक भक्कम करण्याचा पर्याय समोर होता. त्यासाठी सेवादलाच्या शाखांचे माध्यम होते.

तथाकथित मूलतत्त्ववादी शक्तींच्या विरोधात संघटितपणे आपले अस्तित्व उभे करण्यासाठी पूर्ण वेळ झोकून देऊन काम करण्याची गरज होती. कॉलेजच्या माध्यमातून एकत्र आलेले एकेक साथी आपापल्या वाटा निवडत होते. पूर्ण वेळ कोण देणार, हा प्रश्न समोर होता. बी. कॉम.च्या शेवटच्या वर्षाला असणाऱ्या सारंग पांडेंनी या प्रश्नाला सामोरे जायचे ठरवले. वेगळ्या वाटा निवडल्या असल्या तरी इतर साथींनी तनमनधनातून साथ देण्याचे कबूल केले. आणि कामाला सुरुवात झाली. तोपर्यंत 'लोकपंचायत' या संस्थेचा जन्मही झाला नव्हता. पण प्रत्यक्ष जन्म किंवा त्यानंतरचे वाढणे यांपेक्षा गर्भधारणेचा आणि गर्भवाढीचा काळ अधिक महत्त्वाचा मानला जातो. गर्भाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक वाढीच्या वैशिष्ट्यांच्या बीजांचे रोपण त्याच अवस्थेत होत असते. पुढे प्रत्यक्ष जन्माला आल्यावर त्यातून रोप तयार होते इतकेच. आज लोकसहभागातून लोकविकासाचे लोककेंद्री मॉडेल म्हणून उभ्या असणाऱ्या 'लोकपंचायत'चा अनेक शाखांचा वृक्ष उभा असला तरी त्याच्या बिजारोपणाची मुळे या गर्भावस्थेत आहेत. म्हणूनच 'लोकपंचायत'चा प्रवास समजून घेण्यासाठी ती विस्ताराने समजून घेणे अगत्याचे ठरते.





गावात काम करायचे ठरल्यावर, संगमनेरपासून सहा-सात किलोमीटर अंतरावर असणाऱ्या 'झोले' या गावापासून कामाला सुरुवात केली. दरम्यान 'नवनिर्माण न्यास संस्थे'तल्या प्रशिक्षणाच्या निमित्ताने विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा; चिंतन सुरू होतेच. "शेतकऱ्याच्या मनात प्रश्न असतो तो त्याच्या कांद्याला किती भाव मिळणार याचा आणि आपण 'त्यांचे बौद्धिक घेत असतो, काश्मीर भारताचाच भाग कसा आहे, यावर. त्यामुळे गावकऱ्यांशी, शेतकऱ्यांशी आपले मुद्द्यांचे नातेही तयार होणे गरजेचे वाटत होते. त्यादृष्टीने प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यापूर्वी नैसर्गिक साधनसंपत्तीतून विकासाचा मार्ग दाखवणाऱ्या अभ्यासाची गरज वाटली. समाजकार्य महाविद्यालयांमध्ये किंवा प्रस्थापित विद्यापीठांमध्येही अशा स्वरूपाच्या अभ्यासक्रमाचा शोध घेतला. अखेरीस 'सेंटर फॉर डेव्हलपमेंट स्टडीज अॅण्ड अॅक्टिव्हिटीज' या संस्थेत त्या दिशेने शिकण्याची संधी मिळाली," 'लोकपंचायत' चे अध्यक्ष, सारंग पांडे सांगतात. सारंग पांडेंचा त्या दिशेने अभ्यास सुरू होता; तरी पत्रकारितेच्या माध्यमातून फिरणारे पद्मभूषण देशपांडे, संगमनेर महाविद्यालयातच लेक्चररशिप करणारे तुळशीराम जाधव, शिक्षकी पेशा सांभाळत सेवादलाचे काम सुरू ठेवणारे उल्हास पाटील या सर्व सहकाऱ्यांचा परस्पर संपर्क, परस्पर संवाद सुरू होताच. 'पाणलोट क्षेत्र विकास' हे नावही वापरात नव्हते त्या सुमारास ग्रामविकासासाठी जलव्यवस्थापनाचा मूलमंत्र या युवकांना गवसला. याच सुमारास राष्ट्रसेवा दलाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने पूर्णवेळ कार्यकर्त्यांची तरतूद करवून झोले गावात कामाला सुरुवात केली. 'लोक' महत्त्वाचे आणि गावपातळीवरील लोकांमधील सामूहिक निर्णयप्रक्रियेचे प्रतीक म्हणजे 'पंचायत'— या संयुगातून 'लोकपंचायत' या नावाचा जन्म झाला. श्रमपथकांच्या माध्यमातून झोले गावातील ५० हेक्टरच्या परिसरात पाणलोट विकासाचे काम संस्थेने सुरू केले. झोल्याचे ग्रामस्थ, गावातील तरुण, संगमनेर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी, सर्व शाळांमधील विद्यार्थी या सर्वांना या कामात जोडून घेतले. काम करण्याच्या प्रेरणेने सर्वजण एकत्र आले. झपाटल्यागत काम करीत होते. प्रकल्प, निधी, कार्यालय हे मुद्दे तेव्हा व्यवहारात तर दूरच, विचारातही नव्हते. भोवताली अनेक सामाजिक संस्था, संघटना व्यक्तिकेंद्री बनलेल्या दिसत होत्या. नावातच 'लोक' आणि 'पंचायत' धारण केलेल्या 'लोकपंचायत'ने त्यावेळी सामूहिक नेतृत्व आणि सामूहिक निर्णयप्रक्रियेचे मूल्य स्वत:भोवती गुंफले. साखर कारखान्याच्या निमित्ताने उभी झालेली आर्थिक-राजकीय सत्ताकेंद्रे बागायती क्षेत्रावर केंद्रित झाली होती. 'लोकपंचायत'ने दुष्काळी भागातून कामाला सुरुवात केली. पक्षीय राजकारणापासून सहकारी संस्थांपर्यंत सर्वत्र प्रस्थापितांचे वर्चस्व दिसत होते. यातून शेवटच्या माणसावर होणारा अन्याय, त्याचे शोषण यांवर

आधारलेला विकासाचा असमतोल मोडून काढण्यासाठी 'पाणलोट क्षेत्र विकास' या कार्यक्रमातून सक्षम पर्याय 'लोकपंचायत'ने निवडला. पाणलोट क्षेत्र विकास म्हणजे केवळ जलसंधारणाचे काम नव्हते, तर त्या क्षेत्रातील जलासोबतच जंगल, जमीन आणि जन या सर्व संसाधनांचा विकास त्यामध्ये अभिप्रेत मानला. झोले गावावर सर्व कामाचे लक्ष एकवटले असले तरी दुसरीकडे व्यापक चळवळीच्या माध्यमातूनही 'लोकपंचायत'ने स्वत:ला जगाशी जोडून घेतले. नैसर्गिक साधनांच्या विकासातून ग्रामविकासाचे प्रारूप झोल्यात उभे राहात होते. 'चले जाव' चळवळीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने अच्युतराव पटवर्धनांनी राज्यात तीनशे राळेगण निर्माण करण्याचा संदेश शासनाला दिला. शासनाने ते काम अण्णा हजारेंवर सोपवले. 'लोकपंचायत'च्या कार्यकर्त्यांसाठी ते करीत असलेल्या प्रयत्नांना व्यापक आधार मिळवण्याची संधी दिसली. 'आदर्श गाव संकल्प आणि प्रकल्प' या उपक्रमाअंतर्गत, झोले गावचा पहिला प्रस्ताव अण्णा हजारेंपर्यंत पोहोचला. एकदा पुण्याहून नाशिकला जाताना अण्णा झोल्यात थांबले आणि योजनेपूर्वीच प्रचंड प्रेरणेने आणि ऊर्जेने सुरू असलेले काम पाहून प्रभावित झाले. झोल्यात कामाला सुरुवात झाली. 'सामूहिक विचार', 'सामूहिक आचार', 'सामूहिक नेतृत्व' आणि 'सामूहिक निर्णय' ही सूत्री स्वीकारलेल्या 'लोकपंचायत'च्या या प्रवासात अनेक साथी, सहकारी सामील झाले. कृषिखात्यात कृषिसल्लागार म्हणून काम करणारे संजय फल्ले संस्थेचे हितचिंतक-मार्गदर्शक म्हणून सुरुवात करत नंतर कार्यकर्ते आणि विश्वस्त बनले. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद लिमये, प्रकल्प अधिकारी लहू कानडे यांचे पाठबळ मिळत गेले. कार्यकर्त्यांची टीम तयार होऊ लागली.

सुरुवातीच्या काळात झोलेवासियांचा विरोध नव्हता, पण सक्रिय सहभागही नव्हता. त्यांना कौतुक वाटायचे, पण पुढाकार नव्हता. संपूर्ण दुष्काळी गाव, संगमनेरसारख्या शहराचा संपर्क, यामुळे बहुतांश पुरुष गवंडी कामावर, तर स्त्रिया विडी कामगार म्हणून काम करत होत्या. 'लोकपंचायत'च्या युवा कार्यकर्त्यांनी गावातील तरुण कार्यकर्त्यांशी संवाद सुरू केला. त्यांच्यावर शिवसेनेचा प्रभाव होता, पण हिंदुत्व वगैरे कल्पनांनी ते झपाटलेले नव्हते. तरुण रक्ताला एक बॅनर हवा होता, जो शिवसेनेने दिला होता. गावातील प्रस्थापित नेतृत्वाला पर्याय देणारी ताकद म्हणून 'लोकपंचायत'ने या युवकांशी संपर्क वाढवला. शिवसेनेचा बॅनर मागे पडला आणि ते 'लोकां'चे सैनिक बनले. श्रमदानात सक्रिय झाले. ग्रामसभांमध्ये पुढाकार घेऊ लागले. विडी कामगार महिलांशीही संवाद सुरू झाला. गावाची रामोशी वाडी सर्वच निधी-निर्णयांपासून आणि विकासाच्या प्रवाहापासून दूर होती. मोठ्या संख्येने मेंढ्या बाळगून असणाऱ्या या समाजासोबत चराईबंदीच्या मुद्द्यावरून 'लोकपंचायत'च्या कार्यकर्त्यांचे खटकेही उडाले होते. याच टप्प्यावर त्या रामोशांसोबत संस्थेने संवाद सुरू केला आणि त्यांनाही सामावून घेण्यात आले. दरम्यान, शासनाच्या अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत संगमनेर तालुक्यासाठी 'लोकपंचायत'ची निवड झाली होती.

''रचनात्मक विधायक स्वरूपाच्या कामापासून सुरुवात केली असली तरी सुरुवातीपासूनच साधनांसाठी खूप संघर्ष करावा लागला. अनाठायी संघर्ष ओढवून घ्यायचा नाही, रचनात्मक कामावर सर्व ताकद लावायची असं ठरवलं, तरी संघर्ष काही चुकला नाही. निधीचा मुद्दा नव्हता तोपर्यंत शासनाचं सहकार्यही कोणत्याही अडथळ्यांशिवाय होतं. निधीचा मुद्दा उपस्थित झाल्यावर तांत्रिक बाबींचाही बाऊ करून असंख्य गतिरोधक वाटेत उभे ठाकले. पण ही व्यवस्था अशीच आहे, हे स्वीकारून चिकाटीनं काम करीतच राहिलो,'' हे 'लोकपंचायत'च्या कामावर आधारित सारंग पांडेंचे अनुभव रचनात्मक आणि संघर्षात्मक कामांमधील सीमारेषा धूसर करतात. तोपर्यंत फॉरेन फंडिंगची माहितीही नसली तरी सेवादलाच्या प्रभावामुळे स्थानिक निधीवर 'लोकपंचायती'चा सुरुवातीच्या काळात अधिक भर होता. प्रस्थापित व्यवस्थेचा भाग बनणे, प्रस्थापित व्यवस्था नाकारणे किंवा प्रस्थापित व्यवस्था बदलायला लावणे, हेच तीन पर्याय पुढे असतात. व्यवस्थेचे गुलाम बनणे 'लोकपंचायत'ने नाकारले पण आपण झुगारली तरी व्यवस्था सुरूच असते, या भूमिकेतून तिला न झिडकारता तिच्यात प्रवेश केला आणि स्वत:चे स्वातंत्र्य, स्वायत्तता आणि स्वत्व यांच्यासह तिला लवचिक बनवण्याचा मार्ग स्वीकारला. 'लोकपंचायत'च्या श्रमदानात फक्त स्वयंसेवक किंवा गावकरीच नाही, तर शासकीय अधिकारी आणि कर्मचारीही सहभागी झाले होते.

आपले म्हणणे कामातून दाखवून दिले की व्यवस्थेला त्याची दखल घ्यावीच लागते. अनेक आमदार-खासदारांच्या शेकडो गावांतून उभा राहू शकला नाही, तो नैतिक दबाव एकट्या राळेगणने सिद्ध केला. 'लोकपंचायत'ने कामात ही दिशा कायम ठेवली.

विलासराव साळुंखेंच्या पाणी पंचायतीच्या प्रयोगाने 'लोकपंचायत'चे कार्यकर्ते झपाटले होते. गावातील नैसर्गिक साधनांचे संवर्धन गावकऱ्यांच्या माध्यमातून करण्याचे त्यांनी ठरवले. पण गावकऱ्यांशी बोलल्यावर जाणवले, नैसर्गिक साधने आहेत कुठे? ज्या जंगलाचे संवर्धन करायचे ते जंगल कधीच नामशेष झाले; ज्या पाण्याचे संवर्धन करायचे ते पाणी एकमेकांचा जीव घेणारे माध्यम ठरतेय. ज्या जमिनीचे संवर्धन करायचे ती केव्हाच नापीक बनलीय. मग 'कृषक पंचायती'ची



संकल्पना पुढें आली. शाश्वत शेतीचे प्रयोग वाचनात, पाहण्यात येत होते. 'उत्तर महाराष्ट्र लोकविकास मंचा'च्या सहकारी गटांच्या माध्यमातून विचार करताना, जलव्यवस्थापन आणि शाश्वत शेती या दोन ध्येयांसाठी कृषक पंचायतीचे माध्यम पूरक ठरले. जलव्यवस्थापन, पीक पद्धती, बाजारपेठ यांबाबत सामुदायिक पातळीवर विचारविमर्श, निर्णय आणि कृतिकार्यक्रम या सर्व आघाड्या कृषक पंचायतींच्या माध्यमातून शक्य झाल्या. या माध्यमातून गावागावात सेंद्रिय शेतीचे प्रयोग फुलले, गांडूळ खतांचे प्रकल्प उभे राहिले, गावरान बियाण्यांचे संकलन-संवर्धन सुरू झाले.

शेतकरी संवाद यात्रा, पीक नियोजन कार्यशाळा, पाणी व्यवस्थापन कार्यशाळा, 'माझे शेत-माझे विद्यापीठ' या उपक्रमांमधून बाह्य बाजारपेठेसमोर जाण्यासाठी आपल्या गावातील शेवटच्या स्तरातील शेतकऱ्याला सक्षम केले गेले.

कृषक पंचायतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांशीच संवाद साधताना वेल्हाळे गावातल्या शेतकऱ्याने प्रश्न मांडला, "शेतीच पिकत नाही, मग प्रयोग कसे करायचे?" 'लोकपंचायत'च्या कार्यकर्त्यांनी हा प्रश्न सोडून दिला नाही. त्याचा मागोवा घेताना कळले, मंगलम नावाच्या कारखान्यामुळे होणारे रासायनिक प्रदूषण यास कारणीभूत आहे. तेव्हा 'लोक संघर्ष समिती'च्या माध्यमातून 'लोकपंचायत'ने लोकांना संघटित केले, उपोषणांपासून ॲडव्होकसीपर्यंत सर्व साधनांच्या माध्यमातून संघर्ष छेडला. न्याय्य मागण्यांसाठी लढा दिला. पुढे या 'लोकसंघर्ष समिती'च्या शाखा गावागावांत उभ्या राहिल्या. कुठे रोजगार हमीच्या कामातील गैरव्यवहार असो, तर कुठे रेशनिंग व्यवस्थेतील भ्रष्टाचार असो, 'लोकसंघर्ष समिती' संगमनेर तालुक्यातील गावकऱ्यांसाठी न्याय मागणारे व्यासपीठ ठरली. पायाभूत सुविधांपासून मूलभूत हक्कापर्यंत अनेक लहानमोठे लढे या माध्यमातून झाले, होत आहेत.

कामाला सुरुवात केली तेव्हा गावपातळीवर ज्ञान, माहिती ते संसाधने या सर्वांचीच कमतरता जाणवत होती. जागतिकीकरणाच्या वातावरणात या साधनांचा मोठ्या प्रमाणात गावकऱ्यांवर मारा होऊ लागला. जागतिकीकरणाच्या रेट्यात खेड्यातील माणसाचे स्वत्व हरवत असल्याचे जाणवू लागले. जागतिकीकरणाचे हे आक्रमण त्याच्या नैसर्गिक-भौतिक साधनसंपत्तीसोबतच बौद्धिक संपदेवरही होताना दिसत होते. घरातील, गावातील, समाजाच्या सर्वच उतरंडीतील शेवटच्या थरात दबलेली महिला हा 'लोकपंचायत'च्या कामाचा आणखी एक केंद्रबिंदू ठरला. बचतगटांच्या माध्यमातून सुरू झालेल्या महिलांच्या गावागावांतील संघटनांतून व महिला विकास परिषदांच्या माध्यमातून गावकारभारातील महिलांचा सहभाग संस्थेने दृढ केला. महिला सभांच्या माध्यमातून गावातील राजसत्तेत आपला ठसा उमटवला. महिलांचे प्रश्न आणि महिलांचे मुद्दे विकासाच्या गावगाड्याच्या चर्चेत आणले.




सामाजिक-राजकीय निर्णय प्रक्रियेत आणि कृतिकार्यक्रमांमध्ये महिलांचे सामूहिक नेतृत्व विकसित करीत असताना, अर्थकारणातील त्यांच्या सक्रिय सहभागाची गरज जाणवत होती. बचतगटांच्या माध्यमातून घरातील अर्थकारणात, ग्रामसभेच्या महिला सभांच्या माध्यमातून गावातील अर्थकारणात महिलांचा हा वाढणारा सहभाग, 'निर्मिती महिला उद्योग' आणि 'कृषी औद्योगिक सहकारी संस्थे'च्या माध्यमातून 'लोकपंचायत'ने अधिक बळकट केला. कुर्ड्या, पापड, सांडगे या पारंपरिक उद्योगांसोबत लिंबोळी तेल आणि पेंड उत्पादनाचा विक्रम प्रस्थापित केला.

महिला विकास परिषदांच्या माध्यमातून पंचायतीत निवडून आलेल्या महिला सदस्यांचा दृष्टिकोन असो वा 'निर्मिती'चा कारभार हाताळणाऱ्या महिला सभासदांचे कौशल्य असो, महिला सक्षमीकरणाचा एक सामूहिक साक्षात्कारच 'लोकपंचायत'च्या प्रवासात प्रत्यक्षात फळला, फुलला. या सर्व प्रवासात संवाद, प्रशिक्षण, प्रकाशन, समन्वय आणि संघर्ष या सर्व साधनांचा 'लोकपंचायत'ने आधार घेतला. यात संस्थेच्या कामाशी अनेक कार्यकर्ते जोडले गेले. सामूहिक नेतृत्व आणि सामूहिक निर्णयप्रक्रियेतून गेल्याने, 'लोकपंचायत'चे कार्यकर्ते असोत, युवा स्वयंसेवक असोत वा महिला सदस्य असोत, संस्थात्मक बांधणीसोबतच आपापल्या गावपातळीवरही सक्षम आणि सजग नेतृत्व म्हणून हे सर्व सहभागी होत आहेत.

ग्रामविकासाचे स्वप्न गावकऱ्यांच्या सामूहिक सहभागाने फुलवण्याचे 'लोकपंचायत'चे स्वप्न आज साकार झालेय. 'झोळे' नामक एका गावातून सुरू झालेला हा प्रवास आदर्श ग्रामयोजना, अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम, रोपवाटिका, पतसंस्था, व्यवसाय शिक्षण, बालविकास केंद्र, कलापथक, युवक संघटन अशा अनेक वाटांनी अधिक व्यापक होत गेला. 'लोकपंचायत'चे कार्यकर्ते मानतात, "अजूनही बरीच आव्हाने बाकी आहेत. राजकीय अभिनिवेश कुचकामी ठरताना दिसत आहेत. विकास कामांच्या चौकटी कालबाह्य होताना दिसत आहेत. सामूहिक प्रक्रिया आणि लोकाभिमुख विचार केंद्रस्थानी मानल्याने गावातील वावर, कार्यपद्धती आणि विचारांचा प्रभाव गावकऱ्यांवर दिसतो आहे. तरीही व्यापक आर्थिक-राजकीय-सामाजिक सत्ताकेंद्रांमध्ये सर्वसामान्यांना, तळातील वंचितांना, उपेक्षितांना सक्रियपणे सहभागी होण्यासाठी सक्षम करण्याचा प्रवास महत्त्वाचा आहे. लोकसंघर्ष समितीच्या माध्यमातून मंगलमला दिलेला शह असो वा निर्मिती उद्योगाच्या माध्यमातून महिलांमध्ये निर्माण केलेला आत्मविश्वास असो, त्या दूरच्या वाटेवरचे हे काही टप्पे आहेत. 'पणती जपून ठेवा... अंधार फार झाला...' हे ब्रीद घेऊन 'लोकपंचायत'चा सामूहिक सहप्रवास सुरूच आहे. ❑




# राधण्या-वाढणाऱ्यांना प्रतिष्ठा आणि आत्मविश्वास देणारा श्रमिक महिला विकास संघ

**वीणा गवाणकर**

वसई हे तालुक्याचं गाव असलं तरी तसं छोटंच. पण जागतिकीकरण, बाजारातील मंदी , तशात निर्माण झालेली वीज टंचाई यांची झळ या छोट्या गावालाही पोचलीच. अनेक लघु-उद्योग बंद पडले. अनेक जण बेकार झाले. आणि मग व्यसनांपायी होतं नव्हतं तेही घालवून बसले. या अशा गोष्टींचा परिणाम कुटुंब स्वास्थ्यावर झाल्याशिवाय कसा राहील! अनेक संसार उद्ध्वस्त झाले. गोरगरीब स्त्रियांना ओढगस्तीनं त्रस्त केलं. हाती ना कसलं शिक्षण ना कसलं कौशल्य. जगायचं तरी कशाच्या आधारावर? मुलाबाळांच्या खाण्यापिण्याच्या आणि शिक्षणाच्या आबाळीनं हादरवून सोडलेलं... यातून बाहेर कसं पडायचं?

खरं तर स्त्रियांना घरात आणि समाजात स्वाभिमानानं जगता यावं या हेतूनं पूर्वी १९७७ च्या सुमारास कै. लीलाताई वर्टी आणि श्रीमती इंदुमती बर्वे यांनी महिला संघ सुरू करून त्यात पापड, मसाले इ. तयार करून त्यांची विक्री करण्याचा उपक्रम चालू केला. पण पुढे काही कारणांनी तो थंडावला. लीलाताईंच्या मृत्यूनंतर तशाच प्रकारचं काही कार्य उभं करावं या हेतूने श्रीमती इंदुमती बर्वे, सौ. उषा मणेरीकर, सौ. जयश्री सामंत आणि सौ. शुभदा कोठावळे एकत्र आल्या.

कसलंही प्रशिक्षण, कौशल्य, व्यावसायिक वा औद्योगिक अनुभव नसलेल्या गरीब गरजू स्त्रियांसाठी कोणता उपक्रम सुरू करावा हा प्रश्नच होता. पण स्त्री कितीही अडाणी, अल्पशिक्षित, अशिक्षित असली – अगदी मुकी बहिरी असली तरीही – एक कला तिला हुकूमी अवगत असते, स्वयंपाकाची. रांधण्या – वाढण्याची. घरात आईकडून, सासूकडून तिने या कलेचे धडे घेतलेले असतात. 'घरगाडा रेटणं' करताना गृहव्यवस्थापनाचं कौशल्यच ती राबवत असते. याच काहीशा अवघड कौशल्याचा खुबीनं वापर करून घ्यायचा असं या चौघी जणींनी ठरवलं. पोळी-भाजी केंद्र सुरू करण्याच्या कल्पनेनं मूळ धरलं.

पोळी-भाजी केंद्राला प्राधान्य देण्यामागे आणखीही एक कारण होतं. वसईत नोकरी करणाऱ्या स्त्री-वर्गात मोठी वाढ झालेली. त्यामुळे तयार अन्नपदार्थ विकत घेतले जाण्याची शक्यता निर्माण झाली. तशी गरज असल्याचंही या चौघींच्या कानी होतं. या चौघींच्या विचाराला कृतिशील पाठिंबा दिला तो श्री. दत्ताराम मणेरीकर आणि श्री. भाऊ उर्फ अनंत द. राऊत यांनी. श्री. सुरेश वायंगणकर यांनी आधीच्या महिला संघाची जागा आणि सामान वापरासाठी दिलं.



पोळी-भाजी केंद्रावर काम करण्यासाठी स्त्रिया शोधणं हे तसं सोपं काम नव्हतं. कारण साचेबद्ध परंपरेत वाढलेल्या स्त्रीला अन्यत्र जाऊन पोळ्या लाटणं, स्वयंपाक रांधणं न मानवणारं. मग पूर्वीच्या पापड उद्योगात असलेल्या स्त्रियांना शोधून, त्यांची समजूत घालून त्यांची मानसिकता बदलण्याचा यशस्वी प्रयत्न कार्यकर्त्यांनी केला आणि सात जणी तयार झाल्या.

१७ मार्च १९९१ रोजी गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर 'श्रमिक महिला विकास संघ' स्थापन होऊन त्याचं पोळीभाजी केंद्र सुरू झालं. प्राथमिक खर्चासाठी या चौघींनी प्रत्येकी रु १०००/- आणि श्री. राऊत यांनी रु ५००/- देणगी म्हणून दिले.

'कुठे बाहेर जाऊन पोळ्या लाटायच्या, भाजी करायची, परक्या अनोळखी माणसापुढं उभं राहून वाढायचं, नाहीतर पोळी-भाजीचं पार्सल बांधून द्यायचं म्हणजे फार अवघडच वाटायचं सुरुवातीला. असला विचारसुद्धा पूर्वी कधी केला नव्हता. त्यात पुन्हा आम्ही सात जणी सात घरच्या. प्रत्येकीची रीत वेगळी. कामाची पद्धत वेगळी. आणि या केंद्रावर तर बाजारहाट, लादी पोछा, भाज्या निवडणं, धुणं-चिरणं, शिजवणं, दळण आणणं, भांडी घासणं असली सगळीच कामं करायची वेळ आमच्यावर आली. आधी आधी आम्हाला ते काही रुचायचं, पटायचं नाही. मोलकरणीने करायची कामं आपण कशी नि का करायची?... पण आमच्या कार्यकर्त्या ताई स्वत: हातात झाडू घेऊन साफसफाई करायच्या, ताटं वाट्या पुसायच्या. त्या म्हणायच्या, काम करण्यात कसली लाज? आपण घरी नाही का पडेल ते काम करत! प्रत्येक काम महत्त्वाचं. प्रत्येकीला ते करता आलं पाहिजे.... मग आम्ही पाळी पाळीनं सगळी कामं वाटून घेऊन करू लागलो. अगदी गल्ल्यावर बसून ऑर्डरी घेऊ लागलो...'

या सात जणी आणि कार्यकर्त्यांनी मिळून उत्साहानं पोळी भाजी केंद्र सुरू केलं खरं, पण गावातल्या जनतेचा प्रतिसाद अगदीच अत्यल्प. लोकांना तयार अन्नपदार्थ विकत घ्यायची सवय नव्हती. तो विचार रुजून तशी मानसिकता तयार होईपर्यंत संस्थेला कळ काढणं भाग होतं. सुरुवातीला अगदी थोड्या प्रमाणावर पोळ्या-भाज्या तयार होत. पण त्याही उरत. मग काम करणाऱ्या स्त्रियांचा उत्साहभंग होऊ नये म्हणून कार्यकर्त्याच ते जिन्नस विकत घेत... असेच दिवस चालले होते...

घरगुती पद्धतीने बनवलेले चविष्ट पदार्थ या केंद्रावर मिळतात, ते ताजे आणि स्वस्तही असतात हे हळूहळू लोकांच्या लक्षात आलं. आणि ते खरंही होतं. कारण केंद्राने आपल्याकडे तयार होणाऱ्या पदार्थांची गुणवत्ता नेहमीच कायम राखली. केवळ व्यवसाय हीच दृष्टी ठेवून ते आपला कारभार चालवत नाही. सजावट, 'कमिशन' वगैरे खर्चाच्या बाबी न ठेवल्याने केंद्राला पदार्थांचे दर स्वस्त राखता आले.

केंद्रावर तयार होणाऱ्या पोळी-भाजी, झुणका-भाकरीसाठी गिऱ्हाइकांची वर्दळ वाढू लागली. अगदी हमाल, कबाडी, कचरा गोळा करणाऱ्यांपासून ते डॉक्टर्स, वकील, व्यावसायिक





अशा विविध स्तरातील लोक येऊ लागले. विद्यार्थी, रिक्षा चालक, एस. टी. चालक यांची गर्दी वाढली... दीड रुपया तासावर काम करणाऱ्या त्या सात जणींचं वेतन वाढलं. त्यांचा उत्साह वाढला.

घरकामाचं मोल एरवी कोणी करत नाही. हिशेबातही धरत नाही. पण अशा संस्थेतून संघटितपणे केलेल्या त्याच कामाला अधिक शिस्त येते. योजकता वापरून सामान्य माणसाच्या अन्नविषयक गरजा, गुणवत्ता आणि किंमत याचा ताळमेळ राखता येतो आणि त्या सर्वाचं फलित मोबदल्याच्या रूपानं पदरात पडतं. त्या कमाईवर आपल्या संसाराला हातभार लावता येतो, नड भागवता येते, असे अनुभव घेतल्यावर या महिलांचा हुरूप अधिकच वाढला. पदार्थांत वैविध्य आणण्यासाठी त्या झटू लागल्या. गिऱ्हाइकांची मागणी लक्षात घेऊन लवकरच त्या वरण-भातही रांधू लागल्या.

श्रमिक महिला विकास संघाच्या पोळी-भाजी केंद्राची वैशिष्ट्यं लोकमानसावर ठसावीत अशीच होती. स्वच्छता, पदार्थांचा ताजेपणा, गुणवत्ता आणि जोडीला स्वस्त दर. इथल्या महिलांनी या चारही बाबत चोख दक्षता राखून लोकांत आपल्या केंद्राची गरज निर्माण केली.

आणि मग लोकांच्या मागण्याही वाढू लागल्या. मागणीनुसार फराळाचे जिन्नस तयार होऊ लागले. इथे मिळणारा एक रुपयाचा बेसन लाडू तर फारच प्रसिद्धीस आला. पार मुंबईत पोचला.

गाडीवर वडा-पाव आणि भेळ-मिसळ खाणाऱ्या विद्यार्थिवर्गाला आरोग्याच्या दृष्टीनं अधिक सकस पण कमी दरात खाऊ घालण्याच्या दृष्टीने केंद्रावर फराळाच्या जिन्नसांत वैविध्य आलं. प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी दोन रुपयात आणि माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी पाच रुपयात पोळी-भाजी देणं या महिलांनी जमवलं आणि त्या उपक्रमाला कमालीचं यश आलं.

विद्यार्थ्यांप्रमाणेच निराधार वृद्धांसाठीही या महिलांनी आपल्या विचारांचं वेगळेपण दाखवलं. त्यांना पचतील, पोषक ठरतील आणि त्यांच्या खर्चात बसतील असे पदार्थ वृद्धांसाठी खास बनू लागले. 'पार्सल सेवा' सुरू केल्यावर तर नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा ओढा या क्रेंद्राकडे अधिकच वाढला.

कुटुंबाच्या गरजा ओळखून गृहिणी जशी सर्वांच्या आरोग्याची काळजी घेत, खर्चाचा अंदाज बांधत, वेळेचं भान ठेवत कुटुंबातल्या प्रत्येक घटकाचं हित जपत घरातल्या उपलब्ध अन्नधान्याचा वापर करेल; त्याच पद्धतीनं, त्याच आस्थेनं केंद्रावरील या महिला काम करत असतात. त्यांच्या या सांघिक कार्याचं आणि समूह भावनेने काम करण्याच्या वृत्तीचं फळ त्यांना मिळायला फार वेळ लागला नाहीच.

केंद्राचा व्याप वाढला. तिथे कामाकरता येणाऱ्या स्त्रियांची




संख्याही वाढली. 'आम्ही साताच्या सत्तर आणि सत्तरच्या एकशे सत्तर कधी झालो ते आमचं आम्हाला कळलंच नाही. पूर्वी उंबरठ्याबाहेरचं जगच आम्हाला माहीत नव्हतं. कोणाशी बोलायचं म्हटलं तरी भीती वाटायची... पण आता नाना प्रकारचे, जाती-धर्माचे लोक केंद्रावर येतात. आम्ही त्यांच्याशी बोलतो. ऑर्डरी घेतो. पूर्वीप्रमाणंच काम वाटून घेऊन ती पुरी करतो. सर्व कारभार आम्हीच सांभाळतो. भाऊ (राऊत) असतातच मदतीला,' इथे सुरुवातीपासून काम करणारी महिला सांगते. 'इथला कारभार पाहाता पाहाता आम्ही आता चांगल्याच तयार झालोत. कार्यकर्त्या ताई आता सोबतीला असतातच असं नाही. आम्हीच निर्णय घेतो. ऑर्डरींचा हिशेब मांडतो. माल आणणं, पदार्थ पोचवणं पाहातो. लोकात खंबीरपणे वावरतो. इतर हॉटेलात कसं म्हणतात– 'पोऱ्या, फडकं मार,' 'पाणी आण ग्लासभर' तसं इथं नसतं बरं का! इथं म्हणणार 'ताई, पाणी देता का!' 'एक पोळी वाढा बरं' असं... आदर मिळतो. मान मिळतो. आम्ही इथं सगळ्या बायका. सकाळी पाचपासून रात्री बारा वाजेपर्यंत कामं करत असतो. पण इथं येऊन कोणाची टिंगल झालीय, छेडखानी केलीय असं कधीच घडलं नाही. आमचीच काय, पण इथं येणाऱ्या गिऱ्हाइकांतदेखील कसली गैरवर्तणूक होत नाही. आया-सास्वा आपल्या लेकीसुनांना बिनघोरपणे इथं कामाला पाठवतात.. एवढा विश्वास वाटतो या ठिकाणाबद्दल. ऑर्डरी पुरवायला घरोघरी जातो तेव्हादेखील केंद्रातली बाई म्हणून मानाची वागणूक मिळते. केंद्रासाठी जिथून सामान आणतो तिथून आम्ही आमच्यासाठी पण कधीकधी सामान आणतो. आम्हाला चांगल्या मालाचे बाजारभाव माहीत असतात. आमच्यापुढं लांडीलबाडी चालत नाही,' ती माहिती पुरवते.

केंद्राबद्दल समाजात विश्वास वाढत गेला आणि बारसं, साखरपुडा, पार्ट्या अशा ऑर्डर्स पूर्ण करता करता लग्नसमारंभाच्याही ऑर्डर्स या महिला स्वीकारू लागल्या. अगदी 'बुफे' ऑर्डर्सही. आता केंद्रात रोज शेकडो माणसं जेवून जातात किंवा जेवण बांधून नेतात. दिवाळीप्रमाणे नाताळासाठीही फराळाच्या ऑर्डर्स असतात.

गेली दहा वर्षं वसईत डिसेंबर महिन्यात वसई तालुका कला क्रीडा महोत्सव मोठ्या प्रमाणावर भरतो. ते सहा दिवस या केंद्रातील महिला शेकडो स्वयंसेवक, परीक्षकांना नाश्ता, भोजन चोखपणे पुरवतात. कोकण मराठी साहित्य परिषद संमेलनाची आणि अखिल भारतीय नाट्य संमेलनाची भोजनव्यवस्था या भगिनींनी व्यवस्थित पार पाडली. दोन्ही संमेलनांत शिस्तशीर भोजन प्रबंध ठेवून शेकडो प्रतिनिधींकडून कौतुकाची दाद घेतली. विशेष म्हणजे अशा प्रसंगी या स्त्रियांना अधिक कमाई करण्याची संधी असते हे लक्षात घेऊन नियमितपणे लाभ घेणाऱ्या ग्राहकांनी आपल्या वेळा बदलून या महिलांना सहकार्य दिलं. ह्या केंद्रानं आणि त्यात काम करणाऱ्या महिलांनी समाजमानसात स्वत:चं स्थान कसं निर्माण केलंय याचं हे द्योतकच.

अलीकडेच या महिलांनी एक नवं आव्हान स्वीकारलंय. वसई नगरपालिका रुग्णालय, कार्डिनल ग्रेशस रुग्णालय आणि आता आणखी काही खाजगी रुग्णालयातील रुग्णांसाठी त्या जेवण पुरवतात. कॅटरिंगचं कोणतंही प्रशिक्षण नसताना सर्व माहिती मिळवून तज्ज्ञांचं मार्गदर्शन घेऊन रुग्णांच्या वेळा आणि पथ्यं पाळून त्या नियमितपणे जेवण पुरवतात. जुलै २००५ मध्ये अतिवृष्टी झाली. त्यावेळच्या सर्व संकटांना तोंड देत रुग्णालयातील रुग्णांनाच नव्हे तर रुग्णालयातील डॉक्टर्स, परिचारिका, इतर कर्मचारी यांनाही त्यांनी चहा-नाश्ता-भोजन पुरवलं. आपल्यावरच्या जबाबदारीचं पूर्ण भान असल्यानेच त्या हे काम पार पाडू शकल्या आणि संबंधितांकडून मिळालेली वाहवा बिरुदासारखी मिरवू शकल्या.

कर्तव्याचं पुरेपूर भान असणाऱ्या या महिलांत हक्कांची जाणीव, सामाजिक भान यांचीही रुजवण झालीय.

दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून थोडी सुटका व्हावी, निखळ मनोरंजनाचे क्षण लाभावेत म्हणून केंद्र या महिलांची वार्षिक सहल नेतं. या विरंगुळ्यावर आपला हक्कच आहे असं त्या मानतात. सहलीचा ५०% खर्च संस्था उचलते. या सहलींचं व्यवस्थापन त्याच करतात, अडचणीही त्याच सोडवतात. संस्थेच्या कार्यकर्त्या त्यांच्या पाठीशी असतातच. वसईबाहेरचं वेगळं जग बघणं, नवं काही समजून घेणं, चार घटका स्वत:साठी घालवणं, प्रसंगावधान राखून अडचणींवर मात करणं असं बरंच काही त्या सहलींतून घडतं आणि अनुभवविश्व विस्तारत, समृद्ध होत जातं.

लोकांची 'श्रमिक महिला विकास संघा'कडून अपेक्षा वाढली. इथल्या महिला पाळणाघरही उत्तम चालवतील असा विश्वास त्यांना वाटला. तशी मागणीही वाढली आणि संस्थेने या महिलांच्या विश्वासावर पाळणाघर सुरू केलं. 'घरकुल' या घरकुलात नोकरीवर जाणाऱ्या स्त्रियांच्या मुलांबरोबर धुणी-भांडी अशी घरकामं करणाऱ्या महिलांचीही मुलं ठेवली जातात. अशा वर्गातील स्त्रियांना गरजेनुसार सवलतीचे दर लावले जातात. पण त्या सर्व बालकांची काळजी 'घरकुल'च्या महिला समभावाने आणि ममत्वाने घेतात. आज तीस मुलांना या केंद्राचा लाभ होत आहे.

'केंद्रात काम करू लागल्यावर आमच्या रांधण्याला प्रतिष्ठा आली. आमच्या ऑर्डर्सच्या तारखा मिळवायला लोक धडपडू लागले. आमची गरज निर्माण तर झालीच, पण घरीदेखील आमच्या शब्दांना, मतांना किंमत आली. आमचा आत्मविश्वास तर वाढलाच, पण एकीचं बळही समजलं. आमच्यातल्या एखादीचा नवरा दारूडा असेल तर तो तिला मारहाण, दमदाटी करायला घाबरतो. आम्ही तिला आधार देतो. त्याला चार खडे बोल सुनवतो. आजारपण, अडचण असली तर मदत करतो. ती एकटी नाही याची तिला खात्री असते. केंद्रावर नव्यानं येणाऱ्या बाईला आमच्यातली जुनी अनुभवी बाई काम समजावते, शिकवते. त्यात एखादी मुकी-बहिरीही असते. तिच्यासाठी आम्ही खुणांची भाषा तयार करतो. तिला आमच्यात



घेतो.... एखादीला कमी समजतं. मग तिला आम्ही सोपी, साधी कामं देतो. इथं कामासाठी येणाऱ्या प्रत्येक गरजू बाईला काही तरी काम मिळालंच पाहिजे असं आम्हाला वाटतं.'

केंद्रावर यायला लागायच्या आधी जातीचं, धर्माचं बंधन मानणाऱ्या या महिलांत त्या भिंती आता उरल्या नाहीत. इथं सर्व जाती-धर्माच्या महिला एकत्र काम करतात. आदिवासी महिलादेखील इथे आहेत. सर्व अडसर बाजूला पडून इथे वाढलीय ती संघ भावना. एकी. वाढताहेत इथे येणाऱ्या गरजू पण अप्रशिक्षित स्त्रीची कौशल्यं- व्यवस्थापनातलं, संभाषणातलं, संपर्कातलं, संघटनेचं आणि स्वयंपाकातलंही. त्यातून तिला मिळतोय स्वाभिमान, आत्मविश्वास, निर्णय घेण्याची क्षमता आणि आर्थिक बळही.

प्रारंभी केवळ दीड रुपया तासावर काम करणाऱ्या या स्त्रियांना आता रोज सहा तासांचं काम मिळतं. रु. ६०० पासून रु.२००० पर्यंत वेतन मिळतं. जादा कामाचं योग्य ते जादा वेतन मिळतं. पूर्वी बोनस देणं शक्य नव्हतं तेव्हा संस्था वर्षातून दोनदा – संस्थेच्या वाढदिवशी आणि दिवाळीला- गरजेच्या वस्तू भेट देई. आता गेली दहा वर्षं ८% ते १८% बोनस दिला जातो आणि वर भेटवस्तूही. या महिलांची मधून मधून वैद्यकीय तपासणी केली जाते आणि प्रत्येकीला ठराविक रक्कम वैद्यकीय भत्ता म्हणून दिली जाते. किरकोळ रजा व अर्जित रजा यांचा लाभ त्या घेतात. वर्षअखेर शिल्लक रजांचं रोखीकरणही त्या करू शकतात.

या महिला आपापसात भिशी लावत. पण कार्यकर्त्यांनी त्यांना प्रॉव्हिडंट फंड, विमा योजना यांची महिती करून दिली. बहुतेक सर्वांच्या विमा पॉलिसी आहेत. फंडात १२% पगार भरला तर संस्था त्यात १३% भर घालते. निवृत्ती वेतनही देते. आर्थिक व्यवहारातल्या या नव्या गोष्टी त्यांनी आधी न ऐकलेल्या, न पाहिलेल्या. आपण आपल्या भविष्याची तरतूद आपल्या बचतीतून करू शकतो याचा आनंद त्या घेताहेत.

एके काळी कुठल्याही अर्जावर सही करायला किंवा बँकेत पाय ठेवायला घाबरणाऱ्या या स्त्रियांनी स्वतःची एक पतपेढी सुरू केली आहे. या स्त्रियांना बचतीची सवय लागावी, कर्जापायी हातचा पगार वळता होऊ नये म्हणून संस्थेच्या कार्यकर्त्यांनी या महिलांपुढे पतपेढी सुरू करण्याचा प्रस्ताव ठेवला. समजावून दिला. या महिलांनाच भागधारक करून पतपेढी उभी राहिली. दरमहा वीस रुपयांपासून १५० रुपयांपर्यंत कुवतीनुसार प्रत्येक सभासद नियमितपणे पतपेढीत जमा करते. अडचणीच्या वेळी ५०० रु. पासून ५००० रु. पर्यंत उचल मिळू शकते. दहा समान हप्त्यांत ती उचल फेडायची असते. आज पतपेढीची कर्जवसुली १००% आहे आणि भाग भांडवल आहे ६ लाख ५० हजार रुपये. या पतपेढीचा सर्व व्यवहार, कारभार या महिलाच पाहातात.

स्त्रियांचा आर्थिक विकास घडवून आणणं केवळ एवढंच प्रयोजन श्रमिक महिला विकास संघाचं नव्हतं याचं प्रत्यंतर वारंवार येतं. या महिलांच्या सामाजिक जाणिवा, जबाबदाऱ्यांचं भानही विकसित झालंय. महिला अत्याचार विरोधी कृती समितीचा मोर्चा, स्वाधार संस्थेचा 'जागर मानवतेचा' उपक्रम यात त्या सक्रिय सहभागी झाल्या. कारगिल युद्धाच्या वेळी, गुजराथ भूकंपाच्या वेळी, त्सुनामी संकटाच्या वेळी या महिलांनी वर्गणी काढून संस्थेने देऊ केलेल्या मदत निधीत आपलीही भर उत्स्फूर्तपणे घातली. श्रमिक महिला विकास संघाची यशस्वी वाटचाल पाहून अनेक गट अशी केंद्रं उभी करण्यासाठी पुढे आले. त्यांना संस्थेच्या कार्यकर्त्या, काम करणाऱ्या महिला मार्गदर्शन करतात. सहकार्य आणि उत्तेजन देतात.


अलीकडेच या श्रमिक महिला विकास संघाला 'भाऊसाहेब वर्तक पुरस्कार' लाभला आणि आता महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका) चा समाजकार्य गौरव पुरस्कार लाभत आहे. आतापर्यंत शासनाकडून वा कोणत्याही संस्थेकडून अनुदान न घेता स्वसामर्थ्यावर संस्थेचा विकास करणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि त्यांना सार्थ साथ देणाऱ्या केंद्राच्या महिलांना आपल्या जबाबदारीची पूर्ण जाणीव आहे. एक जण या पुरस्कारांवर प्रतिक्रिया देताना म्हणते – 'अन्नपूर्णा केंद्राची पाहाणी करून आल्यापासून वाटतंय, आमची पण छान मोठी इमारत व्हावी. खूप गरजू बायकांना तिथं काम मिळावं. खूप लोकांची तिथं सोय व्हावी. आमचे पदार्थ पार इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलियाला पोचतात. आम्हाला खूप काही करायचंय...'

दोन स्त्रिया सुखानं एकत्र राहात नाहीत हा समज या संघाने खोटा पाडलाय. या महिला तर आपली संख्या, आपलं बळ वाढवून पुढची झेप घ्यायला आतूर आहेत. संघाची आजची उलाढाल ७७ लाखावर पोहोचलीय, ती त्यांना कमीच वाटतेय.

आज संस्थेचा विस्तार असा आहे :

१) न्यू इंग्लिश स्कूलजवळील वसईची केंद्र शाखा
२) पाटणकर पार्क, नालासोपारा (प.)
३) कार्डिनल ग्रेशस हॉस्पिटल, बंगली, वसई (पू.)
४) अलायन्स हॉस्पिटल, तुळिंज, नालासोपारा (पू.)
५) विद्यावर्धिनीचे तंत्रनिकेतन व वर्तक महाविद्यालय, नवघर, वसई.

❑



# शाहिरीतून परिवर्तनाची आस बाळगणारे

# लीलाधर हेगडे

■ सुधा वर्दे

लीलाधर हेगडेंना महाराष्ट्र फाउण्डेशनचा 'विशेष गौरव पुरस्कार' मिळाला हे ऐकले आणि इतका आनंद झाला की मला वाटले मलाच पुरस्कार मिळाला. लगेच वाटले, नाना (मधु दंडवते) असते तर त्यांनाही तितकाच आनंद झाला असता.

हा पुरस्कार साने गुरुजी परिवारातल्या सर्वांना फार आनंदाचा आहे. ६० वर्षांच्या अखंड शाहिरीचा गौरव आहे आणि शाहिरी म्हणजे कशी ? नुसती करमणूक नव्हे, तर सतत प्रबोधन!

१९४२ साली लीलाधर १५-१६ वर्षांचा होता, म्हणून तो स्वातंत्र्यसैनिक नाही, एवढेच. परंतु त्याने आंदोलनात भाग घेतला होता. १९४५ साली राष्ट्र सेवा दलाच्या शिबिरात लीलाधर कवी वसंत बापट यांच्या सहवासात आला आणि कायमचा शाहीर झाला. जशी होनाजी आणि बाळा, तशी ही लीलाधर आणि बापट यांची नामी जोडी जमली आणि शाहिरी सुरू झाली.

१९४६ ते २००६ ; पूर्ण साठ वर्षे शाहिरीतून प्रबोधन. एक आगळा-वेगळा पराक्रम. स्वातंत्र्य चळवळीतून वर आलेली मूल्ये, गांधीविचार यांचा खूपच प्रभाव लीलाधरवर आहे. अन्यायाचा प्रतिकार आणि समानतेचा पुरस्कार अगदी पोटतिडकीने केला लीलाधरने. त्याची शाहिरी त्याने कधी स्वत:साठी विकली नाही. त्याने स्वत:ला राष्ट्र सेवा दलाला वाहून घेतले. तो पूर्ण वेळ सेवक झाला. राष्ट्र सेवा दलाची निर्मिती स्वातंत्र्यलढ्यातून झालेली, स्वाभाविकच त्याला स्वातंत्र्यसमराबद्दल जबरदस्त आपुलकी आहे.

भारत स्वतंत्र झाला तेव्हा आपोआप समाजातला अन्याय जाईल, समानता येईल, माणुसकी येईल ही सर्वांची एक भाबडी समजूत होती. पण ते स्वप्नच ठरले. भारतात दलितांना मंदिरात प्रवेश नाही, म्हणून पूज्य सानेगुरुजींनी आमरण उपोषण करायचे ठरवले. त्यावेळेस एस. एम., अण्णासाहेब सहस्रबुद्धे, ना.ग. गोरे, रावसाहेब पटवर्धन आदी नेत्यांनी गुरूजींना सांगितले की आधी या प्रश्नावर जनतेचे प्रबोधन करा व मग उपोषण. झाले, बापट-लीलाधरला आयतीच संधी मिळाली. आधीच 'महाराष्ट्र शाहीर पथक' निर्माण झाले होते. त्यांनी अवघा महाराष्ट्र पिंजून काढला. लीलाधर सांगतो,



"मी पोवाडे म्हणताना माझ्या हातात डफ असायचा, तर माझ्या मागे साथीला साने गुरुजींच्या हातात झांज असायची." केवढा भाग्यवान लीलाधर !

तिथून जी शाहिरांची भ्रमंती सुरू झाली ती कधी थांबलीच नाही. शिवाजीच्या काळात मावळे चणे खाऊन लढायचे म्हणे ! महाराष्ट्र शाहिरांवर ५०च्या दशकापर्यंत ही वेळ अनेकदा आली. कार्यक्रम झाला की डफ, दिमडी घेऊन प्रेक्षकात फिरायची ही मंडळी. त्यात पैसे पडत आणि चणे-फुटाणेसुद्धा.

स्वातंत्र्यानंतर न्याय्य हक्कांसाठी जेवढे म्हणून लढे झाले, त्या सर्वांच्या प्रचारात लीलाधर आघाडीवर होता. संयुक्त महाराष्ट्राचा लढा, गोवा मुक्ती संग्राम, या सर्वांचा प्रचार. चिनी आक्रमणाच्या वेळी शाळा-शाळांमधून समरगीते गायली आणि 'चिनी आक्रमणाचा फार्स' या दादा कोंडकेलिखित नाट्याचे महाराष्ट्रभर प्रयोग केले. जे मिळतील ते भिडू गोळा करायचे आणि प्रबोधनासाठी फिरायचे. कधी निळू फुले, तर कधी दादा कोंडके. कधी राम नगरकर तर कधी सुधा वर्दे. ही झाली त्याची विशिष्ट प्रश्नांवरची शाहिरी. पण लढे नसतील तेव्हा...?

तेव्हा राष्ट्र सेवा दल कलापथकातून 'लोकरंजनातून लोकशिक्षण' हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून देशभर दौरे केले.

ऐंशीच्या दशकानंतर कलापथकाचे सततचे दौरे थांबले. तो जरा मुंबईकर झाला. सांताक्रूझमधल्या 'साने गुरुजी आरोग्य मंदिरा'ची जबाबदारी त्याच्यावर फार आधीच टाकलेली होती. लीलाधर कलापथक व आरोग्य मंदिर या दोन्ही जबाबदाऱ्या सहकाऱ्यांच्या मदतीने सहज पेलवून नेत होता. पण आता तो स्थिरावला आणि संस्थेत पूर्ण लक्ष घालू लागला. पण तिथेही त्याने सूर-ताल याला पूर्ण फाटा दिला नाही. 'साने गुरुजी संस्थे'त सामुदायिक गायनाला चालना दिली. मुला-मुलींना पोवाडे म्हणायला शिकवले. 'साने गुरुजी आरोग्यमंदिर' प्रबोधनात्मक सामुदायिक गीतगायनासाठी मुंबईत मान्यवर झाले. शिकवणाऱ्या धैसासबाई, पण प्रेरणा लीलाधरची.

'साने गुरुजी आरोग्य मंदिरा'ची 'स्मितालय' ही नृत्यशाखा. लीलाधरला त्याचे फार अप्रूप. शास्त्रीय नृत्य लोकांना समजले पाहिजे, मराठी माणसाने गाण्याप्रमाणे नृत्य आस्वादायला पाहिजे, म्हणून नृत्य शिकायला जास्तीत जास्त विद्यार्थी हवेत, त्यांचे कार्यक्रम व्हावेत ही त्याची सतत धडपड. आणि यात त्याला झेलम परांजपेची छानपैकी साथही मिळाली आहे. किंवा उलट म्हणा.


साने गुरुजी आरोग्य मंदिर ही बहुउद्देशीय शिक्षण संस्था



लीलाधरने तयार केली आहे. शिक्षणाबरोबर कला, क्रीडा, व्यवसाय, आरोग्यसेवा हे सर्व त्याने एका छताखाली आणले आहे.

लीलाधरविषयी लिहिताना आणखी एका वैशिष्ट्याचा उल्लेख करायला हवा. लीलाधरने कविता, पोवाडा कधी लिहिला नाही. पण नवसाक्षरांसाठी पुस्तके, बालवाङ्मय आणि मोठ्यांसाठीही गद्य वाङ्मय बरेच लिहिलेय. त्याला केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे बरेच पुरस्कारही मिळाले. तीनही प्रकारात राज्य शासनाचे पुरस्कार आहेत व बालवाङ्मयात व नवसाक्षरांसाठीच्या साहित्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार—दोघांचेही पुरस्कार आहेत. असे त्याला एकूण १० पुरस्कार मिळाले आहेत. या सर्व ललित वाङ्मयातून सहजगत्या प्रबोधन साधलेले आहे. प्रकाशकांच्या म्हणण्यानुसार लीलाधर हेगडेंच्या पुस्तकाला चांगली मागणी आहे. त्याच्या शाहिरीलाही महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक खात्याने १९९५चा शाहिरी लोककलांचा पुरस्कार दिला आहे.

हे सर्व चालू असताना लीलाधरची स्वत:ची शाहिरी तशी थंडावली होती. पण केंद्रात संघवाल्यांचे सरकार आले व त्यांनी इतिहासाची पाने 'भगवी' करायला सुरुवात केली; गांधीजींच्या विचारांवर हल्ले सुरू झाले, 'रथयात्रा' काढल्या गेल्या, नथुराम गोडसेचे जाहीररित्या कौतुक होऊ लागले आणि लीलाधरमधला शाहीर पुन्हा एकदा त्वेषाने थरारून उठला. स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास, त्यातून साकार झालेली मूल्ये, गांधीजींचा पोवाडा, स्वातंत्र्याचा पोवाडा—सर्व काही लीलाधर पुन्हा पोटतिडकीने गाऊ लागला. शाळा-शाळांतून,





गावा-गावांतून लीलाधर हे कार्यक्रम महाराष्ट्रभर करू लागला. साथीला कधी कुणी आहे, कधी कुणीच नाही. फक्त त्याचा डफ.

आज लीलाधर ७९ वर्षांचा झाला. मी १९४८ साली त्याचा पोवाडा प्रथम ऐकला तेव्हा जो थरार अनुभवला तोच थरार २००५ साली अनुभवला. फक्त मीच नव्हे, सर्व सभागृहाने अनुभवला. तीच ताला-सुरावरची पकड, तोच आवेश, तीच देहबोली. फक्त आता आवाजाचा गोडवा कमी झालाय. पण त्याच्या आवेशापुढे गोडवा बघतेय कोण? आजही त्याला सतत आमंत्रणे येत असतात. तुम्ही पैसे किती देता याची तो पर्वा करत नाही. पण 'संघवाल्यांच्या खोट्या प्रचारावर मात करणार' हा त्याचा पण आहे. राष्ट्र सेवा दल निर्मितीच्या वेळी धर्मवादी, प्रतिगामी शक्तींबरोबर सुरू झालेली लढाई लीलाधर त्याच्या शाहिरीच्या माध्यमातून अजून लढतोय. हातात कागदाचा चिटोराही न घेता लीलाधर दीड-दोन तास सहज कार्यक्रम करतो. त्याच्या शाहिरीला माझा सलाम.

महाराष्ट्र फाउण्डेशनला माझे शतश: धन्यवाद. कारण पोवाडे-

गायन ही उत्कृष्ट कला. पण ते पेश करणारी व्यक्ती अथवा संच विशिष्ट विचारसरणीचा असेल, तर समाजातले बुजुर्ग कलावंत, साहित्यिक त्या कलावंताची योग्य ती बूज राखत नाहीत, त्याला प्रचारकी म्हणतात. या प्रबोधनाची आवश्यकता महाराष्ट्र फाउण्डेशनने ओळखली याचा फार आनंद झाला. राष्ट्र सेवा दल कलापथकाची हीच गत. ३५ वर्षे अखंड, एकही भांडण न होता, कलेच्या माध्यमातून प्रबोधन करणारी अशी दुसरी संस्था नाही. पण पाठीशी राष्ट्र सेवा दल असल्यामुळे कलापथकाला व्यावसायिक कलावंतांत स्थान नाही. अर्थात कार्य करणाऱ्याला त्याची पर्वा नसते.

आणखी एक गोष्ट सांगावाशी वाटते, सुहासिनी (आमची मुगी, लीलाधरची बायको) जर लीलाधरच्या पाठीशी नसतीच तर त्याचे काही खरे नव्हते. हे लिहिणे औपचारिक नव्हे (प्रत्येक कर्तबगार पुरुषाच्या मागे वगैरे). मुगी स्वत: सेवादलात, कलापथकात होती, क्रियाशील होती. लीलाधरशी विवाह म्हणजे काट्यावरचा संसार, पण आपल्या विचाराचा संसार— हे जाणून सुहासिनीने हे वाण स्वीकारले. आजच्या त्याच्या गौरवात तिचाही वाटा आहेच.

❏



# प्रा. यशवंत सुमंत


## क्रियाशील अभ्यासक

■ चैत्रा रेडकर

प्रा. यशवंत सुमंत गेली अनेक वर्षे पुणे विद्यापीठात राज्यशास्त्राचे अध्यापन करत आहेत. अर्थात त्यांची ओळख ही फक्त विद्यापीठातील प्राध्यापक अशी नाही; सामाजिक चळवळी आणि परिवर्तनवादी परिघाला, परिवर्तनावर अचल निष्ठा असलेला अभ्यासक आणि विचारवंत म्हणून ते परिचित आहेत. सामाजिक शास्त्रांचा अभ्यास निव्वळ बौद्धिक कसरत म्हणून करणे किंवा प्रस्थापित व्यवस्थेच्या समर्थनासाठी सामाजिक शास्त्रांचा वापर होणे, प्रा. सुमंतांना मान्य नाही. सामाजिक शास्त्रांनी प्रस्थापित व्यवस्थेची अधिकाधिक चिकित्सा केली पाहिजे आणि तिच्या मर्यादा दाखवत अधिक निकोप व्यवस्थेच्या धारणेसाठी आवश्यक अवकाश दाखवला पाहिजे, असे ते मानतात. 'सामाजिक शास्त्रे व्यवस्था-परिवर्तन आणि मुक्तिदायी राजकारणाचे हत्यार बनली पाहिजेत' या भूमिकेतून आणि समाज प्रबोधन ही प्रबुद्ध अभ्यासकांची जबाबदारी मानून प्रा. सुमंत गेली अनेक वर्षे अध्यापनाबरोबर प्रबोधनाचेही कार्य करत आहेत.

राज्यशास्त्र हा त्यांचा अध्ययन व अध्यापनाचा विषय आहे; मात्र त्याचबरोबर समाजशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, साहित्य, कला, संगीत यांविषयीची जाण, आस्था आणि जिज्ञासेमुळे, जीवनाकडे पाहण्याचा समग्र दृष्टिकोन प्रा. सुमंतांकडे आहे. त्यांच्या लेखन-अध्यापन-प्रबोधनात या समग्र दृष्टिकोनाचा सातत्याने प्रत्यय येतो. प्रा. सुमंत यांच्यावर कार्ल मार्क्स, म. गांधी, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. विठ्ठल रामजी शिंदे, आचार्य जावडेकर, दि. के बेडेकर यांचे आणि स्त्रीवादाचे वैचारिक संस्कार आहेत. या व्यतिरिक्त कॉ. शरद पाटीलप्रणीत मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवादाचे आणि प्रा. य. दि. फडके व प्रा. राम बापट यांच्या राज्यशास्त्रीय चिंतनाचे वैचारिक ऋणही ते मानतात. प्रा. सुमंतांच्या वैचारिक मांडणीचा महत्त्वाचा पैलू हा त्यांचा द्वंद्वात्मक दृष्टिकोन आहे. फुले की रानडे, गांधी की आंबेडकर असे प्रश्न त्यांना द्वैती वाटतात. कारण कोणत्याही विचारवंताचा विचार समजून घेताना त्याला इतिहासाच्या विशिष्ट संदर्भात पाहणे जसे आवश्यक असते, तसेच इतिहासाच्या विशिष्टतेच्या पलीकडे जाऊन त्या विचारवंताच्या व्यापक





भूमिदृष्टीच्या संदर्भात त्याला समजून घेणेही गरजेचे असते असे ते मानतात. प्रत्येक राजकीय विचारवंताच्या विचारातील काही भाग हा कालसापेक्ष असतो तर काही भाग हा चिरंतन सत्य सांगणारा असतो. कालसापेक्ष गोष्टींची आठवण जागवत, विचारवंतांना परस्परविरोधी गटांमधे वाटायची द्वैती भूमिका घेण्यापेक्षा त्यांच्यातील द्वंद्वात्मकता अधोरेखित करत त्यांच्या विचाराला समजून घेण्याची पद्धत त्यांना अधिक व्यापक, परिवर्तनासाठी मार्गदर्शक आणि लोकसंग्रह करणारी वाटते. 'बहुजनलक्ष्यी राष्ट्रवाद' आणि 'बहुजनवादी गांधी' ही त्यांची मांडणी त्यांच्या या व्यापक दृष्टिकोनाचा प्रत्यय देतात. त्यांची ही मांडणी परिवर्तनवादी मूल्ये मानणाऱ्यांप्रमाणेच राजकीय विचाराच्या अभ्यासकांसाठीही महत्त्वाची आहे.

प्रा. सुमंतांनी केलेली राजकीय विचारांची मांडणी ही निव्वळ राज्यसंस्था-शासनसंस्थेविषयीच्या चर्चेपुरतीच मर्यादित नाही; मानवी जीवनाचे नियमन करणाऱ्या धर्मव्यवस्था, अर्थव्यवस्था, वर्ण-जातिव्यवस्था आणि पुरुषसत्ताक व्यवस्था यांची चिकित्साही त्यांना राजकीय विचारांचा अभ्यास करताना आवश्यक वाटते. त्यातूनच म. फुले, न्या. रानडे, म. शिंदे, स्वामी विवेकानंद, म. गांधी, डॉ. आंबेडकर, आचार्य विनोबा भावे, आचार्य जावडेकर यांच्या धर्मचिकित्सेच्या राजकीय आशयाची मांडणी ते करताना आढळतात. परिवर्तनवाद्यांनी धर्माला अविवेकाचा, मध्ययुगीन मानसिकतेचा आविष्कार म्हणून नाकारण्याच्या आणि मूलतत्त्ववाद्यांनी त्यावर आपला एकाधिकार सांगण्याच्या परंपरेला प्रा. सुमंतांच्या मांडणीने छेद बसतो. कर्मकांडात्मक धर्म किंवा संस्थात्मक धर्म यांपलीकडे जाऊन नवसमाज निर्मितीसाठी नैतिक मूल्यांची मांडणी आधुनिक भारतातील राजकीय विचारवंतांच्या धर्मविचारांतून कशा प्रकारे झाली, हे प्रा. सुमंतांनी उलगडून दाखवले आहे. दुसरीकडे धर्माच्या राजकीय वापराला भांडवली समाजात कशा प्रकारे चालना मिळते व त्यातून जमातवाद-मूलतत्त्ववाद कसा फोफावतो, हेही प्रा. सुमंतांच्या मांडणीतून पाहायला मिळते.

प्रा. सुमंतांनी जातिप्रश्नावरही अत्यंत सकस अशी मांडणी केली आहे. 'अर्वाचीन महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार' हा त्यांनी संपादित केलेला ग्रंथ त्याची साक्ष देतो. १९७० नंतरच्या काळात जातिसंस्थेचे स्वरूप, तसेच जात-वर्ग संबंधांवर प्रकाश टाकणारे संशोधन मुबलक प्रमाणात झाले. मात्र व्यवहाराच्या/जगण्याच्या पातळीवर ते लागू करताना अनेकदा बौद्धिक करामती झाल्याचे पाहायला मिळते. जातीच्या परिप्रेक्ष्यातून केलेली मांडणी वर्गाच्या परिप्रेक्ष्यातून खोडून काढायची आणि वर्गाच्या परिप्रेक्ष्यातून केलेली मांडणी जातीच्या अंगाने नाकारायची—या प्रकारच्या बौद्धिक करामतींमधून अनेकदा कार्यकर्त्यांचा बुद्धिभेद केला जातो. प्रा. सुमंतांनी केलेले जातिसंस्थाविषयक लेखन भारतातील आणि विशेषत: महाराष्ट्रातील जातिविषयक विचारमंथनाच्या आकलनासाठी

सम्यक दृष्टिकोन देते. प्रा. सुमंतांनी आधुनिक भारतातील विचारवंतांच्या स्त्रीविषयक विचारांचीही अत्यंत मार्मिक अशी चिकित्सा केली आहे. 'मिळून साऱ्याजणी', 'बायजा', 'किसान शक्ती', 'विचारशलाका' या नियतकालिकांतील त्यांचे स्त्रीविषयक लेखन अतिशय विचारप्रवर्तक आहे. स्त्रीवाद, जागतिकीकरणाचा विकसनशील देशांतील स्त्रियांवर झालेला परिणाम यांवर त्यांनी मोलाचे लेखन केले आहे. त्याचबरोबर फुले, आगरकर, रानडे, शिंदे, गांधी, विनोबा आदींच्या स्त्रीविषयक विचारांतील लिंगभावसंवेदनक्षमताही त्यांनी उलगडून दाखवली आहे. प्रा. सुमंतांची स्त्री प्रश्नावरील मांडणी स्त्री चळवळीला 'वेगळेपणाच्या राजकारणा'च्या (Politics of Difference) भोवऱ्यातून बाहेर पडण्यासाठी निश्चितच साहाय्यक ठरू शकते.

या विचारांना केंद्रबिंदू मानून नव्याने उदयाला येणाऱ्या सामाजिक शक्तींशी वैचारिक देवाणघेवाण करणे त्यांना महत्त्वाचे वाटते. सत्यशोधक मार्क्सवादी, आंबेडकर अकादमी, बहुजनवादी विचारधारा मानणारे विविध गट/संघटना, मुस्लिम ओ. बी. सी. संघटना, समाजवादी जनपरिषद, राष्ट्र सेवा दल, अंधश्रद्धा निर्मूलन संघटना, अनेक स्त्रीवादी गट/संघटना यांसारख्या चळवळी/संघटनांशी असलेले त्यांचे नाते याच वैचारिक भूमिकेतून निर्माण झाले आहे. वैचारिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी आपली मांडणी प्रत्यक्ष लोकांबरोबर काम करणाऱ्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे व त्यांच्या अनुभवाच्या प्रकाशात ती तपासूनही पाहिली पाहिजे, असे ते मानतात. त्यातूनच वर नमूद केलेल्या संघटनांसाठी प्रा. सुमंत सातत्याने अभ्यास शिबिरे घेत असतात. अनेक स्वयंसेवी संघटनाही वैचारिक मार्गदर्शनासाठी त्यांच्या संपर्कात आहेत. समाजात नव्याने उदयाला येणारी एखादी सामाजिक संघटना असो किंवा एखाद्या नवशिक्या कार्यकर्त्याने/विद्यार्थ्याने विचारलेला प्रश्न असो, प्रा. सुमंत त्याला अत्यंत आस्थेने व गांभीर्याने प्रतिसाद देतात. प्रा. सुमंतांच्या वैचारिक बैठकीत आणि एकूणच जीवनदृष्टीत तुच्छतावादाचा लवलेशही आढळत नाही. अर्थात अस्मितेच्या राजकारणाच्या सापळ्यात अडकलेल्या चळवळीला अनेकदा ही व्यापक वैचारिक झेप न पेलल्याने एक प्रकारच्या एकाकीपणालाही त्यांना सामोरे जावे लागते. अर्थात त्याकडेही प्रक्रियेचा एक भाग म्हणून ते पाहतात.


सामाजिक शास्त्रांप्रमाणेच साहित्य, संगीत, कला यांविषयी प्रा. सुमंतांना आदर आणि जिज्ञासा आहे. त्यांच्याकडील पुस्तकसंग्रहाचे वैविध्य पाहून त्यांची सामाजिक शास्त्रांएवढीच साहित्य-संगीत-कलेतील अभिरुची आणि गती स्पष्ट होते. विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे नातेसंबंध विद्यार्थ्याला बोलते करणारे आणि प्रक्रियेविषयीचे तिचे/त्याचे भान वाढवणारे, कुतूहल जागे करणारे आहेत. सरांच्या घरातील मोकळ्या वातावरणामुळे



विद्यार्थ्यांचा आणि कार्यकर्त्यांचा तिथे मुक्त वावर असतो. अडीअडचणीत सरांचे घर हे आपले घर वाटण्यामागे सरांएवढाच सरांच्या पत्नी माधुरीताईंचाही मोलाचा वाटा आहे. त्यांच्या घरी विद्यार्थी-कार्यकर्त्यांच्या अखंड चाललेल्या चर्चांत माधुरीताईंचाही महत्त्वाचा सहभाग असतो. समुपदेशन आणि स्त्री आरोग्याच्या क्षेत्रातील त्यांच्या कामामुळे चर्चाविषयाच्या दुर्लक्षित पैलूवर त्यांनी टाकलेला प्रकाश मोलाचा असतो.

वैचारिक दृष्ट्या अत्यंत समृद्ध असलेल्या, समाजजीवनाकडे पाहण्याची सम्यक दृष्टी असणाऱ्या आणि राजकारणाचे प्रगल्भ भान असणाऱ्या प्रा. यशवंत सुमंतांसारख्या क्रियाशील अभ्यासकाची अधिकाधिक नोंद घेतली जावी, असे त्यांच्या संपर्कात असलेल्या कार्यकर्त्यांना आणि विद्यार्थ्यांना नेहमीच वाटत असते. अध्यापन आणि प्रबोधनाच्या व्यग्रतेत सरांना लेखनासाठीही सवड मिळो, हीच या निमित्ताने सदिच्छा!

❑



# लक्ष्मण माने
## विमुक्तांचा संघर्षशील संघटक

■ **अरुण खोरे**

महाराष्ट्र फाउण्डेशनचा यंदाचा 'सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार' भटक्या विमुक्तांच्या चळवळीतील जेष्ठ नेते आणि तळमळीचे कार्यकर्ते लक्ष्मण बापूराव माने यांना जाहीर झाला, ही जशी आनंदाची गोष्ट आहे; तशीच त्याने बौद्ध धर्मात प्रवेश करण्याच्या दृष्टीने जी सामाजिक मंथनाची प्रक्रिया सुरू केली आहे, त्या पार्श्वभूमीवर तर विशेष महत्त्वाची आहे.

यानिमित्ताने मला एका जुन्या प्रसंगाचे स्मरण झाले, ते येथे मुद्दाम नोंदवितो. बुद्ध-तत्त्वज्ञान विचारांचे एक सूत्र लक्ष्मणच्या अभ्यासात, निरीक्षणात आणि तो जे काम करतो आहे त्याच्या अंमलबजावणीत असे सगळीकडे जोडलेले होते, हे त्यातून ठळकपणे जाणवत गेले.

ही साधारणत: दहा वर्षापूर्वीची गोष्ट. सातारा शहरातून सज्जनगडाकडे जाणाऱ्या मार्गावर, अजिंक्यताऱ्याच्या पायथ्याशी यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने समाजशास्त्र संशोधन संस्था आणि शारदाबाई पवार यांच्या नावाने आश्रमशाळा उभी आहे. बुद्धस्तुपाच्या रचनेप्रमाणे या संस्थेचे प्रवेशद्वार आहे. दर्शनी भागातच यशवंतरावांचा पुतळा आहे. या संस्थेची उभारणी होत असताना, तिचे काम पाहण्यासाठी त्यांच्या आग्रहावरून आम्ही तिथे गेलो होतो. इमारतीची रचना अष्टकोनी होती. काम वेगाने सुरू होते आणि एकेका कोनात परसासारखी मोकळी जागा सोडली होती. मी त्याबद्दल विचारले तेव्हा लक्ष्मण म्हणाला, "बुद्ध दर्शनात अशी जागा सरपटणाऱ्या प्राण्यांसाठी सोडलेली असते. त्यांचेही अस्तित्व माणसाने लक्षात घेतले पाहिजे म्हणून ही जागा सोडली आहे." एखाद्या सामाजिक संस्थेची उभारणी करताना, आपल्याला पटणाऱ्या विचारांचा असा अंगीकार करणारा नेता व कार्यकर्ता खरोखरच दुर्मिळ आहे. आज या संस्था विस्तारल्या आहेत आणि भटक्या विमुक्त समाजातील शेकडो मुलांना त्यामुळे हक्काचा आधार मिळाला आहे. 'यशवंतराव चव्हाण समाजशास्त्र संशोधन संस्थे'ला शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेत मोठी मान्यता आहे.

ग्रंथालीने 'उपरा' हे लक्ष्मणचे आत्मकथन प्रसिद्ध केल्यानंतर सर्वत्र त्याला 'उपरा'कार म्हणून ओळखले जाते. मराठी साहित्यात कैकाडी जमातीतील या तरुणाच्या आत्मकथेचे मोल किती मोठे आहे याचे विश्लेषण करण्याचे हे स्थळ नव्हे; तरीही एक गोष्ट आवर्जून सांगतो. दलित आत्मकथनांचा प्रभावी प्रवाह मराठी साहित्यात रुजत असताना, गावगाड्याच्या बाहेर असलेल्या भटक्या विमुक्त समाजाची कहाणी पहिल्यांदा इतक्या नेटकेपणाने आणि अनुभवाच्या मुशीतून आली. तिचे बळ भटक्यांची चळवळ विस्तारण्यासाठी निश्चितच मिळाले.

आपल्या समाजातील भटक्या विमुक्त समाजाची दु:खे ही





आपल्याला ज्ञात असलेल्या शतकांपेक्षा जुनी आहेत. १८७१ साली ब्रिटिश सरकारने मद्रास इलाख्यासाठी गुन्हेगारी कायदा केला. या कायद्यानंतर गुन्हेगार मानल्या गेलेल्या जमातींच्या लोकांना नजरेखाली ठेवण्यासाठी 'सेटलमेंट कॉलनी' उभ्या करण्यात आल्या. १९०८-०९ साली हा कायदा कर्नाटक, महाराष्ट्र टापूंसाठीही लागू करण्यात आला. तेथेही तारेचे कुंपण असणारी सेटलमेंट उभी करण्यात आली. विमुक्त जमातींसाठी ही कुंपणाआडची वसाहत अनेक ठिकाणी उभी राहिली. स्वातंत्र्य चळवळीच्या मोठ्या वादळातही हा सामाजिक प्रश्न तसा बाजूलाच पडला होता. मात्र १९३५-४०च्या दरम्यान गांधीजींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य चळवळ आणि डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील दलित समाजाचे आंदोलन यामुळे तारेच्या कुंपणाआड जगणाऱ्या या समाजातील तरुणांना थोडेफार नवे भान येत होते.

यातूनच महाराष्ट्र-कर्नाटकातील विमुक्त जमातीतील तरुणांनी संघटित व्हायला सुरुवात केली. सोलापूरचे बोधक नगरकर, भीमराव जाधव गुरूजी, अंबरनाथचे रामा रावजी आणि काशीनाथ जाधव, कर्नाटकातील कनेश्वरचे चौळप्पा व गदगचे छप्परमणी या पिढीने गुन्हेगार जमाती कायदा रद्द करण्यासाठी थेट पंडित नेहरूंनाच आवाहन केले. या आवाहनाला नेहरूंनी दाद दिली आणि सोलापूर सेटलमेंटचे कुंपण तोडण्यासाठी ते १९६० साली स्वत: जातीने उपस्थित राहिले. दरम्यानच्या काळात या समाजासाठी पुनर्वसनाची समिती नेमून या लोकांना रोजगार देणाऱ्या नव्या वसाहतींची निर्मितीही सुरू झाली होती. महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांनी या विषयात आस्थेने लक्ष घातले होते. त्यामुळेच सोलापूर शहर व परिसरात भटक्या विमुक्त समाजाच्या लोकांना अनेक सोयी-सुविधा मिळाल्या. काही वसाहती बेळगाव, विजापूर येथेही स्थापन झाल्या. डॉ. आंबेडकरांनी 'शेड्युल कास्ट फेडरेशन'च्या माध्यमातून विमुक्त समाजाच्या लोकांना निवडणुकीच्या प्रक्रियेत राजकीय स्थान देण्याचा प्रयत्न केला.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळात उदयाला आलेल्या या पहिल्या पिढीचा महापौर होण्याची संधी १९७४ साली भीमराव जाधव यांना मिळाली. या दरम्यानच विधानपरिषदेवर दौलतराव भोसले यांना सरकारने सदस्य म्हणून नियुक्त केले. औरंगाबादचे आसाराम गुरूजी, मोतीराज राठोड, सोलापूरचे बाळकृष्ण रेणके या पाठोपाठच्या पिढीला आंदोलनाचे नवे भान आले.

विमुक्त जमातीच्या या एकूण जागरणात आणि प्रबोधनाच्या चळवळीत 'उपरा' प्रसिद्ध झाल्यावर एक गुणात्मक भर पडली आणि अतिशय निकडीने या विषयाकडे राज्यकर्त्यांचे व समाजाचेही लक्ष गेले. उपरापाठोपाठ 'बंद दरवाजा', 'पालावरचं जग', 'प्रकाशपुत्र', 'खेळ साडेतीन टक्क्यांचा', 'का कराचं शिकून?' 'भटक्यांचं भारूड' अशी अनेक पुस्तके लक्ष्मणने लिहिली. पुण्यातील मॅजेस्टिक साहित्यिक गप्पांत बोलताना





'साडेतीन टक्क्यांची संस्कृती' या शब्दप्रयोगाने त्याने खळबळ माजवली. मराठी समाज व साहित्यातील संकुचितपणाला त्याने यातून अधोरेखित केले. जातिव्यवस्था आणि धार्मिक प्रभुत्वावर त्याने सातत्याने टीका केली. लेखन करीत असतानाच तो कार्यकर्ता म्हणून अथक परिश्रम करून वावरत होता.

यशवंतराव चव्हाणांनी लक्ष्मणच्या या चळवळीत आणि सामाजिक समस्यांत विशेष आस्थेने लक्ष घालून 'राज्य शासनाने मदत केली पाहिजे,' असे आवाहन केले. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी हे आवाहन शासनाच्या धोरणात्मक पातळीवर स्वीकारून फार मोठे काम केले. मात्र हे पूर्ण झाले असे म्हणता येणार नाही. १९८०च्या सुमाराला भटक्या विमुक्त प्रश्नाचे मंथन नव्याने सुरू झाले, 'उपरा' हे त्याचे ठळक निमित्त ठरले. या आत्मकथनातील साहित्यगुणांनी त्याला 'साहित्य अकादमी', 'फोर्ड फाउंडेशन'सह अनेक पुरस्कार मिळवून दिले. सेवादलाचा कार्यकर्ता असलेला लक्ष्मण आता एका नव्या वाटचालीकडे निघाला.

'भटक्या विमुक्त जमाती संघटना' १९८३ साली स्थापन करण्यात आली आणि लक्ष्मण या संघटनेचा अध्यक्ष झाला. या संघटनेने जागृतीची कामे सुरू केली आणि कुठल्याही चौकटी नसलेल्या या समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी आश्रमशाळा सुरू केल्या. यशवंतरावांबरोबर शरद पवार, बाबा आढाव यांच्यासह अनेकांनी लक्ष्मणची चळवळ आणि त्याचे काम हे 'आपले' मानले. ग्रंथाली चळवळीने त्याला आपल्या लेखकांच्या वर्तुळात घेतले. कार्यकर्त्याचा पिंड तो कधीही विसरत नाही. त्यामुळेच पुणे शहराच्या परिसरातील भटक्या विमुक्तांच्या वस्त्या त्याने एखाद्या मोहिमेप्रमाणे पिंजून काढल्या. सामाजिक चळवळीतले अनेक लहान-थोर कार्यकर्ते त्याच्याबरोबर सतत वावरत होते. 'आमच्या मुलांना शिकून नोकऱ्या मिळणार का बाबा?' असा प्रश्न कुंचीकोरवी समाजातील बायका या मोहिमेत त्याला विचारात होत्या. कधी एखाद्या गोठ्याजवळ, तरी कधी एखाद्या कचराकुंडीपाशी, तर कधी एखाद्या न दिसणाऱ्या खड्ड्यापाशीही या सभा किंवा बैठका व्हायच्या. हडपसरजवळची माकडवाल्यांची वस्ती, येरवड्याची कंजारभाट वस्ती, अलका टॉकीजजवळची जोशी वस्ती येथे या बैठका होत होत्या. बाबा आढाव, अनिल अवचट, सुनंदा अवचट, नीलम गोऱ्हे, शिवलाल जाधव, मूरचंद भाट, यल्लापा वैदू, हरि नरके, विलास वाडेकर असे अनेकजण बरोबर असायचे. मी आणि लक्ष्मण रत्नपारखे आमच्या वृत्तपत्रांसाठी (अनुक्रमे 'सकाळ' व 'केसरी') या बैठका रोज कव्हर करण्यासाठी जायचो. आमच्या दृष्टीने हे नवीन जग होते. यातले काही जीवन लक्ष्मणने 'रविवार सकाळ'मध्ये लिहिलेल्या 'बंद दरवाजा' या सदरामधून आम्हाला परिचित झाले होते. 'सकाळ'चे तत्कालीन संपादक श्री. ग. मुणगेकर आणि सहसंपादक सदा डुंबरे यांनी लक्ष्मणशी चर्चा करून हे सदर पाक्षिक सुरू केले



होते. पुढे साताऱ्यात मुणगेकरांच्या हस्ते लक्ष्मणचा जाहीर सत्कारही झाला होता. त्यामुळे फासेपारध्यांचे जग आणि जुनाट प्रथांना कवटाळणाऱ्या जमातींचे नित्याचे जीवन प्रत्यक्ष पाहणे हा सुन्न करणारा अनुभव ठरला. या काळात आम्ही प्रभावित झालो ते लक्ष्मणच्या थेट भिडणाऱ्या भाषणांनी. डोक्यात असलेल्या चित्रगुप्ताचा हिशोब, कर्मविपाकाचा सिद्धांत आणि आपले दगड व देव यांच्या संबंधात अशा जहाल भाषेत लक्ष्मण बोलायचा की, त्याची प्रतिक्रिया एकतर सरसरून टाळ्या किंवा सुन्न होण्यातच येत असे. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर यांचे नाव घेत त्यांचे विचार या समाजाला सोपेपणाने सांगत व्यवस्थेवर टीकेचा घणाघाती हल्ला तो करीत असे.

भटक्या समाजाशी एक लेखक म्हणून कार्यकर्त्याच्या रूपात थेट नाते जोडणारा लक्ष्मण माने हा या समाजातला पहिला नेता व कार्यकर्ता. १९८० नंतरच्या काळात उभा राहिलेला आणि संस्थात्मक काम नेटकेपणाने पुढे नेणारा, सोलापूरचे भीमराव जाधव गुरुजी यांच्यानंतरचा दुसरा नेता. आज सातारा, कोल्हापूर, सोलापूर, भोसरी-पुणे येथील आश्रमशाळेत एक हजाराहून जास्त मुले शिकतात. शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेतील 'यशवंतराव चव्हाण संशोधन संस्थे'त सामाजिक कार्याच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे दोनशे विद्यार्थी आहेत. या संस्था उभ्या करताना पवारांनी विविध माध्यमांतून सहकार्य केले. विशेष म्हणजे फलटण तालुक्यातील अनेक शेतकरी दरवर्षी आश्रमशाळेतील मुलांसाठी पाचशे ते सहाशे पोती धान्य गोळा करून देतात. फलटणचे जेष्ठ कार्यकर्ते सुभाष शिंदे यांनी त्यासाठी सातत्याने परिश्रम घेतले. संस्थात्मक व चळवळीचे काम वाढवण्यासाठी भटक्यांची 'शोधयात्रा' त्याने सुरू केली लातूरपासून आणि ती पोहचली मुंबईपर्यंत. या शोधयात्रेत पुढे 'उचल्या' लिहिणारा लक्ष्मण गायकवाडही सहभागी होता. मात्र लवकरच तो शोधयात्रेचा टीकाकार झाला. भटक्या चळवळीतील या काही सहकाऱ्यांचे आणि लक्ष्मणचे झालेले मतभेद व पुढे मनभेद माझ्यासारख्यांना आजही अस्वस्थ करतात.

शरद पवार आणि लक्ष्मण माने यांचे विशेष आणि वेगळे नाते आहे. यशवंतरावांनी जो सामाजिक ऋणानुबंध मानला, त्या भावनेतून हे नाते निर्माण झाले आहे. त्यामुळेच लक्ष्मणच्या संस्थांचे मार्गदर्शक अध्यक्ष म्हणून पवार सहकार्य करतात. दरवर्षी साताऱ्यातील जकातवाडी येथे ९ मे रोजी लक्ष्मणच्या संस्थांचे काम पाहायला आणि वार्षिक सभेला ते न चुकता उपस्थित राहतात. १९८८च्या डिसेंबरमध्ये ते मुख्यमंत्री असताना 'वर्षा' या त्यांच्या सरकारी निवासस्थानी भटक्या विमुक्तांच्या प्रश्नावर त्यांनी प्रदीर्घ बैठक घेतली. या समाजाचे प्रश्न सोडवणे, गुन्हेगार म्हणून भटक्या जमातींचा उल्लेख न करणे अशा गोष्टी शासनाने केल्या पाहिजेत, हा फोकस पवारांनी सगळ्या अधिकाऱ्यांना दिला. यशवंतरावांच्या सामाजिक बांधिलकीचा वसा पवार यांनी स्वीकारला आणि तो आजही ते चालवत आहेत, असे लक्ष्मणला वाटते. १९९४ साली साऱ्या महाराष्ट्रातून विरोधक आणि हितशत्रू पवारांवर आरोप करीत होते, टीका करीत होते. अशा वेळी शनिवार वाड्यासमोर महाराष्ट्रातील हजारो भटक्या विमुक्तांना एकत्र आणून या वातावरणात, ज्येष्ठ कलावंत यमुनाबाई वाईकर यांच्या हस्ते लक्ष्मणने आपल्या वंचित समाजाच्या वतीने पवारांना मानपत्र अर्पण केले होते. हे प्रेम आणि ही आस्था यामुळे पवार त्यावेळी हेलावून गेले होते.

लक्ष्मणच्या व त्याच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नामुळे भटक्या विमुक्तांना आरक्षणाची सुविधा पवार यांच्या काळातच मिळाली. याच प्रयत्नातील पुढील टप्पा गाठण्याच्या प्रयत्नात तो आहे. विमुक्तांच्या ९, भटक्यांच्या २८ आणि १९६५नंतर नव्याने लक्षात आलेल्या आणखी ५ अशा एकूण ४२ जमातींचा समावेश घटनेच्या अनुसूचित जमातीत व्हावा, यासाठी त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा चालवली आहे. याही प्रयत्नात पवार त्याच्या मागे उभे आहेत. भटक्यांची लोकसंख्या, त्यांना मिळणारे राजकीय - सामाजिक प्रतिनिधित्व आणि आर्थिक स्तरावरील संरक्षण याबाबत तो सतत असमाधानी असतो. १९९० साली राज्यपाल नियुक्तींमधून तो विधान परिषदेवर गेला. त्याची अभ्यासपूर्ण भाषणे आणि घणाघाती पण तर्कशुद्ध टीका यामुळे त्यावेळचे सभापती जयंतराव टिळक अनेकदा भारावून जात.

आज लोकशाहीच्या खुल्या स्पर्धेत तो उभा आहे. १९९९ आणि २००४ या दोन्ही विधानसभा निवडणुकांत तो उत्तर सोलापूर मतदारसंघातून उभा होता. दोन्ही वेळा त्याला अपयश आले. मात्र त्याची जिद्द आणि निर्धार यांना तडा गेलेला नाही. ❑




## पुनर्वसन संघर्ष समिती

# एक 'प्रतिभा मिशन!'

■ जयंत पाटील

आदिवासी. घनदाट, तसेच उजाड जंगलाचाही पुत्र. जमिनीला आई मानायचा. म्हणून जमिनीत नांगर खुपसणे म्हणजे त्याला आईवरच बलात्कार केला असे वाटायचे. झाडावरून पडेल तेच माझे, मी झाडावरून काहीही पाडणार नाही, असे म्हणणारा आदिवासी; मोळी विकणाराला कमअस्सल समजून, त्याला मुलगी न देणारा आदिवासी. आपल्या आयुष्यावर गणित स्वार झाले आहे, तर त्याने गणित आपल्या जीवनात मुरवून घेतले आहे. माझा हा बाण किती लांब आहे, तो किती वजनदार आहे, त्याच्याने कोणता प्राणी-पक्षी टिपायचा आहे आणि बाण किती वेगाने सोडायला हवा हे सारे त्याचे गणित आहे. त्याची छोटी छोटी मुले गुल्लेरमध्ये खडा घालून झाडीत लपलेला पक्षी अचूक टिपतात. हे जमिनीखालचे लोखंड आहे. या आदिवासी मुलांमधून एखादा गोलंदाज का नाही शोधला जात? पुस्तकी बहाद्दरांच्या पलीकडे आपली दृष्टी जातच नाही काय?

सर्वार्थाने जंगलावर जगणाऱ्या आदिवासीला तथाकथित प्रगतीच्या नावाखाली फार वर्षांपासून विस्थापित केले जात आहे. या आदिवासींच्या कामात जसे बाबा आमटे आहेत; तशा मेधाताईही आहेत; तशीच संघर्षासोबतच नवनिर्माणाचीही काळजी घेणारी प्रतिभा शिंदे आहे. तिची 'पुनर्वसन संघर्ष समिती' आता साऱ्यांना माहीत झाली आहे.

अवघ्या ३४ वर्षे वयाच्या प्रतिभाची झेप मोठी आहे. प्रतिभा टिपिकल मराठी कुटुंबात जन्मली आणि वाढली. आईने मुलांच्या बरोबरीने प्रतिभाला वाढविले-जपले. प्रतिभामधले तीव्र सामाजिक भान कुठून आले, असा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा साक्री या गावाला उत्तराचे श्रेय द्यावे लागते. साक्री हे गावच मुळी समाजवादी आचार-विचारांचे होते. प्रतिभाचे सहावी ते बी.एससी. पर्यंतचे शिक्षण इथल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले.

बाबा आमटेंच्या 'भारत जोडो यात्रे'त सामील होण्यासाठी घरी न सांगता प्रतिभाने नाकातली सोन्याची नथ (मोरनी) मोडली आहे. मुद्दल गमावून व्याजाची फिकीर न करणाऱ्या उदारमनस्क अशा शरदबाबूंच्या 'कमल'च्या (शेष प्रश्न) काही शेड्स प्रतिभामध्ये आहेत. तिच्या नावावर कुठलाही जमिनीचा तुकडा तिला नको आहे. 'जिथून हाका येतात, त्या दिशेने पावले वळणे' हे तीव्र सामाजिक भान जागे असण्याचे लक्षण मानले



जाते. 'भारत जोडो'चा अनुभव घेऊन प्रतिभा थोर शिक्षणतज्ज्ञ श्री. ना.य. डोळेसर यांनी स्थापन केलेल्या 'छात्रभारती' या संघटनेत गेली. या संघटनेत असताना तिने दलित, ग्रामीण कष्टकरी विद्यार्थ्यांची फी वाढ, वसतिगृह प्रश्न, एस. टी. पासेस् अशा प्रश्नांत लक्ष घातले. मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ, रिंकू पाटील जळीत प्रकरण, चंद्रकांत तपकिरे आत्महत्या, कुमारी अनिता सावंत व बालाजी शेंडगे यांच्या हत्या या साऱ्यांप्रकरणी प्रतिभाने रान उठवले. अन्यायाला वाचा फोडली. १९९२च्या सांताक्रूझच्या अभ्यास शिबिरात पूर्णवेळ कार्यकर्ता ही संकल्पना स्पष्ट झाली. इथेच संजय महाजनशी भेट झाली. आणाभाका न घेताच, हातात हात घालून दोघे विवाहबद्ध झाले.

१९९३ पासून प्रतिभाने मेधा पाटकरांच्या नर्मदा आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला. पुढे यथावकाश स्वत:चे काम सुरू केले, तरी सतत बारा-तेरा वर्षे ही साथ राहिली आहे. मणिबेलीत सरकारने पहिली झोपडी पाडली, त्याच्या निषेध आंदोलनात प्रतिभा पहिल्या तुकडीत होती. त्यांना एकवीस दिवसांचा कारावास झाला. (पण प्रत्यक्ष अकरा दिवसच कारावास भोगावा लागला.) पूर्णवेळ काम करायचे तर काही तरी सुटून जाते आहे, असे वाटायला लागले. ती रुखरुख वाढत गेली; अन् एक दिवस वाटले, 'अरे, संघर्ष आणि नवनिर्माण यांची सांगड घालायलाच हवी.' जिवाला जीव देणारे मित्र याच काळात भेटले. संजय तर होताच, शिवाय शिवाजी पवार, रंजना साळवे या मित्रांचीही सोबत मिळाली. याच काळात प्रतिभा एम.एस.डब्ल्यू. या परीक्षेत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पहिल्या क्रमांकाने पास झाली.

१९९४ मध्ये सातपुडा परिसरातल्या तळोदा, धडगाव, अक्कलकुवा या तीन तालुक्यांना तिने कार्यक्षेत्र मानले. या भागात रोजगारामुळे होणाऱ्या स्थलांतराचा प्रश्न मुख्य मानून त्यासाठी रचनात्मक पर्याय लोकसहभागातूनच उभा करायचा, हा संकल्प तिने केला आणि 'लोकसमन्वय प्रतिष्ठान' स्थापन केले. छोट्या छोट्या गटांमध्ये लोकांना संघटित करून प्रदीर्घ लढा देण्याची तयारी सुरू झाली. आदिवासी महिला व शेतकऱ्यांच्या सहभागातून बचत गट, धान्य बँक, परस बाग असे उपक्रम सुरू झाले. त्याच वेळी सरदार सरोवर प्रकल्पातून विस्थापित झालेल्या काही गावांमधील आदिवासींचे पुनर्वसन महाराष्ट्र शासनाने तळोदा व अक्कलकुवा तालुक्यांत ४२०० हेक्टर जंगल तोडून, जबरदस्तीने केले होते. त्याचा 'आजपर्यंतचे सर्वात आदर्श पुनर्वसन' असा डांगोराही महाराष्ट्र शासनाने प्रसिद्धीमाध्यमांतून पिटून घेतला; परंतु साऱ्या पुनर्वसितांची अवस्था आगीतून फुफाट्यात पडल्यासारखीच होती. विस्थापित होऊन इकडे आलेले स्थलांतरित आणि मूळ विस्थापित यांचे



प्रश्न राज्य पातळीवर नेण्यासाठी नंदुरबार, तळोदा येथे प्रतिभाने कार्यकर्त्यांसह उपोषण केले. १९९५ मध्ये सरकारला चर्चेसाठी यावे लागले. तिथूनच सरदार सरोवर पुनर्वसित विस्थापित व मूळ विस्थापित यांचा पुनर्वसन लढा, गेल्या दहा वर्षांपासून गाव ते दिल्ली या पातळीवर विविध आंदोलने, मोर्चे यांच्या माध्यमातून लावून धरण्यात आला आहे. आता सरकारला बरेच काही मान्य करावे लागले आहे. अघोषित विस्थापित (जे ५०टक्के आहेत) यांनाही जमीन द्यावी, तसेच आदिवासी मुलांना नोकरीत सामावून घ्यावे, या मागण्याही मान्य झाल्या.

१९९८ मध्ये भाजपचे आमदार या भागातून निवडून आले. संघर्ष समितीने रुजवलेले समाजवादी आचार-विचार, त्यांतून जागा झालेला आत्मविश्वास वाढला, तर आपल्या खुर्चीला धोका आहे हे आमदारांनी ओळखले. त्याच वेळी प्रकल्पग्रस्त व विस्थापित यांचा संघर्ष झाला. त्यात एका स्थानिक आदिवासीचा बळी गेला. त्याचे भांडवल करून भाजपने मोर्चा काढला. प्रतिभाला प्रमुख आरोपी केले. प्रतिभा, संजय आणि कार्यकर्त्यांना हद्दपार करण्याचाही प्रयत्न झाला.

रामपूर, वीरचक, देहली हे मध्यम धरण प्रकल्प व यांत पुनर्वसन नियोजन नाही; म्हणून आधी पुनर्वसन, मगच धरण, असा संघर्षपूर्ण पवित्रा संघटनेने घेतला आहे. आता दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू झाले आहे. स्थानिक अधिक प्रकल्पग्रस्त अशा दोघांसाठी पुनर्वसन संघर्ष समितीचे काम सुरू आहे. २००० साली संघटनांच्या माध्यमातून ग्रामसभेची निर्मिती झाली. सरकार दरवर्षी पिके नष्ट करायचे. रोझकुंड, गोरजाबारी या गावांमध्ये दमनचक्र सुरू करून लोकांवर केसेस भरल्या. आज ८० गावांमध्ये संघटनेचे काम सुरू आहे. प्रदीर्घ लढ्यानंतर सातबाराचे उतारे द्यायचे मान्य झाले आहे. (जे अजून मिळालेले नाहीत.) शेजारच्या गुजरातची मंडळीही सोबत आल्यामुळे, आता जवळजवळ २० हजार कुटुंबे 'पुनर्वसन संघर्ष समिती'शी जोडली गेली आहेत. जंगल, जमीन, पाणी यांवर हक्क शाबीत करण्यासाठी आदिवासींची एक अभेद्य भिंत उभी राहिली आहे. स्मिता, प्राजक्ता, विक्रम, सूर्यकांत, सुजाता, रंजना या कार्यकर्त्यांचीही मोलाची साथ मिळते आहे. प्रदीर्घ मौनातून जागे होऊन आता आदिवासी मुठी वळवून घोषणा देऊ लागले आहेत. एक विस्थापित कार्यकर्ता सभापती पदापर्यंत पोहोचला आहे. अपक्ष भागाबाई निवडणुकीला उभी राहिली आणि तिसऱ्या नंबरवर निवडून आली. संघर्ष समितीच्या कामात ६०टक्के महिलांचा सहभाग आहे. ८ मार्च २००४ ला जागतिक महिला दिनी आंबाबारीत 'डाकीण' प्रथा व अंधविश्वासविरोधी आदिवासी महिला संमेलन झाले. सध्या एकही 'डाकीण' महिला सापडलेली नाही. वीस-वीस, तीस-तीस किलोमीटर चालत कार्यक्रमांसाठी या महिला येतात, तरी ताज्यातवान्याच असतात. अशा महिला प्रतिभाला अत्यानंदाने



अभिवादन म्हणून मिठी मारतात. ते अपूर्व सखीमिलन पाहणाऱ्यांच्या डोळ्यांचे पारणे फेडते. या प्रदेशात कुपोषणाचा प्रश्न भीषण आहे. महिलांमधून आरोग्यसेविका करण्याचे काम सुरू आहे; पण संघटनेला एखाद्या सेवाभावी डॉक्टरची नितांत प्रतीक्षा आहे.

सध्या संघटनेत आदिवासींच्या होळीगीतांचे डॉक्युमेंटेशन सुरू आहे. बालकांसाठी बालदोस्त केंद्र सुरू केले आहे. मुलांचे पूर्वप्राथमिक शिक्षण त्यांच्या भाषेत व्हावे म्हणून संघटनेचा प्रयत्न सुरू आहे, कारण त्या मुलांना प्रमाणित मराठीच कळत नाही, म्हणून जवळजवळ ५७ टक्के गळती आहे आणि म्हणूनच पहिल्या वर्गापासून त्यांना आदिवासी भाषेसोबतच प्रमाणित भाषाही शिकवली जात आहे. यासाठी मराठी-आदिवासी शब्दकोश तयार होतो आहे. हा प्रयोग सरकारपुढेही मांडण्यात येणार आहे. वैदूंचे ज्ञान पुस्तकबद्ध करणे सुरू आहे. प्रतिभाला विश्वास आहे की राष्ट्रीय पातळीवर योगदान देऊ शकेल, असे आदिवासी नेतृत्व निश्चितच भविष्यात उदयाला येणार आहे.

बाबा आमटे साधनाताईंबद्दल म्हणतात, 'माझ्या प्रत्येक निर्णयाला तिचे समर्थन असते.' (बाबांच्या प्रत्येक निर्णयाला सूर्याचे लखलखते तेजही आहे.) प्रतिभा संजयबद्दल याच भावना व्यक्त करीत असेल इतका हा अबोल साथी तिच्या मागे खंबीरपणे उभा राहून सतत कार्यरत आहे. साऱ्या कामाचा तो प्रवक्ताही आहे. प्रतिभाला मिळणाऱ्या साऱ्या कृतज्ञतेच्या हारांमध्ये



फुलांना सांभाळणारा जो धागा असतो, तेच काम संजय करतो आहे. दोघांच्या प्रेमाने तो धागा मात्र केशरी झाला आहे.... 'दया करणे जे पुत्रांसी, तेचि दासा आणि दासी' अशा निष्ठेने कामासाठी भारतभर भिरभिरणाऱ्या प्रतिभाला एकुलता एक प्रतीक नावाचा पाच वर्षांचा मुलगा आहे. तो बापाच्या सावलीत आणि कार्यकर्त्यांच्या सहवासात मोठा होतो आहे; पण त्याला कधी तरी आई आठवते. कधी फोन करून तो म्हणतो, ''आई, मला तुझी फार आठवण येते आहे.'' प्रतिभा म्हणते, ''मी अमुक दिवशी नक्की येते.'' तरीही तो म्हणतो, ''खरंच येशील ना! तू म्हणतेस येईन, म्हणून मी वाट पाहत राहतो; पण तू येतच नाहीस... आता नक्की येशील ना?''

आज तरी कामात प्रतिभाचे घर काहीसे बाजूला पडले आहे, तरीही तिची धूळभरली पावले जेव्हा घराकडे वळतात, तेव्हा तिथे निश्चितच स्वर्ग अवतरत असेल... हे घर जसे तिच्या विसाव्याचे ठिकाण आहे, तसे ऊर्जेचे केंद्रही आहे. प्रतिभाला ही ऊर्जा अशीच मिळत राहो या आपल्या शुभेच्छा तिला देऊया...

❑



# आदिवासी-मच्छिमार महिलांना आत्मनिर्भर करणारी पूर्णिमा मेहेर

**■ रमाकांत पाटील**

आणीबाणीपासूनच्या गेल्या तीस वर्षांत अनेक माणसे भेटली. त्यांच्यात झालेले बदलही पाहिले. पण पूर्णिमा मेहेर त्यावेळेस होती तशीच आजही ताठ मानेने, सचोटीने, त्याच जिद्दीने अन् चिवटपणाने, तशीच प्रवाहाविरुद्ध उभी असल्याचे आम्ही सारेजण पाहतो आहोत.

पालघर तालुक्यातील देवखोप येथील बनीबाई तांडेल ह्या आदिवासी स्त्रीच्या कहाणीबरोबर पूर्णिमाचे हे लढाऊपणाचे नाते जोडले गेले आहे, असे मला नेहमी वाटते. पालघरजवळील आदिवासी वस्तीचे हे गाव. इथल्या साऱ्या आदिवासींच्या जमिनी सावकाराच्या कब्जात. स्त्रियांवरील अत्याचारांसह मजूर म्हणून होणारा त्यांचा छळ वेगळाच. सावकाराच्या ह्या अमानुषतेपुढे जिथे कोणी ब्र काढण्याची हिंमत करू शकत नव्हता; तिथे लढाईची गोष्ट तर खूपच दूरची. 'भूमिसेना' आणि 'राष्ट्र सेवा दला'च्या माध्यमातून ह्या गावाशी पूर्णिमासह अनेकांचा संपर्क सुरू राहिला आणि तेथील अशाच एका सभेत बनीबाईने 'ह्या अत्याचाराविरुद्ध आपण लढू' असे सांगत तिच्यातील वादळाला वाट करून दिली. सारे गावकरी, त्यातही बाप्येमंडळी तिचे हे साहस अवाक् होऊन, पण स्तब्धपणे पाहात होते. पण तिथूनच खरी ठिणगी पडली आणि पुढे संघटितपणाच्या ताकदीवर जमिनी मिळवत, जुलमाला रामराम ठोकत हा लढा यशस्वी झाला. अमानुष जमीनदाराविरुद्ध स्वत: तितक्याच आक्रमकपणे पुढे येत बनीबाईने केवळ देवखोपमधील लढ्यालाच बळ देण्याचे काम केले असे नाही, तर एकूण चळवळीलाच एक नवे परिमाण मिळवून दिले. अशा लढ्यातून स्थानिक माणसे घडत, पक्की होत असतात अन् त्याच बरोबरीने कार्यकर्त्यांनादेखील एक भान, दिशा मिळते.

ह्या लढाईनंतर कित्येक वर्षे देवखोप हेच पूर्णिमाचे घर बनले. जमिनी व बांधील मजुरांच्या मुक्तीनंतर पुढच्या पिढीने पुन्हा त्याच कचाट्यात सापडू नये याकरिता मुला-मुलींसाठी बालवाडी-पाळणाघर सुरू करण्यात आले आणि तिथून सुरू झालेला हा प्रवास अथकपणे चालूच राहिला.

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातून समाजशास्त्र विषय घेऊन पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या पूर्णिमाने शिक्षणानंतरच्या याच काळात सामाजिक कार्यकर्ती म्हणून 'महाराष्ट्र बाल विकास समिती' व 'कास्प प्लॅन' ह्या संस्थांमध्ये सुमारे १० वर्षे काम केले. मेधा पाटकरांच्या साथीने काम करण्याची संधी इथे मिळाल्याचाही तिला निश्चितच फायदा झाला.



'वडराई' ह्या स्वत:च्या गावात, घरात आणि आईच्या माहेरीही समाजवादी विचारांचेच वातावरण. याच बाळकडूतून मग लोकशाही समाजवाद हा केवळ विचार नव्हे, तर जीवननिष्ठा बनणे ओघानेच आले. वडराईतील राष्ट्र सेवा दल शाखेतून आणि इतरत्रच्या शिबिरांतून ह्या संस्काराला पाणी घातले गेले.

याच विचारांच्या धाग्याने भूमिसेनेशी जोडली गेल्यामुळे भूमिसेनेच्या अनेक आंदोलनांत पूर्णिमा सहभागी झाली. १९८४ दरम्यानच्या अशाच एका मोर्चात अटक होऊन, काळूराम धोदडेंसह तीदेखील तुरुंगात गेली. इथेही केळवे रोड, भूतालमान येथील लीला भुतकडे ह्या आदिवासी स्त्रीने पूर्णिमाच्या सुटकेसाठी स्वत: भरलेला दंड पूर्णिमासाठी एक महत्त्वाची आठवण बनून राहिला आहे. या प्रकरणातील न्यायालयातील घटनाही उल्लेखनीय अशी म्हणता येईल. भूमिसेना-नेते काळूराम धोदडेंसह अन्य १० पुरुष कार्यकर्त्यांबरोबरीने पूर्णिमा एकटीच 'स्त्री आरोपी' म्हणून न्यायासनासमोर उभी होती. सर्वांनी जामीन देण्यास नकार दिल्याने न्यायाधिशांनी सर्वांना एक महिन्याची कोठडी दिली. मात्र काही क्षणातच पूर्णिमाच्या बाबतीतील निर्णय न्यायाधिशांना खटकला. त्यांनी तिला पुन्हा बोलावून तुमचा निर्णय मला फिरवावासा वाटतो असे सांगत, तुमची दंड भरण्याची तयारी आहे का, असे पूर्णिमास विचारले. परंतु हा विचार आपण त्यावेळीच करायला हवा होता असे विनम्रपणे सांगत तिने न्यायाधिशांच्या विनंतीस चक्क नकार दिला आणि ती तुरुंगात रवाना झाली. या काळातील महिला कैद्यांबरोबरचे दिवसही पूर्णिमा विसरू शकली नाही. केळवे रोड भूतालमान येथील लीलाचे वडीलही यावेळी अटकेत होते. तिने आपल्या वडिलांच्या सुटकेसाठी दंड भरला अन् कुणीही सांगितलेले नसताना, त्यांच्या बरोबरीने पूर्णिमाचा दंड भरून तिने एक उदाहरण घालून दिले. खरे तर ती आपल्या वडिलांचा दंड भरून जाऊ शकली असती. मग एका आदिवासी—आपण अशिक्षित म्हणतो—अशा स्त्रीला आपलाही दंड भरण्याचा विचार का यावा, याचे उत्तर पूर्णिमाला आजही सापडलेले नाही. अन् लीलाने तिच्या मनात कायमचेच घर केले.

देवखोपसह मनोर परिसरातील आदिवासी भागात आरोग्य शिबिरे भरवतानाच दामखिंड येथे डॉ. सुभाष पाटकर, डॉ. अरुण रुमडे, डॉ. अरुण नेरूरकर, डॉ. भार्गव ठाकूर इत्यादींच्या मदतीने आरोग्य केंद्र चालवण्याचे श्रेयही तिच्याकडेच जाते. आठवड्यातून रविवार, तसेच सुट्टीच्या दिवशी दिवसभर हे केंद्र चालत असे आणि परिसरातील लोक दूरवरून उपचारासाठी येत असत.

वसंत नाचणे (दादा), हरेश्वर सावे, पुष्पा भावे, सदा बंदरकर-अरुणा तावडे यांच्या बरोबरीने 'श्रमिक साधना' ह्या संस्थेच्या माध्यमातून तिची ही सारी धडपड चालू होती. याच संस्थेच्या माध्यमातून पुढे 'सूर्या प्रकल्पा'च्या ह्या भागावर झालेल्या परिणामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. 'सूर्या'च्या पाण्याचा लाभ तर नाहीच, परंतु कालव्यासाठी घेतलेल्या जमिनीची नुकसानभरपाई, भुईभाडे असे अनेक प्रश्न वर्षानुवर्षे तसेच लोंबकळलेले—असे चित्र त्यातून पुढे आले. यातही पुन्हा आदिवासी व लहान शेतकरीच अधिक कचाट्यात सापडलेला.





परिषद घेऊन ह्या प्रश्नाला वाचा फोडण्यात आली. मात्र पुढे आवश्यक पाठपुरावा न झाल्याने हा प्रश्न तसाच रेंगाळत राहिला याची चुटपुटही तिला आहे.

परित्यक्तांसंबंधातील पाहणीतून तालुक्यात अशा स्त्रियांची संख्या मोठी असल्याचे समोर आल्यानंतर पूर्णिमा अन् तिचे सहकारी अचंबित झाले. स्त्रियांवरील अन्याय-अत्याचाराचे अनेक पदर यामधून उलगडत गेले. अशा स्त्रियांसाठी वकील व कार्यकर्त्यांकडून मार्गदर्शन/समुपदेशनाचे काम मग हाती घेतले गेले. पालघर येथे अलीकडेच सुरू झालेल्या 'स्वाधार केंद्रा'ने ह्या धडपडीला आकार प्राप्त करून दिला असे म्हणता येईल.

राष्ट्र सेवा दलाचे संस्कार अंगात भिनलेल्या पूर्णिमाची 'माणूस' हीच एक जात असली, तरीही मच्छिमार कुटुंबात जन्माला आलेली असल्याने मच्छिमार ही जातही तिला चिकटलेली होतीच. शाळेत—विशेषत: माहीम हायस्कूलमध्ये शिकत असताना याचा प्रत्यय तिला पदोपदी यायचा. परंतु 'साधना' साप्ताहिक व अन्य वाचन आणि अभ्यासातील हुशारीच्या जोरावर तिने आपले वेगळेपण इथेही ठसवण्याचे काम केले. परंतु तरीही मच्छिमार समाज, त्यातही मासळी विक्रेत्या महिला हे तिचे कार्यक्षेत्र आपसूकच बनत गेले.

आपल्या गावातील व परिसरातील मच्छिमार गावांतून ह्या महिलांचे जीवन ती जवळून पाहत असली तरीही मच्छिमारांकडे बोटीवर राबणाऱ्या आदिवासी मजुरांच्या (ज्यांना 'खंडे' असे संबोधले जाते) पाहणीतून मच्छिमार महिलांचे हे विश्व अधिक ठळकपणे पूर्णिमाच्या समोर आले. ह्या महिलांचे कोणत्याही सामाजिक-आर्थिक सुरक्षिततेविना दिवस-रात्र राबणे, मासळी विक्रीच्या ठिकाणी किंवा एस. टी./रेल्वेतून मासळी घेऊन प्रवास करताना त्यांचा होणारा छळ असे सारे प्रश्न यात गुंतल्याचे तिने पाहिले. मात्र असे असतानाही, ह्या महिला चळवळीसाठी पुढे येत नाहीत हे वास्तवही तिला स्वस्थ बसू देत नव्हते. मच्छिमार आंदोलनाचे नेते भाई बंदरकर, मोरेश्वर मेस्त्री तिच्याकडे आशेने पाहात होते आणि त्यातूनच अलीकडील वर्षांत ती मच्छिमारांच्या आंदोलनात ओढली गेली.

मासळी-विक्रेत्या महिलांना त्यांचे हक्क मिळवून देण्याबरोबरीने किनारी राज्यातील मत्स्यप्रक्रिया कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या शोषणाविरुद्ध 'नॅशनल फिश वर्कर्स फोरम'च्या माध्यमातून तिचे हे काम सुरू आहे. यासाठी महाराष्ट्राबरोबरीने इतर किनारी राज्यांतही तिची पायपीट चालू आहे. देशपातळीवरील फोरमची 'महिला समन्वयक' म्हणून काम करीत असताना, मच्छिमार महिलांची प्रतिनिधी म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर 'वर्ल्ड फोरम ऑफ फिशर पिपल'शीही (W.F.F.P) ती जोडली गेली असून अलीकडे नैरोबी व तत्पूर्वी फ्रान्स, दिल्ली येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत महिला प्रतिनिधी म्हणून तिने भारतातील मच्छिमार महिलांचे प्रतिनिधित्व केलेले आहे व येथील महिलांच्या प्रश्नांना जागे करण्याचे काम केलेले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना कायदेशीर प्रतिनिधित्व मिळालेले असले तरीही अनेक ठिकाणी हे सारे कागदावरच राहणार की काय असेही वास्तव समोर येत आहे. अशा वेळी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या स्तरांवर प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला पदाधिकारी/सदस्यांनी आपल्या हक्कांसाठी सजग-सबळ बनावे यासाठी डॉ. पी. व्ही. मंडलीक ट्रस्टमार्फत चालवण्यात येणाऱ्या 'पंचायत सखी केंद्रा'त ती सक्रीय असून पालघर येथे हे केंद्र सुरू करण्यात तिने पुढाकार घेतलेला आहे.

महिलांमध्ये अशा प्रकारचे काम करीत असतानाच दुर्बल गटातील ह्या महिलांना आर्थिक निर्भरता यावी या दृष्टीने ९०-९२च्या दरम्यान महिला बचत गट उभे करण्याचे काम तिने आपल्या सहकाऱ्यांसह हाती घेतले. त्याला यशही चांगले मिळाले. ६०-७० बचत गट तयार झाले आणि बचतीची ही रक्कम काही हजारांच्या घरात गेली. यातूनच बचतीचे महत्त्व अधोरेखित झाले अन् सहकार तत्त्वावरील 'श्रमिक महिला पतसंस्था' उभी राहिली.

१९९४मध्ये उभ्या राहिलेल्या ह्या संस्थेने आपले भागभांडवल आज ११ लाख ७२ हजारांवर नेऊन ठेवले आहे. गतवर्षात संस्थेने १ कोटी रुपये इतक्या ठेवी जमा केल्या आणि सुमारे २२ लाख रुपये इतके कर्जवाटप केले, यावरून ह्या पतसंस्थेचा आवाका व अवघ्या ११ वर्षांतील भरारी लक्षात यावी. पूर्णिमाबरोबरीने काम करणाऱ्या साधना चौधरी, प्रमिला तरे, कमल बसवत, कांता मेहेर, चंद्रप्रभा गावड, सुचिता गावड आणि अन्य सहकाऱ्यांच्या प्रयत्नांना महिलांनी प्रतिसाद देऊन ह्या यशोशिखराकडे नेण्याचे काम केले. यांतील काही उदाहरणेच ही यशोगाथा बोलकी करतील.

सातपाटी येथील अहिल्या ठकसेन मेहेर ही पतपेढीची सुरुवातीपासूनची सभासद. तिचे पती पूर्वी बोटीत 'खंड्या' म्हणून कामावर. अहिल्या पालघरहून मासळी घेऊन मुंबईला जाऊन विक्री करते आणि त्यातूनच नियमित बचतही करते. पतपेढीच्या सहाय्याने तिने मुलाचे शिक्षण केले आणि आपले घरही दुरुस्त केले. अर्थात केवळ अर्थसहाय्यापुरतेच तिचे हे नाते मर्यादित राहिलेले नाही. मासळी घेऊन प्रवास करीत असताना पोलीस आणि रेल्वे प्रशासनाकडून होणाऱ्या छळवणुकीविरुद्ध आपल्या सहकारी महिलांना एकत्र करून आवाज उठविण्याबरोबरीने संबंधित प्रशासनापुढे ह्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने अनेक प्रस्ताव समोर ठेवण्याचे कामही तिने केले आहे. नॅशनल फिश वर्कर्स फोरमच्या अधिवेशनात विक्रेत्या महिलांच्या समस्या प्रभावीपणे मांडण्याचे कामही ती करते आणि फोरमच्या लढ्यांमध्येही अग्रभागी असते.

नवापूर येथील अरुणा पागधरे ही अशीच एक मच्छिमार महिला. पतपेढीची सभासद बनून आर्थिक प्रगतीकडे ती सरकते आहे. पण फोरमच्या केरळ येथील परिषदेत, तारापूर औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांच्या प्रदूषणामुळे मच्छिमारांची झालेली वाताहात प्रभावीपणे सर्वांसमोर ठेवताना तिने आपले दुसरे रूपही दाखवून दिले.

याच पतपेढीच्या सहाय्याने पालघर येथील सोफिया इसानी मसाले-लोणची तयार करून विक्रीचा व्यवसाय करते, तर केळवे येथील ताई उंबरसाडा भाजीपाला लागवडीचा व्यवसाय करते. वडराई येथील स्नेहप्रभा पटेल तयार कपडेविक्री तर टेंभोडे येथील सरोज पाटील दूधविक्री, नवापूर येथील जयश्री पागधरे कोंबडीविक्री आणि माहीम येथील शोभा तांडेल जाळी तयार करून विकण्याचा व्यवसाय करून आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने झेप घेताहेत.

पतपेढीच्या माध्यमातून पुढे आलेली ही काही प्रातिनिधिक उदाहरणे. आर्थिक सबलीकरणाबरोबरीने महिलांमध्ये सामाजिक, शैक्षणिक, राजकीय जाण आणण्याचे कामही इथे चालू असते. जागतिक महिला दिन, सावित्रीबाई फुले स्मृती दिन अशा प्रसंगी महिला हक्कांसाठीची जागृती हा त्याचाच एक भाग म्हणता येईल.

पूर्णिमाच्या ह्या साऱ्या कामाची दखल घेऊनच गतवर्षी पुणे येथे 'डॉ. अच्युत आपटे पुरस्कार' देऊन तिचा गौरव करण्यात आला. आणीबाणीपर्वात जे.पीं.च्या चळवळीतून राष्ट्र सेवा दल व नंतर समाजवादी चळवळीशी जोडल्या गेलेल्या पालघर तालुक्यातील कार्यकर्त्यांची ती प्रेरणास्थान राहिली असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

गेल्या तीस वर्षांत ज्यासाठी आपण हा अविरत आटापिटा चालवलाय ती समाजवादी शक्ती क्षीण झाल्याचे ती पाहत्येय. आपल्या गावात-तालुक्यात नव्हे, तर सर्वत्रच या काळात फोफावलेल्या सांप्रदायिक शक्तींनी अनेकदा ती अस्वस्थ व काहीशी निराश झाल्याचे जाणवले तरीही ती डगमगली मात्र कधीच नाही. याउलट ह्या साऱ्या परिस्थितीवर मात कशी करता येईल, याचा विचार व त्याबरोबरीने कृतीत सहभागी होत ह्या अस्वस्थतेवर ती मात करीत आली आहे. तिच्या ह्या कणखर आणि लढाऊ हातांत अनेक हात गुंफले गेले अन् त्यातून बनीबाईसारखे वादळ घोंगावले तर अन्यायाविरुद्ध न्यायाची, असमानतेविरुद्ध समानतेची, विषमतेविरुद्ध समतेची ही लढाई अशक्य निश्चितच नाही.

❑



# नव्या पिढीला 'नई तालीम' देणारी

# सुषमा शर्मा

■ शुभदा देशमुख

सुषमा... एका कर्मयोग्याच्या भूमीतून - अनेक कर्मयोगी जिथे राहिले, राहत आहेत अशी - प्रवास केलेली कार्यकर्ती.

सुषमा वरोड्याची. तिचे वडील श्रीधरराव पद्मावार व आई कमलाताई यांनी त्यांच्या चोखाळलेल्या वेगळ्या वाटेमुळे वेगळे संस्कार असणारच!

बाबा आमटे यांच्या 'भारत जोडो अभियाना'त सुषमा सामील झाली. इथेच तिची ओळख अतुल शर्मासोबत झाली व कौटुंबिक वाटचालीची सुरुवात झाली. वर्ध्यात आल्यानंतर 'चेतना विकास संस्थे'त पद्मजाराणी बंग यांच्यासोबत बालशिक्षणाच्या कामात ती जोडली गेली. स्वत:ची वाट नेमकी समजणे जरा कठीण असते. पण सुषमाला ती सापडली. आणि त्या वाटेने निष्ठेने, शिस्तीने, संवेदनशीलतेने तिने प्रयत्न केले.

चेतना विकासच्या बालवाड्या हा गावातील 'आरंभबिंदू' एवढेच केवळ नव्हते तर बालशिक्षणाचे विविध प्रयोग व गाव उभारणीत लहान मुलांपासून सुरुवात हाही दृष्टिकोन होता. 'बालभवन' ही एक योजना असली तरी ती पद्मजाराणी व सुषमाच्या चिंतन मननामुळे केवळ योजना अंमलबजावणी एवढी मर्यादित न राहता मुलांना फुलवणारा एक कार्यक्रम व गावात बालविकासाचा दृष्टिकोन विकसित करणारे केंद्र झाले. पद्मजाराणींनंतर गावाच्या प्रश्नांशी जोडणारे चुलीविषयक सर्वेक्षणासारखे व इतरही अनेक कार्यक्रम मुलांच्या सुषमाताईने त्यांच्या सोबतीने केले. यातून मुलांना अभ्यासाचा दृष्टिकोन शिकवण्याचा यशस्वी प्रयत्न जसा झाला, तसेच लहान वयात घराच्या, स्त्रियांच्या प्रश्नाबाबत संवेदनशीलता व्यावहारिक मुद्द्यांवरून व आचरणातून रुजवण्याचा आगळा वेगळा प्रयोगही निश्चितपणे साकार झाला.

कामाच्या बाबत 'तपासत जाणे' हे तर कार्यकर्त्यांच्या स्तरावर असतेच, तो प्रकल्पाचा एक भाग म्हणून करावे लागते. सुषमासाठी हा फक्त कामापुरता एक भाग न राहता तो वैयक्तिक व कौटुंबिक प्रवासाचाही भाग झाला. हे अनेक मित्रमैत्रिणींनी आवर्जून सांगितले. Loud Thinking हे बरेचदा कठीण जाते, पण ते खूपदा तिने बैठकांमध्ये मांडलेल्या चिंतनात जाणवते.





बालवाड्या, बालभवनांच्या अनुभवांतून समृद्ध होत सुषमाचा प्रवास आज 'नई तालीम'च्या पुनरुज्जीवन प्रयोगाकडे चालला आहे. किंबहुना हे बीज कामाच्या सुरुवातीला स्वयंशिक्षणाच्या जागरूकतेमुळे रुजले, असेही म्हणता येईल. काम करीत असताना प्रकल्पासोबतच विचार व चिंतन, मनन ह्या पद्धतीमुळे जीवनशिक्षणाचा दृष्टिकोन अधिक रुजला. वेगळ्या प्रकारच्या शाळा या सर्व समाजाला सामावून घेणाऱ्या कशा असतील, हाही विचार सुषमाच्या संवेदनशील पण वास्तववादी दृष्टीने केला आहे. सर्वांच्या सोबतीने असणे, पण स्वत:चे मत ठामपणे मांडणे, हे सुषमाचे वैशिष्ट्य. 'नई तालीम'च्या शिक्षण प्रयोगांची सुरुवात करताना महाराष्ट्रातल्या व बाहेरच्याही या क्षेत्रातील विचारवंत, कार्यकर्ते, अभ्यासक सर्वांचेच अनुभव, विचार समजून घेऊन, तिने त्याची नेटकी मांडणी करत, आजच्या परिस्थितीत उपयोगी पडणारा 'नई तालीम'चा विचार स्पष्टपणे व नेटकेपणाने मांडला आहे.

तार्किक व प्रकल्प पद्धतीने शास्त्रोक्त मांडणी जशी सुषमा करू शकते, तसेच रस्त्याने जाता जाता वस्तीशी जोडलेल्या नात्यांच्या व उमललेल्या एकत्रित प्रयोगांच्या तरल नोंदीही तेवढ्याच सहजपणे येतात. एवढेच नव्हे तर त्यातून व्यापक प्रश्नांकडे झेपावण्याचीही ताकद तिच्यात आहे.

कार्यकर्त्याने व्यापक व सखोल दोन्हींचा समतोलाने विचार करण्याची गरज असते. ही गोष्ट सुषमाच्या कामात व व्यक्तिमत्त्वात विकसित होत गेलेली आढळते. जास्तीतजास्त क्षेत्रापर्यंत प्रश्नाचा विचार पोहचण्याच्या दृष्टीने बालहक्क अभियानाशी जोडून घेण्याचा विचार त्यामुळे येऊ शकला. त्याचप्रमाणे 'नई तालीम'च्या प्रयोगातून या प्रश्नासाठी तिने सखोलतेने विचार व मांडणी केलेली आहे.

सार्वजनिक जीवनासोबतच वैयक्तिक जीवनात मुलीच्या 'ओशिन'विषयीही हाच विचार सुषमा व अतुल एकत्रितपणे करताना दिसतात. तिची वेगळी मते जपताना, स्वाभाविकरित्या काही वेळा जड जात असले तरी, ती तपासत कृतीत आणण्याचा प्रयत्न कुटुंबात होतो आहे. वेगळेपणामुळे असणारे विचार एकत्रित जोडण्याचं कौशल्यही कुटुंबात आहे.

'नई तालीम'द्वारा जगाला नवा विचार वर्ध्यातून मिळाला आहे. या प्रयोगातूनही पुन्हा एकदा, नवा प्रकाश पुढे येण्याची आशा आहे, कारण आजही नव्या जागतिक आव्हानात शिक्षण क्षेत्रातूनही बदलाची अपेक्षा आहे.

❑



# मानपत्र

## प्रिय श्री. सुरेश खोपडे

महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, महर्षी शिंदे, कर्मवीर आण्णासाहेब पाटील, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा यांनी सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत महाराष्ट्रातल्या ज्या शेतकरी, शेतमजूर, दलित बहुजन समाजाला उतरवले, त्या परंपरेचे आपण एक जाणते, कर्तव्यदक्ष पाईक आहात.

पुणे जिल्ह्यातल्या बारामती तालुक्यातील ढोलेमळ्यातल्या कुडाच्या शाळेत मुळाक्षरे गिरविल्यानंतर, ज्ञान लालसेने आपण शेतकी पदवीपर्यंत पोहोचलात! 'शिकायचं काम वाण्या-बामणांच्या पोरांचं' अशी ठाम समजूत असलेल्या समाजात जन्मलेल्या आणि वाढलेल्या आपण पुढे महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशन परीक्षेत संपूर्ण महाराष्ट्रात दुसऱ्या नंबरात येऊन ढोलेमळ्यात इतिहास घडवला.

सुस्थापित शहरी मध्यमवर्गीयांची मुलं उच्च शिक्षणासाठी परदेशी राहून नंतर तिथेच स्थायिक होण्याच्या काळात आपण डी.वाय.एस.पी म्हणून पोलीस दलात भरती होता, तेव्हा ती केवळ एक सरकारी नोकरी राहात नाही, तर हजारो हुतात्म्यांनी आपल्या बलिदानाने स्वतंत्र केलेल्या या देशाची सेवा करण्याचे अभिवचन या स्वातंत्र्याचे वारसदार म्हणून आपण दिलेले असते.

आपल्यावर झालेल्या विविध सामाजिक चळवळीचे संस्कार आपल्या पोलीस दलातील नोकरीतही वारंवार दिसलेत. या संस्कारातूनच गरीब आदिवासींना लुटणाऱ्या दरोडेखोरांना आपण स्वत:च्या बंदुकीने कायमचा धडा शिकवता. कर्तव्यदक्षपणाच्या आड येणाऱ्या सर्व दबाव, प्रलोभनांना दूर ठेवू शकता आणि संवेदनशील परिस्थिती कमालीच्या संयमाने नियंत्रणात ठेवू शकता.

महाराष्ट्राचे पोलीस दल विविध वादांच्या भोवऱ्यात सापडले असताना आपल्यासारखे अधिकारी ज्या निस्पृहपणे आपले काम करताहेत, ते पाहता अंधाऱ्या बोगद्याच्या टोकाशी प्रकाशाची प्रखर तिरीप अस्तित्वात आहे असेच म्हणावे लागेल.

गुन्हेगाराला केवळ पोलिसी खाक्या न दाखवता त्याच्यातील माणूसपण जागवण्यासाठी सेवेपलीकडचे कष्ट घेण्याची तयारी आपण दाखवता. यातूनच जातीय, धार्मिक दंगलीवरचा आपला अभ्यास, चिंतन आणि प्रत्यक्ष कार्यक्रम हा एखाद्या समाजशास्त्रज्ञाच्या प्रबंधाइतकाच महत्त्वाचा ठरतो.

अशा अभ्यासातून तयार झालेल्या मोहल्ला कमिटी या केवळ देशातच नव्हे तर परदेशातही विविध व्यासपिठावर औत्सुक्याचा, कौतुकाचा आणि आचरणाचा विषय ठरल्या आहेत. भिवंडी प्रयोग, कम्युनिटी पोलिसिंग व खोपडे पॅटर्न यावर आपले विचार ऐकण्यासाठी देश-विदेशातील विद्यापीठे, सामाजिक संस्था यांनी आपल्याला सन्मानाने निमंत्रित केले आहे.

आपल्या अनुभवांना योग्य शब्दांत मांडण्याचे साहित्यिक कसबही आपल्याला उत्तम प्रकारे अवगत आहे. त्यातूनच आपण केलेली ग्रंथनिर्मिती वाचन जगतात केवळ चर्चिली गेली नाही तर तिला विविध पुरस्कारही मिळाले आणि जगभरातल्या ग्रंथालयातही तिला स्थान मिळाले.

एका बाजूला 'अमेरिकन लायब्ररी ऑफ काँग्रेस वॉशिंग्टन'तर्फे रिसर्च ऑथर म्हणून बहुमान मिळवतानाच, आपल्या कल्पनेतून साकारलेल्या मोहल्ला कमिटीचा भारतीय राज्यघटनेत समावेश केला जातो तेव्हा साने गुरुजींच्या स्वप्नातली धडपडणारी मुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या इन सर्च ऑफ एक्सलन्स व गांधींच्या तळातल्या शेवटच्या माणसापर्यंत स्वातंत्र्य पोहचविण्याच्या प्रयत्नांना यश येतेय याची खात्री पटते.

राष्ट्रपती शौर्य पदक, राष्ट्रपती पोलीस पदक आणि पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह मिळवून आणि संपूर्ण पोलीस दलासच नवी दिशा देऊन, समाजातील जातीयवाद, अंधश्रद्धा, दारिद्र्य, मागासलेपण घालवून सामान्य माणसाच्या जीवनाची प्रत सुधारण्यासाठी आपण जे शास्त्रीय प्रयोग केले, त्या कार्याची दखल घेऊन साभिमानाने केशव गोरे स्मारक ट्रस्ट आपल्याला हे मानपत्र अर्पण करीत आहे.

मृणाल गोरे

मृणाल गोरे
विश्वस्त

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार

१९९६

समाजप्रबोधन (संस्था) : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा

समाजप्रबोधन (व्यक्ती) : विलास वाघ, पुणे

पर्यावरण-संवर्धन (व्यक्ती) : वासुदेवराव चित्रे, पालघर

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : विजया चौक, धुळे

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : रा. वि. भुस्कुटे, अंबरनाथ

१९९७

स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत, पुणे

समाजप्रबोधन (संस्था) : लोक विज्ञान संघटना, पुणे

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : शुभदा देशमुख, गडचिरोली

पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) : विजय नारकर, देवरूख

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : लीला पाटील, कोल्हापूर

१९९८

पर्यावरण-संतुलन / संरक्षण (संस्था) : निसर्ग मित्र मंडळ, औरंगाबाद

समाजप्रबोधन (व्यक्ती) : जयंत गडकरी, मुंबई

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : बापूसाहेब नागाप्पा म्हेत्री, गडहिंग्लज

पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) : हुमायून अब्दुलअली, मुंबई

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : सुरेखा दळवी, पेण

१९९९

प्रबोधन (संस्था) : समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी

समाजप्रबोधन (व्यक्ती) : मोहन हिराबाई हिरालाल, चंद्रपूर

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : रेहाना बैलिम, अमरावती

पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) : कुसुम कर्णिक, पुणे

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : भरत कावळे, नाशिक

२०००

स्त्रियांचे प्रश्न (संस्था) : महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक

समाजप्रबोधन (व्यक्ती) : मनोहर कदम, मुंबई

पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) : चिं. धों. आसवले, पुणे

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : संजय संगवई, पुणे

२००१

पर्यावरण-संतुलन / संरक्षण (संस्था) : ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स, कर्जत

समाजप्रबोधन (व्यक्ती) : मु. ब. शहा, धुळे

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : कुमुद पावडे, नागपूर

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : काळुराम दोधडे, पालघर

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : प्रभाकर म्हसकर, अंमळनेर

२००२

समाजप्रबोधन (संस्था) : डॉ. पी. व्ही. मंडलीक ट्रस्ट, मुंबई

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : भुरीबाई मानसिंग शेमळे, नंदुरबार

वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) : रजिया सुलताना, अमरावती

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : दत्ता इस्वलकर, मुंबई

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : डॉ. विवेक माँटेरो, मुंबई

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : डॉ. राम पुनियानी, मुंबई

२००३

समाजप्रबोधन (संस्था) : कोयना जीवन हक्क संरक्षण संघटना, कोरेगाव, सातारा

स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : रज़िया पटेल, पुणे

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : शेख वजीर पटेल, अमरावती

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : सुरेश शिपूरकर, कोल्हापूर

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : आनंद पटवर्धन, मुंबई

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : उल्का महाजन, रोहा, रायगड

२००४

समाजप्रबोधन (संस्था) :

समाज विज्ञान अकादमी, पुणे

मासूम, पुणे

समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :

तिस्ता सेटलवाड, मुंबई

रमेश हरळकर, मुंबई

पोपटराव पवार, अहमदनगर

डॉ. मोहन देशपांडे, पुणे

विलास भोंगाडे, नागपूर

## महाराष्ट्र फाउण्डेशन समाज गौरव पुरस्कार मानकरी १९९६-२००४

## संस्था



**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा / १९९६**

अंधश्रद्धेच्या जोखडातून समाजाला बाहेर काढून विवेकवादाची कास धरणाऱ्या ज्या मोजक्या संस्था आहेत, त्यातली ही आघाडीची संस्था. शोषण, फसवणूक, दिशाभूल करणाऱ्या अंधश्रद्धांशी संघर्ष करणं, शिबिरं, व्याख्यानं याद्वारे वैज्ञानिक दृष्टिकोन पसरवणं ही समितीची मुख्य कार्य आहेत. बुवाबाजी, चमत्कार, भूत, भानामती यांना समितीने नेहमीच आव्हान दिलंय. संस्थेच्या प्रयत्नाने नुकतंच महाराष्ट्रात जादूटोणा आणि बुवाबाजीविरोधी विधेयक पास झालंय.



**कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत, पुणे / १९९७**

सार्वजनिक उकिरडा हीच कर्मभूमी असलेल्या उपेक्षितांची ही संघटना. कचरा वेचणाऱ्या स्त्रियांना संघटित करून त्यांची पोलिसी छळापासून आणि भंगार व्यापाऱ्यांच्या जाचातून सुटका करण्याचं काम पंचायतीने केलं. या स्त्रियांना सक्षम करण्यासाठी आता संघटनेने सहकारी पतसंस्था तसंच औद्योगिक सहकारी संस्था सुरू केली आहे. कचरा वेचणाऱ्या मुलांच्या शिक्षणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न संस्था करते आहे.



**लोक विज्ञान संघटना, पुणे / १९९७**

आजच्या विज्ञान युगात सहज, सोप्या पद्धतीने विज्ञान लोकांपर्यंत पोहोचावं, यासाठी लोक विज्ञान संघटना प्रयत्न करतेय. शास्त्रीय दृष्टीचा प्रसार करणं, विज्ञान लोकाभिमुख करणं, अंधश्रद्धांना कसून विरोध करणं आणि उचित तंत्रज्ञानाचा आग्रह धरणं ही संघटनेची चतु:सूत्री आहे. तिला धरूनच शिबिरं, चर्चा, परिसंवाद, अभ्यास, सहली असे अनेक उपक्रम संघटना राबवत असते.



**निसर्ग मित्र मंडळ, औरंगाबाद / १९९८**

पक्षी निरीक्षण आणि पक्ष्यांचं महत्त्व लोकांना समजावून सांगणं इथपासून सुरू झालेली ही संस्था आज निसर्गाशी संबंधित वेगवेगळे अभ्यासप्रकल्प आणि शालेय पातळीवरचं निसर्ग शिक्षण इथवर येऊन ठेपली आहे. एवढंच नाही, औरंगाबादमधला दिल्ली गेट तलाव वाचवण्यासाठी तिने दीर्घकाळ दिलेला लढा आणि त्यात मिळविलेला विजय हा संस्थेच्या वाटचालीतला मैलाचा दगड आहे.



**समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी / १९९९**
'शास्त्रीय समाजवादाचे खुले ज्ञानपीठ' म्हणून ओळखली जाणारी ही संस्था देशातील लोकांची मनं आणि चरित्र घडवण्याचे प्रयत्न अथकपणे करत आहे. समाजापुढे असणाऱ्या वेगवेगळ्या प्रश्नांबद्दल लोकांना योग्य व अचूक माहिती मिळावी यासाठी अनेक भाषणं, परिसंवाद, चर्चासत्रं, कार्यशाळा प्रबोधिनी आयोजित करते. बारा हजार पुस्तकं असणारं प्रबोधन ग्रंथालय आहेच. त्याबरोबर संस्थेने अनेक सकस वैचारिक शिदोरी देणारी पुस्तकंही प्रसिद्ध केली आहेत.



**महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक / २०००**
उध्वस्त कुटुंबं सावरणारी, त्याचबरोबर महिलांना त्यांच्या न्याय्य हक्कांबद्दल जागरुक करणारी ही संस्था स्त्रियांचा सामाजिक दर्जा वाढविण्यासाठी झटत आहे. कौटुंबिक सल्ला केंद्र, स्त्रियांसाठी शिबिरं, जागृती यात्रा, सभा, सेमिनार, चर्चासत्रं इत्यादी विविध माध्यमांतून संस्था काम करते. रोजगार, अल्पबचत गट यातून आर्थिक दृष्ट्या स्त्रियांना स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. तलाकपीडित मुस्लिम महिलांसाठी समिती विशेष कार्य करते.







**ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स, कर्जत / २००१**
अध्ययन आणि संशोधन कार्यावर आधारलेली ही संस्था आदिवासी भागात काम करते. वनौषधींवर संशोधन, त्यांचं संवर्धन, प्रचार आणि प्रसार हे मुख्य कार्य. यावर आधारित दवाखानाही संस्था चालवते. तसेच वनौषधींचे प्रशिक्षण वर्गही आयोजित करते. बांबू, वेत यापासून सुंदर वस्तू तयार करणं, रानमेव्यापासून सरबतं, मुरंबे लोणची तयार करणं आणि हे सर्व विकणं यातून आदिवासींना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. भाताच्या जातींचं रक्षण करण्याचाही संस्थेचा प्रयत्न आहे.



**डॉ. पी. व्ही. मंडलीक ट्रस्ट, मुंबई / २००२**
पंचायतराज व्यवस्थेतील प्रशिक्षण आणि प्रबोधनाचं काम करणारी ही संस्था विशेषतः पंचायतीत, एकूणच स्थानिक स्वराज्य संस्थांत नव्याने आलेल्या महिलांना प्रशिक्षण देते. सहभागी प्रशिक्षण पद्धतीचा अवलंब करत सरकारी ठराव, नियम, परिपत्रकं यासारखे किचकट, रूक्ष विषयही सहज समजतील अशा पद्धतीने या प्रशिक्षणांतून मांडले जातात. अनुभवकथन, एकमेकींच्या अडचणी-यश-अपयश यांच्या देवाणघेवाणीतून आता महिलांना आपल्या अस्मितेची जाणीव होऊ लागली आहे.



**कोयना जीवन हक्क संरक्षण संघटना, कोरेगाव, सातारा / २००३**
कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या लोकांना त्यांचे नाकारले गेलेले मूलभूत हक्क पुन्हा मिळवून देण्यासाठी कंबर कसलेली ही संघटना. परिसरातील जंगल, जमीन, पाणी व सर्वच नैसर्गिक साधन स्रोतांवर जगण्याच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी प्रथम स्थानिक जनतेचाच अधिकार आहे, अशा धारणेतून संघटनेचं काम सुरू आहे. संघर्षाचं काम करत असताना नैसर्गिक शेती, स्त्रियांसाठी रोजगार अशी प्रयोगशील आणि रचनात्मक कामंही संस्थेने उभारली.



**समाज विज्ञान अकादमी, पुणे / २००४**
वैचारिक संभ्रमावस्था असताना वास्तवाला भिडणारं, पण शास्त्रीय पायावर समग्र दृष्टिकोनातून तात्त्विक मंथन घडवून आणणं या उद्देशाने काही नामवंत समाजधुरीणांनी एकत्र येऊन ही संस्था स्थापन केली आणि याच दिशेने तिची वाटचाल सुरू आहे. विचारवंत आणि तळागाळात काम करणारे कार्यकर्ते यांना एकत्र आणणारे परिसंवाद, चर्चासत्रं अकादमी आयोजित करते. वेगवेगळ्या विषयांवरची पुस्तकं आणि पुस्तिका प्रकाशित करते.






**मासूम, पुणे / २००४**
जेमतेम अक्षर ओळख असलेल्या स्त्रियांना थेट डॉक्टर करणं हे 'मासूम'च्या मनिषा गुप्ते आणि रमेश अवस्थी यांनी साध्य केलंय. आरोग्यशिक्षणाच्या क्षेत्रात या संस्थेचं फार मोठं काम आहे. आपलं शरीर समजून घेणं, त्याचे आजार, त्यावरची झाडपाल्याची औषधं यांची माहिती मिळवणं, स्वत:चं आरोग्य स्वत:च राखायला शिकणं हे सहभागी पद्धतीच्या शिबिरांतून घेऊन 'मासूम' स्त्रियांमध्ये आरोग्याविषयीचा आत्मविश्वास जागवते.

## महाराष्ट्र फाउण्डेशन समाज गौरव पुरस्कार मानकरी १९९६-२००४

## व्यक्ती : समाज प्रबोधन



**विलास वाघ, पुणे / १९९६**
'सुगावा प्रकाशन'चं पुस्तक म्हटलं की ते आपल्या संग्रही असायलाच हवं ही खूणगाठ कार्यकर्त्यांच्या, पुरोगामी चळवळींशी जोडलेल्या मंडळींच्या मनात नकळत जडवली जाते. सातत्याने पुरोगामी वाङ्मय प्रकाशित करून विलास वाघ यांनी आपल्या 'सुगावा प्रकाशना'ची स्वतंत्र ओळख तयार केलीय. पण ते फक्त प्रकाशक नाहीत, भटक्या-विमुक्तांच्या, वेश्यांच्या मुलांसाठी ते शाळाही चालवतात.



**डॉ. मु. ब. शहा, धुळे / २००१**
लहानपणापासून समाजवादी विचारांच्या संस्कारात वाढलेल्या मु. ब. शहा यांनी साने गुरुजी आणि राममनोहर लोहिया यांच्या विचारसरणीला अनुसरून साहित्यनिर्मिती केली. अमृता प्रितम यांच्या 'रसिदी टिकट'पासून अनेक उत्तमोत्तम पुस्तकांचे अनुवाद केले. माणूस घडवण्याच्या ध्यासाने पछाडलेल्या या हिंदीच्या प्राध्यापकाने श्रमसंस्कार शिबिरं घेऊन श्रमाचं महत्त्व तरुण पिढीच्या मनावर ठसवलं.



**जयंत गडकरी, मुंबई / १९९८**
जयंत गडकरींच्या कार्याचं एका शब्दात वर्णन करायचं झालं तर ते 'विचारप्रबोधन' या शब्दाने करावं लागेल. गडकरींनी जमातवाद आणि फॅसिस्ट प्रवृत्ती यांच्या विरोधात विपुल लेखन केलंय. हे फक्त नैमित्तिक लेखन नाही, त्यांचे अनेक ग्रंथही प्रसिद्ध झालेयत. संघ परिवाराने रोवलेल्या एकांगी इतिहासाच्या विरोधात त्यांनी आवाज उठवला. मानवी मूल्यांची जपणूक करणं हे सूत्र त्यांच्या सर्व कामामध्ये आढळतं.



**मोहन हिराबाई हिरालाल, चंद्रपूर / १९९९**
वन आणि बांधकाम कामगारांचं संघटन करून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठवण्याचं काम मोहन हिराबाई हिरालाल यांनी केलं. अजूनही ते चालू आहे. या कामगारांना त्यांनी प्रशिक्षण दिलं. जंगलाचा त्यांनी केलेला अभ्यास महत्त्वाचा आहे. जंगल आणि तिथले लोक यांचं साहचर्य लक्षात घेऊन आदिवासींना जीवनावश्यक वस्तू जंगलातून घेण्याचा हक्क आहे आणि तो त्यांना मिळाला पाहिजे, यासाठी त्यांनी आंदोलन उभारलं आहे.



**मनोहर कदम, मुंबई / २०००**
नामांतरापासून गिरणी कामगारांच्या लढ्यापर्यंत आणि मुंबईच्या इतिहासापासून तिच्या सामाजिक पोतापर्यंत अनेक विषयांचा सखोल अभ्यास करून मनोहर कदम यांनी त्यावर व्यासंगपूर्ण लेखन केलं. आद्य कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांचं चरित्र, 'मुंबईच्या उभारणीत तेलुगू समाजाचं योगदान' ही त्यांची पुस्तकं गाजली. मुंबईच्या वेश्यावस्तीत मनोहर कदम पत्नी प्रतिमा जोशी यांच्यासह वेश्यांच्या मुलांच्या पुनर्वसनाचं काम करत होते.

## महाराष्ट्र फाउंडेशन समाज गौरव पुरस्कार मानकरी १९९६-२००४

## पर्यावरण संवर्धन



**वासुदेवराव चित्रे,**
**ठाणे / १९९६**

ठाणे जिल्ह्यातल्या आदिवासी पट्ट्यात 'निरिड' या संस्थेतर्फे सामाजिक वनीकरण करून वासुदेवराव चित्रे यांनी या भागाचा कायापालट करून टाकला. पर्यावरण संवर्धनासाठी विविध योजना राबवून आदिवासींचं जीवन सुखकर कसं होईल हे त्यांनी पाहिलंच, शिवाय जंगलातून आदिवासींना उत्पन्न कसं मिळेल याचा विचार केला आणि त्या दृष्टीने अनेक प्रकल्प राबवले.



**चिं. धों. आसवले,**
**पुणे / २०००**

भीमाशंकर परिसरातल्या 'म्हातारबाची वाडी' या गावचे एक वारकरी, चिं. धों. आसवले ऊर्फ आसवले मामा. भीमाशंकरला जाणाऱ्या गिर्यारोहकांना मदत करताकरता, अनवट वाटा दाखवतादाखवता, डाळ-तांदूळ शिजवून त्यांना प्रेमाने खाऊ घालताघालताच मामांनी पर्यावरण जागृती केली. जंगल वाचवणं कसं गरजेचं आहे हे गावकऱ्यांनाही पटवलं आणि सरकारशीही या मुद्द्यावर ते झगडले.



**विजय नारकर,**
**देवरुख / १९९७**

'मातृमंदिर' या संस्थेची जबाबदारी घेऊन विजय नारकर यांनी या भागात पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण विकास यांची अचूक सांगड घातली. पाणलोट क्षेत्राचा विकास केला, वनीकरण केलं. भरपूर पाणी आणि त्यामुळे आलेली हिरवाई यामुळे या भागाचं रूपच पालटलं. शेतकऱ्याचं उत्पन्न वाढून तो आत्मनिर्भर व्हावा यासाठी शेतीच्या नव्या तंत्राचा अवलंब करण्यासाठी नारकरांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिलं.



**हुमायून अब्दुलअली,**
**मुंबई / १९९८**

पर्यावरण, निसर्ग याविषयीचं काम म्हणजे वनीकरण, झाडं लावणं / वाचवणं एवढंच नाही. निसर्गाचा अभ्यास करणंही महत्त्वाचं आहे. तरच त्याच्या हाका आपल्याला ऐकू येतात. हुमायून अब्दुलअली यांची वाटचाल एक शिकारी ते निसर्ग अभ्यासक अशी झाली, त्यामागे निसर्गाची जादू हे एक कारण आहेच. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे प्रमुख आधारस्तंभ, वन संरक्षक कायद्याचे आद्य शिल्पकार म्हणून ते सुपरिचित आहेत.



**कुसुम कर्णिक,**
**मंचर / १९९९**

जंगल वाचविण्यासाठी हाक देणारी, त्यासाठी 'चिपको'सारख्या मार्गाचा अवलंब करणारी कुसुम कर्णिक यांची 'शाश्वत' ही संस्था. जंगलाचा अभ्यास करणंही आवश्यक आहे हे कुसुम कर्णिक यांनी ओळखलं आणि अभ्यासाला सुरुवात केली. जंगल हे जंगलातच राहणाऱ्या आदिवासींचं संचित आहे. त्यांचं आयुष्य फुलतं, फळतं ते जंगलाच्याच कुशीत. कुसुम कर्णिक यांच्या जंगलाच्या अभ्यासामागे हे सूत्र आहे.

## महाराष्ट्र फाउंडेशन समाज गौरव पुरस्कार मानकरी १९९६-२००४



**विजया चौक,**
**धुळे / १९९६**

पंचवीस वर्षांपूर्वी हुंडाविरोधी चळवळ तीव्र झाल्यावर उघडउघड हुंडा घेणं कमी झालं, पण काही समाज आपल्या जुन्या रूढी-परंपरांना चिकटून राहिले. लेवा-पाटील समाज हा त्यातलाच एक. स्वत:ला अस्सल खानदानी समजणाऱ्या या समाजात स्त्रीला किंमतच नव्हती. म्हणूनच हुंडा, परित्यक्ता हे प्रश्न भेडसावत होते. विजया चौक यांनी याच प्रश्नांना हात घातला. प्रतिकूल परिस्थितीतही नेटाने लढवून केसेस तडीला नेल्या.



**शुभदा देशमुख,**
**गडचिरोली / १९९७**

गडचिरोलीसारख्या मागासलेल्या, जंगलाच्या कुशीत वसलेल्या, आदिवासी बहुल क्षेत्रात काम करण्याचं आव्हान शुभदा देशमुख यांनी लीलया पेललं. स्वत:च्या पायावर उभं राहाणं, स्वत:चे प्रश्न स्वत: सोडवणं या मार्गांनी आदिवासी स्त्रियांना आत्मभान देण्याचं कार्य त्यांनी केलंच, शिवाय रोजगार मिळविण्यासाठी आदिवासी स्त्रियांना सक्षम केलं.



**बापूसाहेब नागप्पा म्हेत्री,**
**गडहिंग्लज / १९९८**

सौंदत्तीला दरवर्षी देवीला सोडल्या जाणाऱ्या मुली... त्यांच्या जटा... आयुष्यभर त्यांनी देवदासी म्हणून राहणं... या घातक देवदासी प्रथेचं उच्चाटन आणि देवदासींचं पुनर्वसन करण्यासाठी बापूसाहेब म्हेत्री यांनी अथक प्रयत्न केले. थेट सौंदत्तीच्या डोंगरावर जाऊन. देवदासी प्रथा निर्मूलनाच्या आंदोलनांत जसे ते सहभागी झाले, तसंच रचनात्मक कामही त्यांनी उभं केलं. राजकीय कार्यात देवदासींच्या प्रश्नांना प्राध्यान्य दिलं.



**रेहाना बैलिम,**
**अमरावती / १९९९**

वयाच्या पंधराव्या वर्षी लग्न आणि नंतर एकतर्फी तलाक मिळाल्यानंतर हादरलेल्या रेहाना बैलिम यांनी परित्यक्ता आणि तलाकपीडित महिला यांच्यासाठी काम करण्याचा निश्चय केला. या महिलांना स्वत:च्या पायावर उभं राहण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण देणं, त्यांच्यासाठी कौटुंबिक सल्ला केंद्र चालवणं असे उपक्रम हाती घेतले. त्यांचा व्याप आता बराच वाढला आहे. रेहाना आता वेश्यांचा मुलांसाठीही केंद्र चालवतात.



**कुमुद पावडे,**
**नागपूर / २००१**

स्त्रियांसाठी, त्यातही दलित स्त्रियांसाठी काम करणाऱ्या कुमुद पावडे यांनी विचारांना कृतीची जोड देणं कायमच महत्त्वाचं मानलं. दलित स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात त्यांना बोलतं केलं. शिक्षणाने त्यांच्यात आत्मविश्वास जागवला. समाजाच्या उच्च वर्गातही याविषयी व्याख्यानं दिली. त्यात कायम दलितोध्दाराला पोषक अशी भूमिका घेतली. सरकारी संस्थांमार्फत विकासाला चालना देण्याचं अत्यंत महत्त्वाचं काम त्यांनी केलं.



**भुरीबाई शेमळे,**
**नंदुरबार / २००२**

एक निरक्षर, आदिवासी स्त्री गावची सरपंच बनणं ही भारतासारख्या देशात छोटी घटना निश्चितच नाही. भुरीबाई शेमळे या आदिवासी भिल्ल स्त्रीने हे साध्य करून दाखवलं. निर्भय, लढाऊ भुरीबाईंनी आदिवासी महिलांचं संघटन केलं. दारूबंदी केली. भोंदूगिरीला आळा घातला. तमाम शोषितपीडितांच्या व्यापक मुक्ती आंदोलनाची पायाभरणी करून त्यांनी अनेक कार्यकर्त्यांना लढण्याची प्रेरणा दिली.






**रजिया पटेल,**
**पुणे / २००३**

लहानपणापासून बंडखोर असलेल्या रजिया पटेल यांनी मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न सोडवणं ते व्यापक प्रश्नांना भिडणं असा आपल्या कार्याचा प्रवास केला. मुस्लिम स्त्रियांना साथीला घेऊन त्यांनी केलेलं सिनेमाबंदी आंदोलन गाजलं. त्यानंतर तलाकपीडित स्त्रिया, त्यांना मिळणारी पोटगी, हिंदू-मुस्लिम तणाव, त्यांचे स्त्रियांवर होणारे परिणाम या विषयांवर त्यांनी फक्त कामच नाही, तर संशोधन आणि लेखनही केलं.

## महाराष्ट्र फाउंडेशन समाज गौरव पुरस्कार मानकरी १९९६-२००४

## वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य



**रा. वि. भुस्कुटे, अंबरनाथ / १९९६**

भुस्कुटेभाऊ म्हणून प्रसिद्ध असलेले रा. वि भुस्कुटे तहसीलदार होते. अनेक वर्ष त्यांनी सरकारी नोकरी केली. जमिनीविषयीचे सर्व कायदे-कानून ठाऊक असलेल्या भुस्कुटेंनी आपल्या या ज्ञानाचा उपयोग भटके-विमुक्त आणि आदिवासींच्या जमिनींचे प्रश्न सोडवण्यासाठी केला. अनेक ठिकाणी लिखाण करून . त्यांनी प्रबोधन केलं. फक्त कायद्याच्या अंगानेच नाही, तर विविध आंदोलनांतही ते सहभागी झाले.



**लीला पाटील, कोल्हापूर / १९९७**

एकविसाव्या शतकातील नागरिक खरोखर अंतर्बाह्य समृध्द व्हावा असं वाटत असेल तर आजच्या बालकाला फुलविलं पाहिजे; त्याच्या सृजनशीलतेला खतपाणी घातलं पाहिजे, या ध्यासाने लीला पाटील यांनी 'सृजन आनंद शिक्षण केंद्रा'तर्फे आनंददायी शिक्षणाचे अनेक अभिनव प्रयोग केले, अजूनही करत आहेत. शिक्षणाची गुणात्मक वाढ होण्यासाठी शिक्षण चार भिंतींतून बाहेर काढलं पाहिजे असं त्यांचं ठाम मत आहे आणि त्या दृष्टीने त्या अनेक प्रयत्न करत असतात. शिक्षण क्षेत्रावर त्यांनी संशोधन आणि लेखनही केलं आहे.



**सुरेखा दळवी, पेण / १९९८**

मुंबईलगतच्या रायगड जिल्ह्यातील आदिवासी मुंबईच्या समृध्दीपासून कसा कोसों दूर आहे हे ओळखून त्याचं आयुष्य सुकर करण्यासाठी सुरेखा दळवी झटल्या, झटतायत. 'श्रमिक क्रांती संघटने'द्वारे त्यांनी आदिवासींचं शिक्षण, आरोग्य हे प्रश्न हाती घेतले. लग्नगड्यांची प्रथा नष्ट व्हावी यासाठी सामुदायिक विवाहांचे सोहळे केले. वीटभट्ट्या, कोळसाभट्ट्या इथल्या मजुरांची संघटना बांधली.



**भरत कावळे, ओझर / १९९९**

ओझर आपल्याला ठाऊक आहे ते मिग विमानं बनवण्याचा कारखाना तिथे आहे म्हणून. या कारखान्यासाठी ज्यांनी आपल्या जमिनी दिल्या, त्यांच्या रखडलेल्या पुनर्वसनाचं काम भरत कावळे यांनी आपल्या 'समाज परिवर्तन केंद्रा'द्वारे मार्गी लावलं. पाणी वाटपात प्रत्यक्ष शेतकऱ्यांचा सहभाग असावा यासाठी त्यांनी सहकारी पाणीवाटप संस्था स्थापन केली. त्याअंतर्गत शेतकऱ्यांना प्रशिक्षणही देण्यात येतं.

## वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य



**संजय संगवई,**
**पुणे / २०००**

पत्रकार म्हणून संजय संगवई यांनी विविध विषयांवर लेखन केलं होतं. राजकारण, समाजकारणापासून शास्त्रीय संगीतापर्यंत. नंतर नर्मदा बचाओ आंदोलनात स्वत:ला पूर्णवेळ झोकून दिल्यावर त्याच्या प्रसिध्दीची संपूर्ण बाजू त्यांनी सांभाळली. चिकाटीने, स्वत:ला पूर्णपणे ओतून घेऊन काम करणं हे संजय संगवई यांचं वैशिष्ट्य. नर्मदा धरणाने निर्माण केलेले प्रश्न अतिशय पोटतिडकीने त्यांनी आपल्या लेखनातून मांडले.



**काळुराम दोधडे,**
**पालघर / २००१**

वर्चस्ववादी व्यवस्थेशी भांडण करत काळुराम दोधडे यांनी कायम लढाऊ राजकारण केलं. आदिवासींचे प्रश्न आदिवासीच जाणून घेऊ शकतो, या भूमिकेतून त्यांनी काम केलं. आदिवासींना आपल्या हक्कांबद्दल जागृत केलं, त्यासाठी ते लढले. 'भूमिसेना' या आदिवासींसाठी काम करणाऱ्या संघटनेद्वारे त्यांनी आदिवासींचा आवाज संपूर्ण समाजापर्यंत आणि सरकारपर्यंतही पोहोचवला.



**रजिया सुलताना,**
**अमरावती / २००२**

मुक्त पत्रकार, कवयित्री आणि लेखिका असलेल्या रजिया सुलताना यांनी आंतरधर्मीय विवाह केला आणि वीस वर्षांत त्यांना पाच वेळा तलाक मिळाला. धाडसी, बंडखोर आणि संवेदनशील रजियाने मग मुस्लिम समाजाची जीवनशैली, आचारविचार, धार्मिकता यांना कडाडून विरोध केला. आलेल्या परिस्थितीला पुरून उरत त्यांनी मुस्लिम स्त्रियांना आत्मनिर्भर करण्यासाठी आपली लेखणी झिजवली.

## महाराष्ट्र फाउण्डेशन समाज गौरव पुरस्कार मानकरी १९९६-२००४

## समाजकार्य सन्मान



**प्रभाकर म्हसकर,**
**अमळनेर / २००१**

अन्न-वस्त्रासारख्या मूलभूत गरजाही भागत नसल्यामुळे आदिवासींचं आरोग्य हा समाजाला भेडसावणारा एक महत्त्वाचा प्रश्न बनलाय. हे आरोग्य सुधारण्याची गरज ओळखूनच प्रभाकर म्हसकर यांनी आदिवासी आणि ग्रामीण भागात 'रामकृष्ण फिरते रुग्णालय' सुरू केलं. गावोगावी, पाड्यापाड्यात फिरून हे सुसज्ज रुग्णालय जनतेच्या आरोग्याची, स्वच्छतेची काळजी घेतं. आदिवासी स्त्रियांना लघुउद्योगांचं प्रशिक्षण देऊन त्यांना स्वत:च्या पायावर उभं करण्याचाही म्हसकर यांचा प्रयत्न आहे.



**दत्ता इस्वलकर,**
**मुंबई / २००२**

दत्ता सामंतांनी पुकारलेल्या गिरणी संपाचा फायदा उठवून मालकांनी बंद केलेल्या कापड गिरण्या सुरू व्हाव्यात, गिरणी कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळावेत, रोजगार मिळावा यासाठी बंद गिरणी कामगार संघर्ष समितीच्या माध्यमातून दत्ता इस्वलकर यांनी जीवाचं रान केलं. त्यांच्या या संघर्षाने काही काळासाठी गिरण्या सुरू झाल्या. गिरण्यांच्या चाळींत राहाणाऱ्या रहिवाशांना जागेचा हक्क मिळावा यासाठीही दत्ता लढले.



**विवेक मॉंटेरो, मुंबई / २००२**

आजच्या साचेबद्ध, पाठ्यपुस्तकांच्या चौकटीत अडकलेल्या शिक्षण पद्धतीत माणसामाणसांतला शास्त्रज्ञ शोधणं, त्याला वाव देणं हे तसं आव्हानात्मक काम. पण विवेक मॉंटेरोंनी ते स्वीकारलं, यशस्वी करून दाखवलं. गणिताची रोजच्या जगण्याशी सांगड घालत, तर प्रयोग आणि प्रत्यक्ष सहभागातून विज्ञान शिकवत त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात सशक्त लोकाभिमुख आणि लोकसहभागी पर्यायांचा शोध घेतला.



**राम पुनियानी, मुंबई / २००२**

राम पुनियानी आयआयटीमध्ये प्राध्यापक. बायो-मेडिकल इंजीनिअरिंग हा त्यांचा विषय. गेल्या काही वर्षांत बोकाळलेल्या जात-जमातवादी राजकारणाने ते अस्वस्थ झाले. हे धर्मवादी राजकारण ज्या पायावर उभं केलं जातं, तो पाया उलगडून सांगण्याचं काम त्यांनी केलं. त्यासाठी त्यांनी अनेक पुस्तकं लिहिली, व्याख्यानं दिली. ती गाजली, समाजाच्या सर्व थरांत त्यावर चर्चा झाली. जातीयवादी शक्तींविरोधात जनमत तयार करण्यात पुनियानींचा मोठा सहभाग आहे.

## समाजकार्य सन्मान



**शेख वझीर पटेल,**
**अमरावती / २००३**
'यंग मुस्लिम सोशल असोसिएशन' स्थापन करून त्याद्वारे सर्वच क्षेत्रांत पिछाडीवर असलेल्या मुस्लिम समाजात सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी जागृती घडवून आणण्याचं काम शेख वझीर पटेल यांनी केलं. तरुणांसाठी त्यांनी वाचनालय सुरू केलं. प्रचंड विरोध असतानाही मुस्लिम समाजात कुटुंबनियोजनाचा प्रचार आणि प्रसार केला. स्त्रियांना स्वावलंबी करण्यासाठी त्यांच्या शिक्षणावर भर दिला.



**सुरेश शिपूरकर,**
**कोल्हापूर / २००३**
समाजवादी चळवळीतून प्रेरणा घेतलेल्या सुरेश शिपूरकर यांनी विविध पातळ्यांवर समाजकार्य केलं. आरोग्य संदर्भात काम करताना, व्यसनमुक्तीवर त्यांनी लक्ष केंद्रित केलं. कुष्ठरोग्यांना समाजात योग्य वागणूक मिळावी, आर्थिक दृष्ट्या ते स्वावलंबी व्हावेत यासाठी 'स्वाधार' चळवळ सुरू केली. झोपडीवासीय, भटके-विमुक्त यांच्या हक्कांसाठी ते लढले. समाजात धार्मिक सामंजस्य टिकावं यासाठी त्यांनी प्रयत्न केले.



**आनंद पटवर्धन,**
**मुंबई / २००३**
मुंबईतला कष्टकरी असो, की नर्मदा खोऱ्यातला विस्थापित आदिवासी; रामाच्या नावावर विटांचा बाजार मांडणारे 'रामभक्त' असोत, की दहशतवादाचा बागुलबुवा उभा करून त्याविरुद्ध युद्ध छेडणारी अमेरिका, अत्यंत संवेदनाक्षम माणसांच्या नजरेने आनंद पटवर्धन यांचा कॅमेरा हे सगळं टिपतो. अन्याय झालेल्यांची बाजू घेतो. 'बंबई-हमारा शहर', 'राम के नाम', 'पिता, पुत्र और धर्मयुद्ध', 'नर्मदा डायरी', 'वॉर ॲण्ड पीस' या त्यांच्या डॉक्युमेंटरीज प्रचंड गाजल्यायत.



**उल्का महाजन, रोहा/ २००३**
'सर्वहारा जनआंदोलन' या संघटनेद्वारे केलेलं प्रत्यक्ष काम, ज्या प्रश्नांवर काम करतो त्याबद्दलचं वाचन, लेखन आणि लोकांपर्यंत ते प्रश्न पोहोचावेत यासाठी केलेली भाषणं हे उल्का महाजन यांच्या कार्याचं वैशिष्ट्य. आदिवासींचं संघटन करून त्यांनी त्यांच्या शोषणाविरुद्ध लढा उभारला आणि त्यांना राजकीय ओळख मिळवून दिली. आदिवासींना मिळणारी तुटपुंजी मजुरी, दळी जमिनीचा प्रश्न, आदिवासींचं विस्थापन, स्त्रियांवरचे अत्याचार यांविरोधात त्यांनी सतत आवाज उठवला.



**तिस्ता सेटलवाड,**
**मुंबई / २००४**
प्रख्यात कायदेतज्ज्ञ अतुल सेटलवाड यांची ही मुलगी खरं तर पत्रकार. 'डेली', 'इंडियन एक्सप्रेस' यांसारख्या आघाडीच्या इंग्रजी वृत्तपत्रांत त्यांनी काम केलं होतं. पण ही पत्रकारिता अपुरी आहे याची एका क्षणी त्यांना जाणीव झाली आणि नोकरी सोडून जातीयता, धर्मांधता यांना कसून विरोध करण्यासाठी त्यांनी 'कम्युनालिझम कॉम्बॅट' हे नियतकालिक काढलं. गुजरात दंगलीत दंगलखोरांना शासन व्हावं यासाठी त्यांनी जिवाचं रान केलं.



**विलास भोंगाडे,**
**नागपूर / २००४**
समाजातील तळागाळातील शोषितांसाठी काम करणारे विलास भोंगाडे हे आघाडीचे कार्यकर्ते. सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध त्यांचा सतत संघर्ष चालू असतो. त्यांच्या संघर्षप्रधान नेतृत्वाला त्या-त्या प्रश्नाच्या अभ्यासाचीही जोड असते. त्यांच्या 'जीवन विकास प्रतिष्ठान' या संस्थेतर्फे या संघर्षाला समांतर असे अनेक उपक्रम राबवले जातात.




**रमेश हरळकर,**
**मुंबई / २००४**
'झाडूवाले', 'कचरावाले' म्हणून आपण ज्यांना हिणवतो, त्या सफाई कामगारांचे प्रश्न समाजासमोर मांडण्यासाठी, त्यांना आवाज देण्यासाठी, बोलतं करण्यासाठी रमेश हरळकर यांनी 'सफाई कामगार परिवर्तन संघटना' स्थापन केली. त्यांचं जीवन सुकर करण्याचा प्रयत्न केलाच, शिवाय त्यांच्या मुलांच्याही हातात झाडू येऊ नये यासाठी त्यांच्या शिक्षणावर भर दिला.






**पोपटराव पवार,**
**हिवरेबाजार / २००४**
१९७२च्या भीषण दुष्काळानंतर पूर्णपणे दारूच्या आहारी गेलेलं आणि म्हणूनच संपूर्ण वाताहत झालेलं हिवरेबाजार हे गाव दारूमुक्त करत पोपटराव पवार यांनी पुन्हा उभं केलं. गावातलाच हा सुशिक्षित तरुण गावचा सरपंच झाला आणि त्याने पाणलोट विकास, वनीकरण, सहकारी डेअरी या योजना गावात राबवल्या. नशाबंदी, नसबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी आणि श्रमदान ही त्यांच्या कामाची पंचसूत्री आहे.



**डॉ. मोहन देशपांडे,**
**पुणे / २००४**
'मुलगी शिकेल, सर्वांना शिकवेल' हे वाक्य हल्ली जिकडेतिकडे लिहिलेलं आढळतं. पण काही वर्षांपूर्वीच हे हेरून डॉ. मोहन देशपांडे यांनी आरोग्य सेवकांसाठी आरोग्य जाणिवा रुजवणाऱ्या 'आरोग्य संवाद कार्यशाळा' घ्यायला सुरुवात केली.
या कार्यशाळांतून व्याख्यानं दिली जात नाहीत. प्रत्यक्ष कृतीतून, सहभागातून जनआरोग्याचं शिक्षण दिलं जातं.

# गेल्या नऊ वर्षांत 'मंथन'मध्ये वेळोवेळी लिहिलेले लेख

**१९९६**

विवेकवादाची रूपे / प्रा. मे.पुं. रेगे
महाराष्ट्रातील प्रबोधनाची वाटचाल / राजेंद्र व्होरा
धर्म आणि विज्ञान / अल्बर्ट आइनस्टाइन / अनुवाद : चिंतामणी देशमुख

**१९९७**

स्त्री प्रश्नाविषयी / पुष्पा भावे
परित्यक्तांचा प्रश्न, सामाजिक वास्तव आणि नव्या दिशेचा शोध / शमा दलवाई
९३ टक्क्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न / प्रतिमा जोशी

**१९९८**

माणूस, निसर्ग व पर्यावरण / प्रा. राम बापट
पर्यावरण : दुर्लक्षित विषय / निळू दामले / (अनुत्तरित प्रश्न घेऊन पटावर आला)

**१९९९**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील प्रबोधनाच्या समस्या / आचार्य शांताराम गरूड
प्रबोधन युगातील विवेकाचे अवतार / महेश गावसकर
वर्तमान वर्गवास्तव आणि सर्वहारा वर्गाचे स्थान / राजेश्वरी देशपांडे

**२०००**

स्त्री-आरक्षण प्रश्नाचे राजकारण / भास्कर लक्ष्मण भोळे
महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षण / प्रा.एन.डी.पाटील
Is life beautiful in the Bhimashankar cloud forest ? / डॉ. रेनी एम. बोर्गेस

**२००१**

अर्थकारण व पर्यावरण यांचा समन्वय / प्रा. चंद्रकांत केळकर
पर्यावरणीय समाजवादाचे नवे राजकारण / संजय संगवई
विकासाच्या ज्वराने पांगळे होणारे पर्यावरण / विजय दिवाण

२००२

ग्रामीण विकासनीती / मिलिंद बोकील

विकासाची संकल्पना आणि पंचायतराज व्यवस्थेतील महिलांचा सहभाग / मुक्ता दाभोळकर

२००३

समकालीन बहुजनवाद आणि बहुजन राजकारणाच्या विकासाच्या दिशा / डॉ. यशवंत सुमंत

पाण्याला वेढणारे जागतिकीकरण आणि खाजगीकरण / दत्ता देसाई

महाराष्ट्राचे पाणी : साधन कशाचे ? मूठभरांच्या फायद्याचे की सर्वांच्या सुबत्तेचे ? / सुहास परांजपे

२००४

पर्यायी समाजव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान / विद्युत भागवत

पर्यायी समाजरचनेचे आर्थिक स्वरूप / प्रयास, पुणे

पर्यायी समाजरचनेतील राजकीय व्यवस्था / कल्पना दीक्षित

## १९९६

### महाराष्ट्रातील प्रबोधनाची वाटचाल

" व्यक्तीची प्रतिष्ठा व सामाजिक समता या वैश्विक तत्त्वांच्या आधारे आपल्या समाजाची रचना तपासल्यानंतर जातीसंस्था या तत्त्वाविरुद्ध जाते हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी जातीसंस्थेस कसे नष्ट करता येईल याचा विचार केला. पण त्यांचा हा प्रबोधनाचा विचार व त्यावर आधारलेले कार्य यास छेद देणारे विचारप्रवाह व कार्य त्याच कालखंडात प्रबोधनाच्या पोटात निर्माण झाले व त्यामुळे प्रबोधनात अटकाव झाला. आर्यवंशाच्या श्रेष्ठत्वाने उच्चवर्णीय पुढारी इतके प्रभावित झाले होते की, त्यांना एकतर जातीसंस्थेतील विषमता व अन्याय कळला नाही किंवा त्यांनी स्वत:च्या वर्गाच्या हिताची भूमिका घेऊन या विषमतेचे मखलाशी करून समर्थन केले. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात जातीसंस्थेने नव्या परिस्थितीशी जुळवून घेऊन विषमता व अन्याय या आपल्या प्रमुख वैशिष्ट्यांना जपले. भांडवलशाही अर्थकारणांतील अंगभूत विषमतेची आणि जातीसंस्थेची मोट जुळली."

राजेंद्र व्होरा

### धर्म आणि विज्ञान

"संशयाने व संभ्रमाने वेढलेल्या या जगात अशा वृत्तीच्या व्यक्तींनी, जगभर पसरलेल्या विविध कालखंडातील कित्येक समानधर्मियांना मार्ग दाखविला आहे. परंतु वैज्ञानिक संशोधनाशी ज्यांचा संबंध निव्वळ विज्ञानाच्या उपयोजित अंगापुरता आला आहे त्यांच्या मनात मात्र अशा व्यक्तींविषयी सहज गैरसमज निर्माण होतात. अशा उच्चतम ध्येयांच्या साधनेसाठी लागणारी अंतस्फूर्ती व वारंवार आलेल्या अपयशांनी खचून न जाता आपल्या उद्दिष्टांशी एकनिष्ठ राहण्याची शक्ती यांची स्पष्ट कल्पना फक्त अशाप्रकारच्या साधनेला आयुष्य वाहिलेल्यांनाच येऊ शकते, इतरांना नाही. वैश्विक धार्मिक जाणिवेतूनच अशी मन:शक्ती प्राप्त होते. एका समकालिनाने काढलेले उद्‌गार योग्यच आहेत. त्याच्या म्हणण्याप्रमाणे आजच्या या भोगवादी जगात खरोखरीचे सखोल धार्मिक वृत्ती बाळगणारे लोक आहेत गंभीर मूलभूत संशोधनाला वाहिलेले वैज्ञानिकच !"

अनुवाद - चिंतामणी देशमुख
अल्बर्ट आइनस्टाइन

## १९९७

### स्त्री प्रश्नाविषयी

"आजच्या निवडणुकातील पैशाचा व्यापार आणि हिंसाचार यात बाईची तड लागणे अवघड आहे. यामुळे बऱ्याच ठिकाणी पक्ष 'आपल्या बायका' या मंत्राचा वापर करून स्त्रियांना कृतक सक्षमतेचा प्रत्यय देत आहेत."-------
तरी पंचायत, जिल्हा परिषद पातळीवर निवडून आलेल्या काही स्त्रियांमध्ये नवे चैतन्य जाणवत आहे. त्यांच्या प्रशिक्षणाचे प्रकल्प राबवले जात आहेत, पण जोपर्यंत तिचा एरवीच्या सामाजिक जीवनातील सहभाग अर्थपूर्ण होत नाही तोपर्यंत तिला राजकीयकरणासाठी योग्य पर्यावरण लाभत नाही. पक्षातील पितृसत्ताक हुकुमशाही तिला स्थान देते पण तेही प्रतीकात्मक !"

पुष्पा भावे

### परित्यक्तांचा प्रश्न, सामाजिक वास्तव आणि नव्या दिशेचा शोध

"परित्यक्तेचा प्रश्न हा केवळ तिच्या पुनर्वसनाचा प्रश्न नाही. तो तिचे परित्यक्तापण नाहीसे करण्याचा प्रश्न आहे. तिला स्वतंत्र माणूस म्हणून कुटुंबात आणि समाजात जगता आले पाहिजे. परंतु आत्मविश्वासाने आणि सन्मानाने जगायचे तर स्त्रियांना शिक्षण मिळायला हवे, तसेच तिला अर्थकारणामध्ये सहभाग मिळाला पाहिजे."

शमा दलवाई

## १९९८

# माणूस, निसर्ग व पर्यावरण

''गांधी, मार्क्स व बुद्ध यांचा वारसा आपल्याला लाभला पाहिजे. त्यातील सत्त्वांश उचलून व त्यावर परिस्थितीनुसार योग्य ते संस्कार करून आपण आपली नवी पर्यावरणविषयक भूमिका निश्चित केली पाहिजे. गरिबीच्या प्रश्नावर तोडगा काढला तर पर्यावरणाचा गुंता सुटेल आणि पर्यावरणाच्या गुंत्यात लक्ष घातले तरच गरिबीची पाळेमुळेही कुठेकुठे दडलेली आहेत, हे पुरतेपणी समजून येईल. पर्यावरणाच्या प्रश्नाकडे पाहण्याची सत्याग्रही भूमिका यापेक्षा फार वेगळी असणार नाही.''

**प्रा.राम बापट**

# पर्यावरण-दुर्लक्षित विषय

''आज पर्यावरण चळवळीला पंचवीस वर्षं होत आहेत. तिथल्या साधनहीन माणसांची व्यवस्था काय आहे? चाकोरीतल्या अर्थव्यवस्थेनं त्यांची गरिबी दूर केलेली नाही. चाकोरीबाहेरील पर्यावरणविषयक अर्थविचार मांडणाऱ्या आंदोलनांनी त्या माणसांना सहानुभूती व मदत जरूर दिली. पण ती माणसं होती तिथंच राहिली. राजकीय पक्ष, राजकीय विचारधारा, समाजातले विविध गट, पर्यावरणवादी संघटना हे सगळे घटक शिल्लक आहेत आणि पर्यावरणाचा नाश, प्रदूषण आणि पर्यावरणाचा दुरुपयोगही चालू आहे, त्यात खंड नाही.''

**निळू दामले**

## १९९९

# प्रबोधनयुगातील विवेकाचे अवतार

''विवेकाच्या साहाय्याने माणसाने परंपरेत, अंधश्रद्धेत, रूढीप्रथेत गमावलेला आपला 'स्व' परत मिळवणे व त्या आधारे सभोवतालपासून आपली स्वायत्तता कमावणे, या धारणेत पंधराव्या-सोळाव्या शतकातील युरोपमधील प्रबोधनयुगाचा उषःकाल आहे. परंपरा व प्रघात यांच्या अधिकारवाणीतून मुक्त झालेलं माणसाचं कोरं करकरीत मन हे आता अनुभवातून शिक्षण घेण्यास उपलब्ध झालं. जगाचा प्रवास करीत, विविध अनुभव घेत घेत मनाला संस्कारित करणे, हा ज्ञान मिळवण्याचा नवीन मार्ग ठरला. या प्रक्रियेत, साहजिकच, इहलोकातील भौतिकता व इंद्रियांद्वारे त्याची येणारी अनुभूती यांस प्राधान्य मिळत गेले.''

**महेश गावसकर**

# वर्तमान वर्गवास्तव आणि सर्वहारा वर्गाचे स्थान

ग्रामीण भागातून रोजगार व उत्पन्नाअभावी शहरांकडे स्थलांतरित होणारे समूहच खरे तर शहरांतील भणंग गटांमध्ये सामील होत असल्याने त्यांच्यातही जैविक स्वरूपाचे नाते असते. सामाजिक-सांस्कृतिक व्यवहारांतून निर्माण होणाऱ्या दडपणांमुळे हे नाते सुप्त स्वरूपात राहते. उदारमतवादी लोकशाहीची विचारप्रणाली अस्मितांच्या राजकारणास अवसर देते. त्यामुळे प्रादेशिक असमतोल, धार्मिक राजकीय अस्मिता, जातवादी राजकारण अशा निरनिराळ्या घटकांचा येथील वर्गीय वास्तवावर प्रभाव पडतो. त्याशिवाय तिसऱ्या जगातील जागतिक भांडवलाचा शिरकाव व नवसाम्राज्यवादी धोरणांच्या परिणामीही वर्गीय वास्तवाचे आकलन अधिक अवघड बनते. मात्र वर्गरचनेकडे सामाजिक घटित म्हणून पाहायचे ठरवल्यास या घटकांचा प्रभाव व महत्त्व अमान्य करता येणार नाही. आर्थिक व राजकीयक्षेत्राच्या आंतरक्रियेतून साकारणाऱ्या सर्व अंतर्विरोधांचे भान ठेवूनच भारतातील वर्गवास्तवाचे आकलन केले जाऊ शकेल.''

**राजेश्वरी देशपांडे**



## २०००

# स्त्री-आरक्षण प्रश्नाचे राजकारण

''आरक्षणापुरते बोलायचे तर अनुसूचित जाती-जनजातींच्या बाबतीत असे दिसते की, आरक्षणातून नेत्यांचा एक आत्महितरत, संधिसाधू आणि सत्तेसाठी/लाभांसाठी तत्त्वशून्य तडजोडी करणारा वर्ग निर्माण झाला आहे. तळागाळांतील स्वजनांपासून तो

बराचसा दुरावला आहे. आरक्षणांतर्गत आरक्षणाचा लाभ मिळवून विधिमंडळात निवडून आलेल्या स्त्री-प्रतिनिधींबाबतही हेच होण्याची शक्यता कोणालाच नाकारता येणार नाही.''

भास्कर लक्ष्मण भोळे

## अध्यक्षीय भाषण

''वनराजीतून दोन रस्ते बाहेर पडले (दोन वाटा). एक मळलेली आणि दुसरी न मळलेली, कमी मळलेली. मी कमी मळलेली वाट स्वीकारली आणि त्याच्यामधून हे सारं घडलं.''-----

''ही जी सारी माणसं आहेत ती कमी मळलेल्या वाटेवरून चाललेली आहेत आणि तुम्ही-आम्ही मळलेल्या वाटेने जातोय. काटा नाही, कुटा नाही, खड्डा नाही, पाय मुरगळण्याची भीती नाही, काही नाही. त्यांचे पाय रक्तबंबाळ झालेले आहेत, त्यांच्या पायात काटेकुटे गेलेले आहेत.''

प्राचार्य एन.डी.पाटील

## २००१

## अर्थकारण व पर्यावरण यांचा समन्वय

''परिसरातील साधने ही निसर्गाची नि:शुल्क देणगी आहे व ही साधने अविनाशी आहेत, ही दोन गृहितके भांडवलशाही अर्थशास्त्रीय विचारांमध्ये सुप्तपणे स्वाकारली गेली आहेत. (उदाहरणार्थ, रिकार्डोने जमिनीमध्ये अविनाशी गुण असल्याचे गृहित धरले.) तसेच उत्पादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निर्माण होणारा कचरा परत निसर्गात फेकल्यावर तो तळ नसलेल्या तळ्यात टाकल्यासारखा पडून राहतो, त्या कचऱ्यामुळे पर्यावरणामध्ये, निसर्गामध्ये, काही गुणात्मक फरक पडत नाही व तो कचरा निसर्ग नेहमीच आपल्यामध्ये सामावून घेतो, असे तिसरे गृहितक आहे. त्यामुळे 'निसर्गावर मात करण्याच्या मानवी समाजाच्या प्रयत्ना'ला, आर्थिक वृद्धी साधण्याच्या त्याच्या प्रयत्नांना अंत असण्याचे कारण नाही; 'सतत आर्थिक वृद्धी' म्हणजे 'समृद्धी', हे मानवसमाजाने आपले उद्दिष्ट ठेवणे योग्यच आहे, अशी भूमिका वरील तीन गृहितकांच्या आधारे भांडवलवादी समाजमनात तयार झाली आहे.''

चंद्रकांत केळकर

## पर्यावरणीय समाजवादाचे नवे राजकारण

''पर्यावरणाच्या राजकारणात सर्वच लोकशाहीवादी व समतावादी तसेच पर्यावरणविषयक जाणिवा असलेल्यांनी योगदान देण्याची गरज आहे. या पर्यावरणवादाने आजवरच्या भांडवली, उपभोगवादी व केंद्रीकृत विकासाच्या राजकारणासमोर मूलभूत सवाल उभे केले आहेत. म्हणून आज सर्वत्र प्रस्थापित शक्ती-डाव्या, उजव्या, मूलतत्त्ववादी, क्षुद्रवादी (Parochial)-या पर्यावरणीय समाजवादाच्या विरोधात उभ्या आहेत.''

संजय संगवई

## २००२

## ग्रामीण विकासनीती

''माणसाने निसर्गाशी कसं वागायचं हा एक महत्त्वाचा नैतिक प्रश्न आहे. तसेच माणसाने माणसाशी कसं वागायचं हाही एक नैतिक प्रश्न आहे. शेती ही एकमेव अशी व्यवस्था आहे की जिथे हे दोन्ही प्रश्न एकाचवेळी समोर येतात. आणि शेती हीच अशी प्रक्रिया आहे की जिच्यातून ह्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मिळण्याची शक्यता असते. तशी उत्तरे प्रत्येकाला मिळणे ही विकासाची प्रक्रिया आहे. हा विकास शोषणमुक्त, दारिद्र्यरहित आणि अहिंसक पद्धतीने करणे ह्याला नीती असे म्हणतात. शेतीची व्यवस्था उत्पादक आणि व्यवहार्य करणे, तिच्यातील विषमता हटवून दारिद्र्य दूर करणे आणि निसर्गाशी समतोल राखून तिला संपन्न बनवणे हीच ग्रामीण विकासनीती. काही वर्षांनी ग्रामीण आणि शहरी असा भेद विरून जाईल तेव्हा तीच माणसाची विकासनीती असेल.''

मिलिंद बोकील

## विकासाची संकल्पना आणि पंचायतराज व्यवस्थेतील महिलांचा सहभाग

''आज महिला वेगवेगळ्या भूमिकांतून राजकारणात आल्या आहेत व अनेक प्रचलित मिथ्स खोट्या ठरवत आपल्या भूमिका पार पाडत आहेत. ग्रामपंचायत सदस्य, सरपंच ग्रामशिक्षण समिती किंवा इतर विषय समितीच्या सदस्य, ग्रामसभेच्या सदस्य अशा या विविध भूमिका आहेत. प्रश्न मांडणे, निर्णय घेणे, त्याची अंमलबजावणी करण्यापर्यंतच्या विविध टप्प्यांवर कार्यरत होणे, अशी संधी यामुळे त्यांना उपलब्ध झाल्या आहेत.''

**मुक्ता दाभोळकर**

## २००३

## समकालीन बहुजनवाद आणि बहुजन राजकारणाच्या विकासाच्या दिशा

''बहुजनलक्ष्यी राष्ट्रवाद, भावात्मक धर्मनिरपेक्षता, राष्ट्र व संप्रदायातील मैत्ररूप बंधुत्व, कृषिसमाजवाद आणि स्त्री-मुक्ती या पाच आधारस्तंभांवर बहुजनवादाची दार्शनिक इमारत रचली तर एकविसाव्या शतकातील मानवमुक्तीचे तत्त्वज्ञान म्हणून जगाला बहुजनवादाची दखल घ्यावी लागेल.''

**डॉ. यशवंत सुमंत**

## पाण्याला वेढणारे जागतिकीकरण आणि खाजगीकरण

''येत्या काळात महाराष्ट्रातील आणि भारतातील क्रांतिकारी परिवर्तनाचा लढा पुढे जायचा तर त्याला पाण्याचे परिमाण द्यावे लागेल आणि पाण्याच्या खाजगीकरणाविरोधी (खरे तर मक्तेदारी कंपनीकरणाविरोधी) जागतिक जनसंघर्षाशी हातमिळवणी करावी लागेल.''

**दत्ता देसाई**

## महाराष्ट्राचे पाणी : साधन कशाचे? मूठभरांच्या फायद्याचे की सर्वांच्या सुबत्तेचे?

''शेती आणि पाण्याच्या क्षेत्रातील सब्सिडीवर ती समन्यायी, पर्यावरणवर्धक विकासाकडे नेणारी असली तरी ज्यांचा विरोध आहे त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की शेतीक्षेत्रातील सर्वात मोठी सब्सिडी त्यांची लाडकी अमेरिकाच देते! आणि उठसूट ठिबक सिंचनासाठी इझरेलचे नाव घेणाऱ्यांनी जरा पाणीवापरासंबंधीचे तिथले सामाजिक नियंत्रण व नियम एकदा पाहून घ्यावेत. निर्णय आपल्यालाच घ्यायचा आहे. महाराष्ट्राचे पाणी कशाचे साधन बनणार? मूठभरांच्या फायद्याचे की सर्वांच्या सुबत्तेचे?''

**सुहास परांजपे**

## २००४

## पर्यायी समाजव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान

''पर्यायी समाजव्यवस्थेमध्ये जगभरातील स्त्रीप्रश्नाला न्याय मिळायचा असेल तर स्त्रिया प्रत्येक समाजाच्या इतिहासात घडत असतात, त्यानुसार त्यांच्या न्याय्य हक्कांविषयीचे अग्रक्रम ठरत असतात, हे लक्षात घेतले पाहिजे. जागतिकीकरणाच्या झंझावातात स्त्रिया एक आकर्षक मालमत्ता ठरत आहेत. वेगवेगळ्या मार्गांनी वेश्या व्यवसायाला उत्तेजन दिले जात आहे. जागतिकीकरण आणि बाजारपेठ स्त्रियांना निवडीचे स्वातंत्र्य देत आहे असे भासवले जाते. परंतु निवड म्हणून काही स्त्रियांनी वेश्या व्यवसाय स्वीकारणे किंवा काही स्त्रियांनी गृहिणी होऊन संस्कृतिरक्षणाची चौकट स्वीकारणे घातक आहे, हे पर्यायी समाजव्यवस्थेसाठी झगडणाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवे.

**विद्युत भागवत**

## पर्यायी समाजरचनेचे आर्थिक स्वरूप

''जैवमाल-आधारित अर्थव्यवस्थेत जैवमालाचे उत्पादन करणाऱ्या स्थानिक नैसर्गिक संसाधनांचे (जमीन, जंगल, पाणी) महत्त्व केंद्रीय असेल. तेव्हा स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर स्थानिक वंचितांच्या उपजीविकासुरक्षिततेच्या दृष्टीने प्राधान्याने व्हायला हवा. नैसर्गिक संसाधनांच्या गैरवापराला आळा घालण्याबरोबरच स्थानिक नैसर्गिक संसाधनांवरील स्थानिक वंचितांच्या कायदेशीर, पारंपरिक, तसेच सामूहिक वापराच्या हक्कांचे संरक्षण करणे हा कळीचा मुद्दा ठरेल. या दृष्टीने जमीन मालकीच्या केंद्रीकरणाचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. तसेच जमिनीबरोबर जंगल, पाणी यांवरील वंचितांचा हक्क व हक्कदारीचा (एन्टायटलमेंट) मुद्दाही महत्त्वाचा ठरतो. पाणी व जंगले यांवर मालकी अथवा वापराचे हक्क वंचितांना मिळणे गरजेचे आहे.''

**प्रयास, पुणे**

## पर्यायी समाजरचनेतील राजकीय व्यवस्था

संक्रमण काळातील राजकीय व्यवस्थेचे उद्दिष्ट 'प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेतील त्रुटी कमी करत नेऊन ही व्यवस्था अधिकाधिक लोकाभिमुख करणे आणि अंतिमत: राजकीय सत्ता लोकांच्या हाती प्रत्यक्षपणे येईल याकरता संरचना उभ्या करणे' असे नमूद करता येईल. लोकशाही व्यवस्थेत राज्यसंस्थेला सत्ता राबविण्यासाठी लोकांच्या अधिमान्यतेची सातत्याने गरज भासते या गोष्टीचा वापर राज्यसंस्था लोकाभिमुख बनवण्यासाठी कसा करता येईल, यावर विचार होण्याची गरज आहे. राज्यसंस्थेची दमनकारी भूमिका प्रामुख्याने समाजातील आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विषमतांच्या जोरावर आकार घेत असते. संक्रमणकालीन टप्प्यावर या दमनकारी भूमिकेला आव्हान देण्यासाठी राजकीय क्षेत्राप्रमाणे इतर क्षेत्रांतील विषमतांविरुद्धची लढाई तीव्र करावी लागेल.''

**कल्पना दीक्षित**

# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

## यांचेही सहकार्य मोलाचे

श्याम नार्वेकर    प्रशांत आगवणे
अमित नेवरेकर    मेघना पाध्ये
सुनंदा बोराडे    प्रतिभा काणे
संध्या लोहार    शीतल जाधव
प्रसाद खोत    रूपाली परदेशी
सुहास पारकर    प्रतिभा गावडे
भूषण ठाकूर    कमलेश देसाई
शांताराम गावडे    विजय देखणे
राजेश कांबळे    श्रीकांत गायकवाड
सुदेश पाटील    मच्छिंद्र राजगुरु
सतीश तिरोडकर    सुनील राऊत
मिलिंद घोसाळकर    विनोद जाधव
विनायक प्रभू    साईशंकर ऐवळे
सुजाता खानोलकर    संगीता जाधव
संचिता पिंपळे    समीर जाधव
नौशाद शिकलगार    सूर्यकांत वराडकर
प्रशांत पवार    अंजली घाडीगावकर
सुजित सावंत    आनंद जाधव
सतीश कुलकर्णी    भरत खाडे
शैलेश तिरोडकर    भाग्यचंद्र कदम
हेमलता पेडणेकर    मनिषा जाधव
किरीट शहा    गणपत खोपडकर
दर्शना पांढरे    किरण चाळके
सुनील खवरे    अलका खराडे
अस्मिता डोंगरे    राजाराम कुळये

सुधाकर गंगापूरकर


# महाराष्ट्र फाउण्डेशन
# समाजकार्य पुरस्कार योजना २००५
# निवड / सल्लागार समिती (भारत)




**मृणाल गोरे**
अध्यक्षा,
केशव गोरे स्मारक ट्रस्ट,
महाराष्ट्र फाउण्डेशन
समाजकार्य पुरस्कार समिती



**पन्नालाल सुराणा**
पत्रकार आणि समाजवादी
चळवळीतील कार्यकर्ते



**प्रा. चंद्रकांत केळकर**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी
चळवळीचे अभ्यासक



**कुमार शिराळकर**
शेतकरी, शेतमजूर, आदिवासी
चळवळीतील कार्यकर्ते



**रवी देवगडकर**
निमंत्रक, महाराष्ट्र फाउण्डेशन
समाजकार्य गौरव
पुरस्कार समिती



**पुष्पा भावे**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी
चळवळीच्या अभ्यासक,
सामाजिक कृतज्ञता
निधीच्या विश्वस्त



**अर्जुन डांगळे**
साहित्यिक व
आंबेडकरवादी
चळवळीतील
कार्यकर्ते



**गजानन खातू**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी
चळवळीचे अभ्यासक व
सामाजिक कार्यकर्ते



**उल्हास राणे**
पर्यावरणतज्ज्ञ,
बॉम्बे नॅचरल हिस्टरी
सोसायटीच्या
कार्यकारी
मंडळाचे सदस्य



**नागेश हटकर**
आदिवासी व
असंघटित
कामगार
चळवळीतील
कार्यकर्ते

# महाराष्ट्र फाउण्डेशन
# समाजकार्य पुरस्कार योजना २००५
# निवड समिती (अमेरिका)



**सुनील देशमुख**



**सुनीता धुमाळे**
अमेरिकेमध्ये 'दक्षिण आशियाई महिलांचे प्रश्न' हे प्रमुख कार्यक्षेत्र. तेथील मराठी स्त्रियांमध्ये 'आत्मभान' जागविण्याचे कार्य. हॉस्पाईसारख्या संस्थेच्या सल्लागार. २००४ पासूनच्या 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या अध्यक्षा.



**प्रा. डॉ. जयंत लेले**
क्वीन विद्यापीठातील समाजशास्त्राचे अध्यापक, विविध सामाजिक विषयांचे चिंतनशील अभ्यासक व लेखक.



**शोभा चित्रे**
'गोठलेल्या वाटा', 'पानगळीच्या आठवणी' आणि 'गौरी, गौरी कुठे आलीस...?' या पुस्तकांच्या लेखिका. अनेक नियतकालिकांतून सातत्याने ललित-लेखन. अनेक सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यात सहभाग.



**अरुण गांधी**
भारतातील जातिव्यवस्था, अमेरिकेतील वंशवाद आणि दक्षिण आफ्रिकेतील वर्णसंघर्ष यांवर सातत्याने कार्य, 'एम. के. गांधी इन्स्टिट्यूट फॉर नॉन-व्हायलंस' या संस्थेचे संस्थापक



**डॉ. अरुंधती विनोद**
स्त्रीरोगतज्ज्ञ, टेनाफ्लाय, न्यूजर्सी अनेक सेवाभावी संस्थांशी संबंधित

# महाराष्ट्र फाउण्डेशन

चैतन्याची फुलवा झाडे, द्या जगण्याला अर्थ नवा
अडले पडले उचला, ज्यांना आधाराचा हात हवा
— दिलीप वि. चित्रे

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली पंचवीस वर्षे करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने भारतातील सातशे पन्नासहून अधिक गरजू मुलांना आर्थिक साहाय्य केले आहे; सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील बारा गावे दत्तक घेतली आहेत; जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड येथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. 'पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन'साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचे, तर गुजरातमधील भूकंपग्रस्तांसाठी सव्वा लक्ष डॉलर्सचे साहाय्य केले आहे.

गेल्या वर्षभरात 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने स्त्रियांचे सबलीकरण, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आदी क्षेत्रांत काम करणाऱ्या साठ स्वयंसेवी संस्थांना ६ लक्ष ८० हजार डॉलर्सच्या देणग्या दिल्या. याव्यतिरिक्त डिसेंबर २००४ मधील त्सुनामीची आपत्ती आणि जुलै २००५ मधला महाराष्ट्रातला पूर या दुःखद घटनांतील संकटग्रस्तांसाठी 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने तातडीने ७३ हजार डॉलर्सची रक्कम उभी केली.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'भारत-वैद्य' (अनवाणी डॉक्टर) व 'मैत्रीण' हे दोन नवे प्रकल्पही यावर्षी हाती घेतले, तर 'समाज परिवर्तनासाठी माहिती तंत्रज्ञान' हा 'फाउण्डेशन'चा प्रकल्प आता दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करत आहे. एक गाव - एक संगणक हा या प्रकल्पाचा पहिला टप्पा होता व त्याद्वारे आजपर्यंत ५९ खेड्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

अशा रीतीने आजवर भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ८७ लक्ष डॉलर्सहून अधिक रकमांच्या देणग्या दिल्या गेल्या आहेत. येत्या वर्षासाठी 'महाराष्ट्र फाउण्डेशन' पुढील प्रकल्प हाती घेत आहे : (१) मानवी अपव्यापाराचे नियंत्रण : भारतात या तऱ्हेच्या अपव्यापारातून दरवर्षी हजारो स्त्रिया वेश्याव्यवसायात आणल्या जात आहेत. त्यांतील ४०% प्रमाण १८ वर्षांखालील मुलींचे आहे. हा अपव्यापार थांबवण्यासाठी विविध उपायांचा अवलंब करणे व या व्यवसायातून बाहेर येणाऱ्या मुली/स्त्रियांचे पुनर्वसन करणे या हेतूने हा प्रकल्प योजला आहे. (२) बालिका-विवाह नियंत्रण : लातूरच्या 'ग्रामीण विकास लोकसंस्थे'च्या सहकार्याने १३ ते १६ वयोगटातील मुलींचा विवाह लावण्यास प्रतिबंध करणारा प्रकल्पही यावर्षी सुरू केला जात आहे. (३) निराधार महिला पुनर्वसन/ज्येष्ठ नागरिकांना काळजीवाहू सहकारी : या दुहेरी प्रकल्पातून निराधार परंतु सक्षम महिलांना एकाकी ज्येष्ठ नागरिकांसोबत राहून त्यांना साथ देणे व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल. पर्यायाने दोन्हीही घटकांना त्याचा लाभ होईल.

विशेष अभिमानाची बाब म्हणजे या सर्व कामाची दखल घेऊन 'संयुक्त राष्ट्रसंघा'ने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला Special Consultative Status हा विशेष दर्जा दिला आहे. यामुळे 'फाउण्डेशन'ला संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेल्या स्वयंसेवी संघटनांच्या परिषदांना सल्लागार म्हणून उपस्थित राहता येणार आहे.

Invest in future
of those
with no future...
So they can reinvest

हे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चे घोषवाक्य आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला अभिप्रेत असणाऱ्या या समाज-परिवर्तनाचा वसा घेतलेल्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी या हेतूने श्री. सुनील देशमुख यांच्या पुढाकाराने १९९६ साली सुरू केलेली समाजकार्य पुरस्कार योजना या वर्षी दहाव्या वर्षात प्रवेश करत आहे.

समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचे हे ऋण अल्पांशाने फेडावे, या भावनेने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने १९९४ साली सुरू केलेली 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' या वर्षी बाराव्या वर्षात पदार्पण करत आहे. ❑



# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

केशव ऊर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यातील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार, तसेच असंघटित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला 'आंतरराष्ट्रीय समाजवाद' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८ साली त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर त्यांचे चळवळीतील सहकारी व मित्र यांनी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ची स्थापना केली. ट्रस्टतर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोनातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबवले जातात. ट्रस्टचे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिक शास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ५,५०० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक, अभ्यासू कार्यकर्ते व संशोधन करणारे विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

संशोधनाच्या कार्याला उपकारक व्हावे म्हणून ट्रस्ट एक डॉक्युमेंटेशन सेंटर चालवते. या केंद्रात सुमारे २०० विषयांवरील नियतकालिकांतील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनाच्या अनुषंगाने व्याख्याने आयोजित केली जातात. ट्रस्टतर्फे महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबिरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम ट्रस्टतर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन ट्रस्टतर्फे अभ्यासिका चालविण्यात येते. आज ४०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या उन्नत नगर, गोरेगाव (प.) येथील दोन प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ट्रस्टने दत्तक घेतल्या असून तीन डोंगरी (गोरेगाव) झोपडपट्टी विभागात व कल्याण केंद्राच्या इमारतीमध्ये बालवाड्या, २०० विद्यार्थी-विद्यार्थिनींकरता अभ्यासिका, क्षयरोग निवारण केंद्र, आरोग्य केंद्र, स्वयंरोजगार केंद्र असे उपक्रम ट्रस्ट चालवीत आहे. आरोग्य केंद्रामधील दंतविभागात दातावरील सर्व प्रकारच्या उपाययोजनांची व्यवस्था आहे. तसेच सर्व प्रमुख आजारांवर सल्ला देण्यासाठी विशेषज्ञ विशिष्ट दिवशी उपलब्ध असतात. ट्रस्टतर्फे डिसेंबर २००३पासून तीन डोंगरी भागात 'परिवार विकास कार्यक्रम' राबवला जात आहे. वस्तीतल्या समस्याग्रस्त कुटुंबांची निवड करणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांना मार्गदर्शन करून या समस्या त्यांच्या त्यांनीच सोडवण्यास प्रेरित आणि प्रोत्साहित करणे असे या कामाचे स्वरूप आहे. सध्या एकूण १२१ कुटुंबांमध्ये हे काम चालू आहे.

ज्येष्ठ नागरिकांना ज्या शासकीय सवलती उपलब्ध होतात, त्याकरता त्यांना सक्षम अधिकाऱ्यांच्या सहीचे ओळखपत्र बहुधा आवश्यक असते. ते मिळवण्याकरता अशा ज्येष्ठ व्यक्तींना यातायात करावी लागते. त्यांची ही गरज लक्षात घेऊन ट्रस्टने २० रुपयांच्या नाममात्र शुल्कामध्ये अशी ओळखपत्रे मिळवून देण्याची व्यवस्था २००४ पासून केली आहे. आजपर्यंत २७५० ज्येष्ठ नागरिकांनी याचा लाभ घेतला. तसेच, कायद्याचा योग्य सल्ला मिळणे हेही आता सामान्य माणसाच्या आवाक्यात राहीनासे होत असल्याने ट्रस्टने एक मोफत कायदा-सल्ला केंद्र याच वर्षी सुरू केले आहे. रोजगार मिळवण्याची क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने श्रमिक विद्यापीठाच्या मदतीने इलेक्ट्रिशिअनचे, मेंदी नक्षीकामाचे प्रशिक्षण दिले जाते.

केशव गोरे स्मारक ट्रस्टने भाषेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा उपक्रम जुलै २००५ पासून सुरू केला आहे. दिवंगत प्रा. सुहास गोळे यांच्या प्राध्यापक व विद्यार्थी मित्रांनी त्यांचे यथोचित स्मारक व्हावे, या उद्देशाने केशव गोरे स्मारक ट्रस्टचा एक उपक्रम म्हणून 'प्रा. सुहास गोळे भाषा शिक्षण केंद्र' चालू केले आहे. सुहास गोळे हे इंग्रजीचे सुप्रसिद्ध व्याख्याते होते. या केंद्राचे उद्घाटन डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी केले. या केंद्रामार्फत प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे इंग्रजी व मराठी भाषेचे प्रशिक्षण, इंग्रजी संभाषण, प्रादेशिक भाषेत शिकलेल्या विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेश घेतल्यावर इंग्रजी भाषेच्या ज्या अनेक प्रकारच्या अडचणी येतात त्याकरता संभाषणात्मक इंग्रजीचा अभ्यासक्रम, जर्मन, जपानी, फ्रेंच, स्पॅनिश, रशियन यांसारख्या परकी भाषांचे शिक्षण - असे उद्देश आहेत. त्यांपैकी केंद्राने शिक्षकांच्या मराठी-इंग्रजीच्या कार्यशाळा व जर्मन, जपानी, इंग्रजी संभाषण अभ्यासक्रम चालू केले आहेत.

गेल्या वर्षापासून केशव गोरे स्मारक ट्रस्टमध्ये 'रसिक चित्र मंडळ' या नावाने फिल्म सोसायटी सुरू करण्यात आली आहे. देश-विदेशातील विविध चित्रपट दाखवण्याबरोबरच चित्रपटाविषयी समज वाढवण्याचे उपक्रमही 'रसिक चित्र मंडळा'तर्फे घेतले जाणार आहेत.

वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिके व नियतकालिके यांचे नि:शुल्क वाचनालय, व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण वर्ग, असे अनेक उपक्रम ट्रस्टतर्फे चालविले जातात. स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे counselling करण्याचे 'स्वाधार' या संस्थेचे कार्य ट्रस्टच्या वास्तूतूनच केले जाते. 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने सुरू केलेल्या 'मराठी साहित्य पुरस्कार योजना', 'समाजकार्य पुरस्कार योजना', यांची कार्यवाही ट्रस्टकडून केली जाते. तसेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी कुटुंबीयांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या अनुवाद-अनुदान योजनेची कार्यवाहीही ट्रस्टकडूनच केली जाते. या योजनेखाली तर्कतीर्थांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथाचा 'Development of Indian Culture : Vedas to Gandhi' हा एस.आर.नेने यांनी केलेला इंग्रजी अनुवाद तसेच त्यांच्या 'जडवाद' या पुस्तकाचा अरुंधती खंडकर यांनी केलेला 'Spiritual Materialism' हा इंग्रजी अनुवाद असे दोन अनुवाद प्रकाशित झाले आहेत. या योजनेचे स्वरूप २००४ पासून बदलले आहे.

वाई या गावातील सर्व शाळांमधून शालान्त परीक्षेत पहिल्या क्रमांकाने यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्याला व विद्यार्थिनीला शिक्षणाकरता येणारा पदवी/पदविकेपर्यंतचा फीचा खर्च करण्याकरता साहाय्य दिले जाते. अशा तऱ्हेने २००४ व २००५ या साली दोन विद्यार्थी व दोन विद्यार्थिनींना या योजनेतून साहाय्य करण्यात आले.

महाराष्ट्र फाउण्डेशनच्या साहाय्याने 'आगरकर विचार व्यासपीठ योजना' गेली पाच वर्षे केशव गोरे स्मारक ट्रस्टतर्फे कार्यान्वित झाली आहे. या योजनेखाली 'पुरोगामित्व म्हणजे काय?' (श्रुती तांबे), 'गुजरात: सत्य आणि फक्त सत्यच' (संपादक : अंजली मुळे, किरण मोघे, विद्या कुलकर्णी) या पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या. त्याचप्रमाणे या योजनेखाली सामाजिक परिवर्तनाला साहाय्यभूत होणारे परिसंवाद, कार्यशाळा, नियतकालिके वगैरेंसारख्या महाराष्ट्रातील उपक्रमांना आर्थिक साहाय्य दिले जाते.

ट्रस्टच्या १९६० साली बांधलेल्या वास्तूमध्ये व १९९९ साली गोरेगावातील तीन डोंगरी येथील झोपडपट्टीत बांधलेल्या वास्तूमध्ये ट्रस्टचे कार्य चालते.

❑



**मृणाल गोरे**
अध्यक्षा, केशव गोरे स्मारक ट्रस्ट,
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार समिती



**श्रीमती कुसुम सामंत**
समाज कार्यकर्त्या




**श्री. कृष्णनाथ नेवरेकर**
माजी नगरसेवक
विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी



**मधू आडेलकर**
स्वातंत्र्याच्या इतिहासाचे अभ्यासक
समाज कार्यकर्ते



**श्री. श्रीनिवास प्रभू**
सहकार, शिक्षण व सामाजिक
क्षेत्रातील कार्यकर्ते




**श्री. चंद्रकांत केळकर**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी
चळवळीचे अभ्यासक



**श्री. रवी देवगडकर**
प्राध्यापक,
निमंत्रक, महाराष्ट्र फाउण्डेशन
समाजकार्य गौरव पुरस्कार समिती



**श्री. प्रमोद निगुडकर**
व्यावसायिक आणि सामाजिक
चळवळीतील कार्यकर्ते



# सुनील देशमुख

सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी.केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम.एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमॉडिटी ट्रेडर म्हणून वॉलस्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज गिरीश, निशा व सुशील या तीन मुलांसह ते व त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा टिळक) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.

व्यवसायात नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा यांविषयी विशेष आस्था आहे. व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यापासून आठवड्यातील काही काळ ते सामाजिक कामासाठी आवर्जून देत असतात.

मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला एक कोटी रुपयांची देणगी देऊन १९९४ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' त्यांनी सुरू केली. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' आयोजित 'महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार योजने'मागेही सुनील देशमुख यांचीच प्रेरणा आहे.

Sunil Deshmukh
Tele/Fax. : 305-918-0755
email : sunild@aol.com

## 'महाराष्ट्र फाउण्डेशन'कडून अनुदान मिळविण्याकरता प्रक्रिया

महाराष्ट्रातील सामाजिक काम करणाऱ्या व ज्यांचे आर्थिक व्यवहार पादर्शक आहेत अशा संस्थांकडून अभिनव प्रकल्पांचे 'महाराष्ट्र फाउण्डेशन' स्वागतच करते. **अशा संस्था एफ.सी.आर. ॲक्टखाली** (Foreign Contribution Act) **केंद्र सरकारच्या गृहखात्याकडे नोंदणी केलेल्या असणे, प्राप्तीकर कायद्याच्या ८०-जी कलमाप्रमाणे त्यांच्यापाशी दाखला असणे आवश्यक आहे.** एफ.सी.आर. नोंदणीशिवाय प्रस्तावाचा विचार होऊ शकणार नाही.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'कडे अनेक संस्थांकडून अनुदानासाठी नवीन प्रकल्प सतत येत असतात. हे अर्ज स्वीकारताना पुढील निकष लावले जातात :

- संस्था समाजातील खालच्या थराकरता कार्य करणाऱ्या, स्थिरावलेल्या व काही प्रकल्प यशस्वीपणे राबवलेल्या असावयास हव्यात.
- संकल्पित प्रकल्पाचा वा योजनेचा उद्देश गरीब व दुर्बल (vulnerable) अशा समाजघटकांचे जीवनमान गुणात्मकदृष्ट्या सुधारणारा असायला हवा.
- प्रकल्पाचे लाभ दीर्घ काळ टिकणारे व दारिद्र्य दूर करणारे असायला हवेत.
- शिक्षण, आरोग्य, आर्थिक सक्षमीकरण, पर्यावरण व स्त्रियांचे सबलीकरण ही महाराष्ट्र फाउण्डेशनच्या कार्याची प्रमुख क्षेत्रे आहेत.

**महाराष्ट्र फाउण्डेशनकडे साहाय्यासाठी येणाऱ्या प्रस्तावाचे स्वरूप थोडक्यात (४ पृष्ठापर्यंत) असे असावे :**

- प्रकल्पाची पार्श्वभूमी : स्थानिक परिस्थितीचे विश्लेषण व प्रकल्पाची गरज.
- प्रकल्प : प्रकल्प कशाकरता (थोडक्यात), संकल्पित कामाचे स्वरूप; त्या कामाचे फलित.
- प्रकल्पाकरता संस्थेकडे असलेले विशेष तज्ज्ञ मार्गदर्शक व संस्थेचा त्या क्षेत्रातील अनुभव.
- खर्चाचे अंदाजपत्रक : प्रकल्पाच्या पूर्तीकरता लागणारे मनुष्यबळ, साहित्य व सामान, कार्यालय, प्रवास व इतर खर्चाचे अंदाज. (एक पृष्ठ).
- प्रकल्प पूर्ण होण्याचा अपेक्षित काळ.
- प्रकल्पाची कार्यवाही व देखरेख करणाऱ्या प्रमुख व्यक्तींची नावे.
- संस्थेला मदत करणाऱ्या इतर देशी व विदेशी संस्थांची नावे.

(या पत्रासोबत इतर कागदपत्रे जोडू नयेत.)

महाराष्ट्र फाउण्डेशनकडे नवीन प्रकल्पांच्या सूचना सतत येत असतात; परंतु आलेल्या सर्व प्रकल्पांचा विचार वर्षातून एकदाच केला जातो. प्रकल्पाविषयी अधिक माहिती आवश्यक वाटल्यास ती त्यावेळी मागविण्यात येते.

जर महाराष्ट्र फाउण्डेशनकडे आलेला प्रकल्प स्वीकारला गेला, तर संस्थेला तसे कळवून संस्थेशी करार केला जातो. करारावर सह्या झाल्यावर मंजूर केलेल्या रकमेपैकी पहिला हप्ता संस्थेकडे पाठविला जातो. प्रकल्पाच्या प्रगतीचा अहवाल व खर्चाचा तपशील कळविल्यावर मंजूर अनुदानाचे पुढील हप्ते दिले जातात व प्रकल्प पूर्ण झाल्याचा अहवाल पाठविल्यानंतर अनुदानाचा शेवटचा हप्ता पाठविला जातो.

**अनुदानासाठी महाराष्ट्र फाउण्डेशनकडे मोठ्या प्रमाणावर सूचना येत असल्यामुळे वरील निकष लावून त्यातील काही प्रकल्पांचीच निवड करणे महाराष्ट्र फौण्डेशनला शक्य होते.**

महाराष्ट्र फाउण्डेशनशी करावयाचा पत्रव्यवहार e-mail द्वारा करणे हे सोयीचे आहे. हा पत्रव्यवहार महाराष्ट्र फाउण्डेशनच्या अध्यक्षांच्या नावे (sunitadhumale@yahoo.com) करावा.

संस्थेकडे e-mail ची सोय उपलब्ध नसेल तर अशा संस्थेने आपली वरील प्रकारची माहिती महाराष्ट्र फाउण्डेशनच्या पुढील पत्त्यावर पाठवावी :

Maharashtra Foundation C/o. Ramesh Sarva, CPA PC,
Post Box No. 750-250, 109-17, 72nd Road, No. 6-R, Forest Hills,
Newyork 11375, USA., 718-268-6906-269-6906

विखंडित समाजाला हवेत जोडत नेणारे हात...

